




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ८ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








## नांदेड जिल्ह्यातील सहावा खून



**मुखेड/प्रतिनिधी**-मुखेड तालुक्यातील मौजे कर्णा येथे एका विवाहितेचा पतीनेच साडीच्या पदराने गळा आवळुन खून केल्याची घटना दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी मुखेड पोलिस ठाण्यात आरोपी पत्तीविरु द्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पतीस पोलिसांनी अटक केले आहे.मुखेड तालुक्यातील मौजे कर्णा येथील आरोपी मारु ती रामकिशन उर्फ बाबुराव खांडेकर याने आपल्या राहत्या घरी बेडरू ममध्ये मयत पत्नी स्वाती मारु ती खांडेकर हिच्यासोबत भांडण करु न मयत विवाहितेच्या अंगावरील साडीच्या पदराने तिचा गळा आवळून खून केल्याची घटना मौजे कर्णा येथे दि. ६ एप्रिल रोजी सकाळी घडल्याची माहिती गुप्त बातमीदारामार्फत मुखेड पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, सहाय्यक पोलिस निरीक्षक जावेद शेख, पोलिस उपनिरिक्षक गणेश माने, पोलिस उपनिरिक्षक संदीप यामावार, पोलिस उपनिरिक्षक अभिजित तुतूरवाड सह पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेउन घटनास्थळाची पहाणी केली आणी घटनेचे गांभीर्य पाहुन फारेन्सिक टीमला बोलावण्यात आले आणी त्यानंतर घटनास्थळाचा पंचनामा करु न मयत महिलेस शवविच्छेदन करण्यासाठी उपजिल्हा रूग्णालय मुखेड येथे दाखल करु न त्याठिकाणी डाक्टरांनी शवविच्छेदन केले. याप्रकरणी मयत विवाहितेचा भाउ फिर्यादी योगेश गणपत देवकत्ते यांनी दिलेल्या फिर्यादिवरु न आरोपी पती मारु ती रामकिशन उर्फ बाबुराव खांडेकर वय ३५ वर्ष याच्याविरु द्ध मुखेड पोलिस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ७७/२०२६ कलम १०३ (१) भारतीय न्याय सहिंतानुसार दि. ६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून मुखेड पोलिसांनी आरोपी पतीस अटक केले आहे. सदर घटनेचा तपास पोलिस अधीक्षक अभिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी, पोलिस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अभिजित तुतूरवाड हे करीत आहेत. मयताच्या पश्चात तिन मुले आहेत.या दुर्दैवी घटनेमुळे देवकत्ते परिवारावर दुखाचे डोंगर कोसळले असुन सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## 11 आयएएस अधिका-यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्य सरकारने आज तब्बल ११ आयएएस अधिका-यांच्या बदलीचे आदेश काढले. राज्य सरकारकडून अनेकवेळा बदल्यांची ऑर्डर काढण्यात आली आहे. फडणवीस सरकारकडून प्रशासनातील बदल्यांचा धडाका कायमच असून अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. एप्रिलच्या दुस-या आठवड्यात अधिका-यांच्या बदल्या झाल्या आहेत, ज्यामध्ये अनेक बड्या समावेश आहे. सर्व अधिका-यांना लवकरात लवकर पदभार स्वीकारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान राहुल रंजन महिवाल (आयएएसःआरआरः२००५), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सदस्य सचिव म्हणून बदली झाली आहे. श्वेता सिंघल (आयएएसःआरआरः२००९) यांची महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे विशेष निवासी आयुक्त म्हणून बदली झाली आहे. रुचेश जयवंशी (आयएएसःआरआरः२००९) यांची महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून बदली झाली आहे. कन्हूराज बागटे (आयएएसःएससीएसः२०११) यांची महावितरण, कल्याण येथे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून बदली झाली आहे. लक्ष्मण राउत (आयएएसःएससीएसः२०१५), सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांची महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, (पान २ वर)




## खरातच्या अश्लील व्हिडीओंची १५ ते २० रूपयांना विक्री



**नाशिक /प्रतिनिधी :** नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरातने महिलांवर केलेल्या अत्याचाराचे काही व्हिडीओ लीक झाले. हे व्हिडीओ सोशल मीडियावरु न व्हायरल झाले. यातील १५ ते १७ व्हिडीओ विकण्यात आल्याचे समोर आले असून महाराष्ट्र सायबर पोलिसांनी अशोक खरात आणि इतर काही सोशल मीडिया हॅण्डल विरोधात गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र सायबरचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव यांनी याबद्दल माहिती दिली. अशोक खरात आणि इतर काही सोशल मीडिया अकाउंट विरोधात माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले. अशोक खरात आणि इतर काही सोशल मीडिया अकाउंटवरू न आक्षेपार्ह व्हिडीओ पसरवण्यात आले. यातील १५ ते १७ व्हिडीओ ऑनलाइन विकण्यात आले. प्रत्येक व्हिडीओ १५ ते २० रु पयांना विकण्यात आला आहे. पीडितांची ओळख यामुळे उघड होउ शकते, असे सांगत त्यांनी हे शेअर करणा-यांना कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. व्हिडीओची ऑनलाइन विक्री करणा-या अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याला लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महासंचालक यादव यांनी दिली आहे. भोंदू अशोक खरात याने अनेक विवाहित आणि अविवाहित महिलांना समस्यांचे निराकरण करून देतो म्हणत आपल्या जाळ्यात ओढले होते. अनेक महिलांवर त्याने अनेक वेळा अत्याचार केले. भेटायला आल्यानंतर तो आपल्या कार्यालयातच महिलांवर अत्याचार करत होता. त्याची ही काळी कृत्ये स्पाय कॅमेरा लावून त्याच्याकडे काम करणा-या व्यक्तीने रेकार्ड केली होती. यातीलच काही व्हिडीओ लीक झाले. हे व्हिडीओ सोशल मीडियातून पसरली. सरकारने पीडितांची ओळख उघड होईल असे कोणतेही कृत्य न करण्याचे आवाहन केले होते. पण, काही सोशल मीडिया हॅण्डलवरून हे व्हिडीओ पसरवले गेले.

## मोतिहारी: 6 दिवसांत विषारी दारूमुळे 11 जणांचा मृत्यू

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहारमधील मोतिहारी जिल्ह्यात विषारी दारूमुळे होणा-या मृत्यूंची संख्या अव्याहतपणे वाढत आहे. गेल्या सहा दिवसांत मृतांचा आकडा ११ वर पोहोचला असून, सोमवारी रात्री रघुनाथपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बालगंगा वार्ड क्रमांक २९ येथील रहिवासी जितेंद्र शाह यांच्या मृत्यूने या संख्येत वाढ झाली आहे. जितेंद्र शाह हे त्यांच्या कुटुंबाचे एकमेव कमावते सदस्य होते. त्यांच्या निधनामुळे त्यांच्या पाच मुलींना अडचणीत उभं राहावं लागले आहे. मृताची मुलगी राणी कुमारी यांनी सांगितले की, १ एप्रिल रोजी शेजारी संजीत शाह यांनी वडिलांना दारू दिल्याने त्यांच्या प्रकृतीमध्ये घट झाली आणि अखेरीस मृत्यू झाला. त्यांच्या पत्नी ललिता देवी आता एकटी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करतील, हा प्रश्न सतत चिंतेचा विषय आहे.या विषारी दारू दुर्घटनेतील मृत्यूंची मालिका २ एप्रिल रोजी सुरू झाली. ४ एप्रिलपर्यंत चंदू कुमार, प्रमोद कुमार, परिक्षण मांझी, हिरालाल भगत, लालकिशोर राय, संपत शाह आणि लड्डू शाह यांचा मृत्यू झाला. ५ एप्रिल रोजी मोहम्मद इलियास अन्सारी, लड्डू शाह (बालगंगा) आणि जोधा मांझी यांचा मृत्यू झाला. ६ एप्रिलच्या रात्री जितेंद्र शाह यांच्या मृत्यूने मृतांचा एकूण आकडा ११ वर पोहोचवला.प्रशासनाला भीती आहे की मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो, कारण अंदाजे १५ रु ग्ण अजूनही रु ग्णालयात दाखल आहेत, त्यापैकी सहा जणांनी आपली दृष्टी गमावली असल्याचे समजते.पूर्व चंपारणचे पोलीस अधीक्षक (एसपी) स्वर्ण प्रभात यांनी सांगितले की, या प्रकरणात आतापर्यंत सात जणांना अटक करण्यात आली असून, सोमवारी दोन आरोपींनी न्यायालयात आत्मसमर्पण केले. त्यांच्यावर विषारी दारू विकल्याचा आरोप आहे.

### अमरावती-अकोला महामार्गावर ट्रक-कारची समोरासमोर धडक

## बडनेरात भीषण अपघात; 4 ठार 3 जखमी



**अमरावती/प्रतिनिधी** -बडनेरा परिसरात अमरावती-अकोला महामार्गावर सोमवारी मध्यरात्री भीषण अपघात घडला. ट्रक आणि कारच्या समोरासमोर झालेल्या धडकेत चार तरुणांचा मृत्यू झाला असून तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मोहम्मद तल्हा मोहम्मद अनीस (२२), मोहम्मद अनस मोहम्मद सईद (२२) ,-अब्दुल अवेज मोहम्मद अकील (२६),मोहम्मद अनवेज अब्दुल सलीम (२२) अशी अशी मृतांची नावे आहेत तर हिजाहत अशर इर्शाद अहमद (२२), मोहम्मद अनस मोहम्मद अनीस (२०),मोहम्मद हुजेफा मोहम्मद आरिफ (२०) हे गंभीर जखमी आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, बडनेरा जुनी वस्तीतील सात मित्र रात्री बेलोरा परिसरात गेले होते. परतीच्या प्रवासादरम्यान त्यांची स्विफ्ट डिझायर कार (एमएच ०४/ जेबी ३३६९) अकोला नाक्याजवळ आली असताना मागून किंवा समोरून आलेल्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार रस्त्याच्या कडेला जाऊन आदळली आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर तीन जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून वाहनासह फरार झाला होता. बडनेरा पोलिसांनी तातडीने कारवाई करत गुन्हा दाखल केला असून आरोपी चालकाचा शोध सुरू आहे. या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांनी रस्ते सुरक्षा आणि अवजड वाहनांच्या बेदरकार वेगावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

**चहाची ती शेवटची भेट-**

बडनेऱ्यातील सात जिवलग मित्र रोजप्रमाणे रात्री थोडा वेळ एकत्र घालवण्यासाठी चहा पिण्यासाठी बाहेर पडले. हसत-खेळत, भविष्यातील स्वप्नं रंगवत सुरू झालेली ही साधी भेट कोणालाही ठाऊक नव्हतं की हीच त्यांच्या आयुष्यातील शेवटची मैफल ठरणार आहे. परतीच्या प्रवासात भरधाव ट्रकने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली आणि क्षणात आनंदाचे रूपांतर आक्रोशात झाले. चार तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण मृत्यूशी झुंज देत आहेत. एका साध्या चहाच्या निमित्ताने घराबाहेर पडलेले हे मित्र पुन्हा कधीच परतले नाहीत. त्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे.

### नागपुरातही भोंदूबाबाचे मोठे कांड

## तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलेवर बलात्कार



**नागपूर/ प्रतिनिधी**-नाशिक आणि वसईच्या घटना ताज्या असतानाच आता नागपुरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बेपत्ता पतीला परत मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका भोंदूबाबाने महिलेवर बलात्कार केला आहे. पीडित महिलेचा पती गेल्या काही महिन्यांपासून बेपत्ता होता, त्याला तंत्र-मंत्राच्या जोरावर परत आणण्याचे खोटे आश्वासन या नराधमाने दिले. मात्र, आपली फसवणूक झाल्याचे पीडित महिलेच्या लक्षात येताच तिने भोंदूबाबाविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दिली. यानंतर पोलिसांनी ताबडतोब भोंदूबाबाला बेड्या ठोकल्या आहेत. याप्रकरणी पोलिस अधिक तपास करीत असून नागरिकांना अशा भोंदूबाबांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा पती गेल्या काही महिन्यांपूर्वी अचानक घरातून बेपत्ता झाला. तेव्हापासून पतीचा शोध घेण्यासाठी ती महिला सर्वतोपरी प्रयत्न करत होती. याच काळात तिचा संपर्क आरोपीशी झाला. आरोपीने महिलेला विश्वासात घेतले आणि तंत्र-मंत्राद्वारे तिच्या बेपत्ता पतीला शोधून काढेल आणि त्याला पुन्हा घरी परत आणेल, असे आश्वासन दिले. पतीने घरी परत यावे, या आशेने पीडित महिला आरोपीच्या सांगण्याप्रमाणे वागू लागली. याच गोष्टीचा गैरफायदा घेउन आरोपीने विधी आणि पूजेच्या नावाखाली महिलेवर बलात्कार केला. मात्र, आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात येताच तिने पोलिस ठाण्यात धाव घेउन तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार पोलिसांच्या कानावर घातला. पीडित महिलेच्या तक्रारीवरून नागपूर पोलिसांनी तातडीने पावले उचलत गुन्हा दाखल केला आणि संबंधित (पान २ वर)

## 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' म्हणत खरातने केले अनेक महिलांचे लैंगिक शोषण




**नाशिक /प्रतिनिधी :** एसआयटीकडून सुरू असलेल्या चौकशीदरम्यान दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए म्हणत आपला सहा शब्दांचा खास मंत्रच विशेष तपास समितीला सांगितला. अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याची कबुली दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चमत्कार दाखवून किंवा वशीकरण करूेन नव्हे तर हातचलाखी करूेन आपण महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे अशोक खरातने कबूल केले आहे. तसेच ज्याला लोक चमत्कार किंवा वशीकरण समजतात, ती खरी तर हातचलाखी असल्याचे अशोक खरातने सांगितले आहे.भोंदू अशोक खरात याच्या एसआयटी चौकशीत अनेक खुलासे होत आहेत. आज एसआयटीच्या प्रमुख तेजस्वी सातपुते पत्रकार परिषदेत खरात यांच्या कारनाम्यांविषयी सविस्तर माहिती देण्याची शक्यता आहे. सध्या सुरू असलेल्या तपासात खरातने अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. पोलिसांसमोर त्याने अत्यंत धक्कादायक बाबी उघड केल्या आहेत.महिलांना कशाप्रकारे तो आकर्षित करीत होता, याबाबत त्याने पोलिसांना माहिती दिली, महिलांना धमकावल्याची आणि हातचलाखीने आकर्षित करूेन त्यांचे शोषण केल्याचे त्याने सांगितले. दुनिया झुकती है, बस झुकानेवाला चाहिए अशी धक्कादायक कबुली खरातने पोलिस कोठडीत दिली.अनेक बुवा-बाबा जे चत्मकार दाखवतात, किंवा वशीकरण करतात, ती केवळ त्यांची हातचलाखी असते, आपलीही हातचलाखी होती, असे त्याने कबूल केले, हे सांगताना केलेल्या कृत्याचे समर्थन केले आहे. कोणत्याही प्रकारचा पश्चाताप त्याने व्यक्त केला नाही.महिलांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी तो विविध ट्रिक्स वापरत असे, ज्याला त्याने विज्ञानाचे नाव दिले आहे. मानसिक दबावाखाली आणून त्यांच्यावर वर्चस्व निर्माण केले. कबुलीजबाबात त्याने अनेक वेळा विज्ञान युगाचा दाखला दिला. जे काही केले, ते लोकांच्या मानसिकतेचा अभ्यास करूेन आणि विज्ञानातील काही क्लृप्त्या वापरूेन केल्याची कबुली त्याने दिली असल्याची माहिती आहे. महिलांना कसे आकर्षित केले? महिलांना या गोष्टी (पान २ वर)

### महिलांना आकर्षित करण्यासाठी वापरल्या विविध ट्रिक्स

## 40 माओवाद्यांसह 'पीएलजीए'च्या जहाल कमांडरने टेकले गुडघे



**गडचिरोली /प्रतिनिधी :** तेलंगणा व छत्तीसगड सीमावर्ती भागात गेल्या अनेक वर्षांपासून दहशतीचे साम्राज्य निर्माण करणा-या नक्षलवादी चळवळीचा पाया आता पूर्णपणे हादरला आहे. नक्षल्यांच्या पीएलजीए (पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी) चा जहाल कमांडर सोडी केशालू उर्फ मल्ला याने आपल्या ४० सहका-यांसह पोलिसांसमोर ७ एप्रिल रोजी शरणागती पत्करली. यामुळे माओवाद्यांचे बटालियन विखुरले असून सीमावर्ती भागात हिंसक चळवळीला ओहोटी लागल्याचे सूत्रांनी सांगितले.शरण आलेल्या या नक्षल्यांनी केवळ आत्मसमर्पण केले नाही, तर त्यांच्याकडील एके-४७, इन्सास आणि एसएलआर सारख्या आधुनिक स्वयंचलित शस्त्रांचा साठाही पोलिसांकडे सुपूर्द केला. सध्या केशालू हा संघटनेतील सर्वात प्रभावी मोहरा मानला जात होता. कर्रेगुट्टा टेकड्यांच्या दुर्गम भागात वावरणारा हा जहाल कमांडर २५ हून अधिक माओवादी तुकड्यांचे नेतृत्व करत होता. तो आता मुख्य प्रवाहात सामील झाल्याने माओवाद्यांच्या गोटात खळबळ उडाली आहे. वर्षाच्या सुरुवातीला २ जानेवारी रोजी पीएलजीए बटालियन-१ चा कमांडर बारसा देवा उर्फ देवन्ना याने शस्त्र म्यान करु न गुडघे टेकले होते. त्यानंतर २२ (पान २ वर)

## अवकाळीने झालेल्या नुकसानीपोटी शेतक-यांना 128 कोटी 65 लाखांची मदत

### जानेवारीपासून झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरु

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतक-यांना १२८ कोटी ६५ लाख रु पयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतक-यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतक-यांना १२८.८६ कोटी रु पयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतक-यांना फटका बसला आहे. या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यु आणि नउ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे. एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या पावसानेही १,९४,३२९ शेतक-यांच्या १,२२,९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजानुसार स्पष्ट झाले आहे. जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे.दरम्यान. जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा तयार झाला असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पांमुळे अतिरिक्त २.९५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. जुलै २०२२ पासून आजपर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या मान्यता ४.३५ लाख कोटी रु पयांच्या असून हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होईल, अशी माहिती जलसंपदा विभागाने सादरीकरणाद्वारे दिली.

## ट्रम्प इराणच्या विरोधात अणुबॉम्बचा वापर करणार?

### इराणची संपूर्ण संस्कृती आज रात्री नष्ट होईल



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणची संपूर्ण संस्कृती आज रात्री नष्ट होईल, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथवरील पोस्टमधून दिल्यानंतर संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे. इराणला दिलेली ४८ तासांची मुदत संपुष्टात येत असून इराणने जर माघार घेत करार केला नाही तर त्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे ट्रम्प यांनी ताज्या पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी म्हटले की, आमच्याकडे अशी साधने आहेत जी आम्ही अजून वापरलेली नाहीत. या दोघांच्या विधानांचे वेगवेगळे अर्थ जगभरातील माध्यमे आता काढत आहेत.ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडिया साईटवर लिहिलेल्या पोस्टमधील मजकूर आधी पाहू. त्यांनी लिहिले, आज रात्री एक संपूर्ण संस्कृती नष्ट होईल. जी पुन्हा परत कधीही आणता येणार नाही. असे व्हावे, अशी माझी बिलकुल इच्छा नाही. पण कदाचित ते होईलच. तथापि, आता पूर्ण सत्तापालट होणार आहे. जिथे वेगळ्या प्रकारचे, हुशार आणि कमी कट्टरतावादी विचारांच्या लोकांचे वर्चस्व असेल. सध्या ठाउक नाही, पण ते कदाचित काहीतरी क्रांतिकारक अद्‌भुत असे घडवू शकतील. जगाच्या प्रदीर्घ आणि गुंतागुंतीच्या (पान २ वर)

## 1 कोटी 40 लाख लोक बलिदानासाठी तयार

### ट्रम्प यांची मुदत जवळ येताच इराणचाही इशारा

**तेहरान :** होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासंदर्भात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आक्रमक भूमिका घेत इराणला काही तासांची मुदत दिली आहे. इराणने लवकरात लवकर निर्णय घ्यावा नाहीतर अमेरिकन सैन्य अवघ्या एका रात्रीत इराणला नकाशावरू न पुसून टाकेल, असा इशारा ट्रम्प यांनी दिला. यावर इराणचे प्रत्युत्तर समोर आले आहे. इराणचे राष्ट्रअध्यक्ष मसूद पेझेश्कियन यांनी मंगळवारी सांगितले की, देशाच्या रक्षणासाठी तब्बल एक कोटी ४० लाखांहून अधिक नागरिक आपल्या प्राणांचे बलिदान देण्यासाठी (पान २ वर)

## 'पुढील ४८ तास जिथे आहात, तिथेच रहा'

### इराणमधील भारतीयांना केंद्राकडून अलर्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणच्या विनाशाबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या विधानानंतर भारतीय दूतावासाने इराणमध्ये राहणा-यांना भारतीय नागरिकांना सर्तक राहण्याचे आवाहन केले आहे. 'अजूनही इराणमध्ये राहत असलेल्या भारतीयांनी पुढील ४८ तास जिथे असाल, तिथेच राहावे', असे आवाहन भारतीय दूतावासाने केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण संस्कृती उद्ध्वस्त करण्याची धमकी दिल्यानंतर भारताने ही सूचना जारी केली आहे. इराणमध्ये राहत असलेल्या भारतीयांना सुरक्षित ठिकाणी राहण्यास दूतावासाने म्हटले आहे. भारतीय दूतावासाने म्हटले आहे की, 'इराणमधील भारतीयांनी वीज केंद्र, लष्करी ठिकाणांपासून दूर रहावे. त्याचबरोबर बहुमजली इमारतीच्या वरच्या मजल्यावर राहणे टाळावे. (पान २ वर)




# मनपा स्तरावर जनगणना २०२७ साठी फिल्ड ट्रेनर्स प्रशिक्षणाला सुरुवात

## आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी वर्षा लढ्ढा यांच्या हस्ते उदघाटन

**अमरावती/प्रतिनिधी:-** देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत फिल्ड ट्रेनर्सच्या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित या प्रशिक्षणाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी वर्षा लढ्ढा यांच्या हस्ते करण्यात आले.



या उद्घाटन सोहळ्यास उपायुक्त (१) तथा शहर जनगणना अधिकारी योगेश पिठे, जनगणना संचालनालयाचे जिल्हा समन्वयक ऋषिकेश पाथरे, सहायक अभियंता अजय विंचुरकर (मास्टर ट्रेनर), सहायक शहर जनगणना अधिकारी अक्षय निलंगे, तसेच नंदकिशोर तिखीले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, मनोज शहाळे (सहायक आयुक्त तथा चार्ज अधिकारी) यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त वर्षा लढ्ढा यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, धोरणे आणि संसाधनांचे नियोजन हे जनगणनेतून मिळालेल्या अचूक माहितीवर अवलंबून असते. त्यामुळे ही प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि जबाबदारीने पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे.

प्रशिक्षणार्थींना संबोधित करताना त्यांनी पुढे सांगितले की, फिल्ड ट्रेनर्स हे जनगणना प्रक्रियेतील महत्त्वाचे दुवे आहेत. त्यांच्या माध्यमातून प्रगणक आणि पर्यवेक्षकांना योग्य प्रशिक्षण दिले जाणार असल्याने, त्यांनी प्रत्येक बाब सखोलपणे समजून घेतली पाहिजे. तांत्रिक बाबी, नोंदणी प्रक्रिया, डेटा संकलनातील अचूकता आणि वेळेचे व्यवस्थापन या सर्व गोष्टींवर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रशिक्षण काळात मिळणाऱ्या प्रत्येक सूचनेची नोंद करून प्रत्यक्ष कामात त्याचा प्रभावी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपायुक्त योगेश पिठे यांनी प्रस्ताविकातून प्रशिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, आगामी जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत अचूक माहिती पोहोचवणे आणि ती नोंदवणे हे मोठे आव्हान असून, त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास कुलट यांनी प्रभावीपणे केले. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सागर अठोर, प्रतीक खिराडे आणि अक्षय महल्ले यांनी विशेष सहकार्य केले.

तीन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये जनगणनेचे विविध टप्पे, माहिती संकलनाची पद्धत, डिजिटल साधनांचा वापर, तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात येणाऱ्या अडचणींवर मात करण्याच्या उपाययोजना यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### खाजगी रुग्णालयाचा

डॉक्टरांनी सिझर करण्याचा निर्णय घेतला आणि शस्त्रक्रिया पार पडली. सुरुवातीला सर्व काही सुरळीत असल्याचे सांगण्यात आले. मात्र, पुढील काही दिवसांत महिलेची प्रकृती खालावत गेली. शस्त्रक्रियेनंतर योग्य तपासणी, औषधोपचार गंभीर त्रुटी राहिल्या. वेळेवर योग्य निदान न झाल्याने संसर्ग वाढत गेला आणि अखेर महिलेचा मृत्यू झाला. या घटनेनंतर स्थानिक प्रशासन आणि आरोग्य विभागाची भूमिका अद्यापही संशयास्पद आणि उदासिन आहे. अशा घटनांमध्ये अनेकदा चौकशीच्या नावाखाली प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होतो, ही वस्तुस्थिती आहे.खाजगी रुग्णालये रुग्णसेवेपेक्षा पैशाला प्राधान्य देत असतील, तर सामान्य नागरिकांनी विश्वास ठेवायचा तरी कुणावर? असा प्रश्न उपस्थित होतो. अशा निष्पाप जिवांचा बळी जात राहील आणि आरोग्य व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कायमचा ढासळेल.

### बसस्थानकात वृद्ध महिला

चाकाखाली आल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली.तत्काळ उपचारासाठी वृद्ध महिला वर्धा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आल्या. गंभीर प्रकृती लक्षात घेता त्यांना सेवाग्राम आणि नंतर नागपूरमध्ये पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. या घटनेनंतर बस चालक प्रदीप शिरसाट (रा. नाचणगाव) यांच्याविरुद्ध देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन साक्षीदारांची माहिती गोळा केली आहे. चालकाच्या जबाबदारीची चौकशी सुरू करण्यात आली आहे, घटनेचा तपास ठाणेदार अमोल मंडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय किशोर साखरे, पोलीस हवालदार स्वप्निल वाटकर आणि धर्मेंद्र गिरी हे करत आहेत.

### आंतरराज्यीय एमडी ड्रग्ज

रहीम व शेख रहीम उर्फ होन्गा शेख आमद यांचा सहभाग उघडकीस आला असून त्यांनाही अटक करण्यात आली. त्यांच्या घरझडतीत ६५ ग्रॅम एम.डी. जप्त करण्यात आले. तपास पुढे नेत मुंबई व राजस्थान येथील आंतरराज्यीय साखळीचा मागोवा घेत अजिम असद शेख (मुंबई) याच्याकडून ७८ ग्रॅम एम.डी. व मोबाईल जप्त करण्यात आले. त्यानंतर राजस्थानमधील प्रतापगड येथे जाऊन मुख्य पुरवठादार मांगीलाल उर्फ मांगी गणपतसिंग सिंघावत (प्रतापगड, राजस्थान) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या चौकशीतून उघड झालेल्या माहितीच्या आधारे विष्णू उर्फ विजय मोहनलाल गायरी (मोहेडा, राजस्थान) यालाही अटक करण्यात आली. तपासात प्रतापगड परिसरात जंगलात अवैध एम.डी. उत्पादनाची फॅक्टरी सुरू असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. ही फॅक्टरी राधेश्याम श्रीपाद दमामी (प्रतापगड, राजस्थान) आणि विष्णू मोहनलाल गायरी यांनी चालविल्याचे निष्पन्न झाले असून ते दोघेही विविध राज्यांतील एनडीपीएस प्रकरणांमध्ये फरार होते. सदर आरोपींनी राजस्थान, हरियाणा व मध्य प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणावर एम.डी. पुरवठा केल्याचे तपासात स्पष्ट झाले आहे. प्रतापगड पोलिसांनी यापूर्वीच या फॅक्टरीवर कारवाई केली असून आरोपींवर विविध राज्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत. एकंदरीत, अमरावती गुन्हे शाखेने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने संपूर्ण साखळीचा मागोवा घेत मूळ उत्पादन केंद्रापर्यंत पोहोचत मोठे यश मिळवले आहे. या कारवाईचे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कौतुक केले असून महासंचालक स्तरावर बक्षीसाची शिफारस करण्यात आली आहे.

**तपास व पोलिसांची धडक मोहीम-**

अमरावती शहरात एम.डी. विक्री, बाळगणे व सेवन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. २०२६ मध्ये आतापर्यंत गुन्हे शाखेकडून ८ केसेस दाखल करून २ किलो ३५२ ग्रॅम एम.डी. जप्त करण्यात आले असून २८ आरोपींवर कारवाई करण्यात आली आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या आरोपींची मालमत्ता, बँक खाते व वाहनांची माहिती गोळा करून जप्तीची प्रक्रिया सुरू आहे. लवकरच आरोपींवर एमपीडीए, मकोका, पीट एनडीपीएस सारखी कठोर कारवाई प्रस्तावित आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. महेश इंगोले, स.पो.नि. मनिष वाकोडे, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, जहीर शेख, सचिन बहाळे, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नापोका विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझीम उद्दीन सैयद, पोका विशाल वाकपांजर, योगेश पवार, चेतन गुल्हाणे, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक संदीप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा, राहुल दुधे यांनी केली. आहे.

### देहव्यापारावर पोलिसांची

उपस्थितीत सापळा रचून कारवाई केली. त्यावेळी एक महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घरातून देहव्यापार चालवत असल्याचे आढळून आले. तसेच ग्राहक आणण्याचे काम करणारे दोन पुरुषही तेथे उपस्थित होते. पोलिसांनी तातडीने कारवाई करत संबंधितांना ताब्यात घेतले. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. प्राथमिक चौकशीत त्यांना येथे देहव्यापारासाठी बोलावले जात असल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळावरून एकूण ३२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक अधिनियम १९५६ च्या कलम ३, ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, पोलीस आयुक्तालयाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, महिलांवर किंवा बालकांवर कोणत्याही प्रकारची छेडछाड, त्रास किंवा गैरप्रकार होत असल्यास त्वरित ११२, १०९१ किंवा १०९८ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. अशा प्रकरणांमध्ये दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### महिलांनी अर्थकारणाला गती

म्हणाले, विना परतावा देण्यात आलेल्या निधीचा बचतगटांनी निट उपयोग करावा. उद्योगासाठी ही पायाभरणी असून ही मोलाची रक्कम राहणार आहे. या निधीचा चांगला उपयोग करून यशकथा निर्माण कराव्यात. महिला बचतटांसाठी विविध स्टार्टअप कार्य करीत असून त्यांच्याशी जुळावे. यामुळे मार्केटींगची मदत होणार आहे. जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेतील लाभार्थींची पतसंस्था सुरू करण्यात आली आहे. तसेच महिलांची विविध कार्यकारी सहकारी संस्था सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे महिला सक्षमीकरणाला बळकटी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. वानखडे यांनी प्रास्ताविक केले. पुनम सोनार यांनी सूत्रसंचालन केले. घ्यार यांनी आभार मानले. यावेळी जनाराव खंडारे, माधान, ता. चांदूर बाजार, दत्ता कडूकर, तिवरा, ता. धामणगाव, निलेश कोहळे, सुरळी, ता. वरुड यांनी जेंडर सेंसीटिव्ह रोल मॉडेलमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच शक्ती महिला बचतगट, भिलटेक, ता. चांदूर रेल्वे, स्वामी समर्थ महिला बचतगट, शिराळा, ता. अमरावती, आदर्श महिला बचतगट, पूर्णानगर, ता. भातकुली या बचतगटांना धनादेशाचे वितरण करण्यात आले.

### मनरेगा निधी अपहारः ४

**इंट्रोगेशन म्हणजे काय?**

इंट्रोगेशन म्हणजे एखाद्या संशयिताची पोलिस किंवा तपास अधिकाऱ्याद्वारे सखोल चौकशी करणे होय. गुन्ह्याशी संबंधित माहिती मिळवण्यासाठी, कबुली घेण्यासाठी किंवा सत्य शोधण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये अनेक प्रश्नांची सरबत्ती केली जाते आणि कधी कधी दबाव किंवा युक्तीचा वापरही केला जातो.

**तपासाची पुढची टप्प्ये**

आर्थिक गुन्हे शाखा आता बयाण दिलेल्या संशयितांना इंट्रोगेशनसाठी बोलावणार आहे. यामुळे अटकेची धमकी प्रत्येक संशयितावर राहणार आहे. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार गुन्ह्यातील इतर आरोपींविरुद्ध कठोर पावले उचलली जातील, असा विश्वास तपास अधिकाऱ्यांमध्ये आहे.

### तडीपार आरोपी चाकूसह

करण्यात आले होते. मात्र, कोणतीही परवानगी न घेता तो शहरात आढळून आल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक गोंडवावार यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल मलिक अहमद, दिनेश नांदे, दानिश शेख, राहुल रोडे आणि सागर पंडित यांच्या पथकाने केली.

### येवदा ग्रामीण रुग्णालय,

कानडजे, गटविकास अधिकारी चंदू धवक यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांकडून या दोन्ही महत्त्वकांशी प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. दरम्यान ग्रामीण रुग्णालय येवदा या संदर्भात सविस्तर माहिती प्रशासकीय सोपस्कार मंजूर कामाचे अंदाजपत्रक याबाबतची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक यांनी तर मंजूर प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर गंगाई बाबत सुरू असलेली कार्यवाही प्रगती शासन स्तरावर सुरू असलेल्या बाबींची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी दिली. या दोन्ही कामांचा आढावा घेतल्यानंतर खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी याबाबत प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले. विहित वेळेत दोन्ही प्रकल्प पूर्ण करावे. वडनेर गंगाई येवदा भागातील आरोग्य सुविधा चांगल्या दर्जाची व्हावी यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे या दोन्ही कामांसंदर्भात सकारात्मक असून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिल्याचे डॉ. अनिल बोंडे यांनी स्पष्ट केले. दोन्ही वास्तूंची लवकरच पाहणी करून स्थानिक स्तरावर जाऊन देखील आढावा घेणार असेही अनिल बोंडे यांनी नमूद केले. यावेळी बैठकीला भाजपचे अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के, किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय वाघमारे, येवदा येथील मनोज पाथरकर, युवा मोर्चाचे जिल्हा सचिव पंकज कान्हेरकर, प्रेमसागर आसरे, वडनेर गंगाई येथील युवा मोर्चाचे अध्यक्ष कुलदीप हागे, विशाल माहुलकर, जिल्हा सचिव ऋषिकेश इंगळे, शुभम सातपुते यांच्यासह भाजपचे स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### नवनिर्माण आणि सर्जनशील

यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ.श्रीवास्तव म्हणाले, 'प्रगतीसाठी नवीन विषय, नवाचार आणि स्वतंत्र विचारांची गरज असते. हे सर्व 'बॉक्स'च्या बाहेर विचार करण्यातूनच शक्य होते. आपले विचार स्वतःचे, स्वतंत्र आणि स्पष्ट असावेत. त्यात कोणतीही दुविधा किंवा संदिग्धता नसावी. विचार केवळ मनात न ठेवता त्यांची अंमलबजावणी गंभीरपणे करावी.'

ते पुढे म्हणाले, 'अनेकदा युवक काही नवीन करण्याचा निश्चय करतात, परंतु त्यांचे विचार स्वतंत्र नसल्याने ते नंतर दुविधेत अडकतात. परिणामी इच्छित यश मिळत नाही आणि त्यामुळे नैराश्य, तणाव व निराशा वाढते. यातून बाहेर पडण्यासाठी सतत 'आउट ऑफ बॉक्स' विचारसरणी ठेवणे गरजेचे आहे.'

व्याख्यानादरम्यान डॉ.श्रीवास्तव यांनी देशातील अनेक यशस्वी उद्योजकांच्या उदाहरणांचा उल्लेख करून सांगितले की, एक साधारण व्यक्ती देखील केवळ आपल्या सर्जनशील आणि बॉक्सबाहेरच्या विचारांच्या जोरावर मोठे यश मिळवू शकतो.

कार्यक्रमाच्या समन्वयक डॉ.प्रकाश नारायण यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन देशपांडे, कुनाल बोरकर आणि अश्विनी राठी यांनी विशेष प्रयत्न केले.

### महापौरांची स्वच्छता पाहणी;

करण्याची मागणी केली. या तक्रारींची गंभीर दखल घेत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले.

यावेळी महापौरांनी पी.डब्ल्यू.डी. विभागाचे अभियंता महल्ले यांना तातडीने घटनास्थळी बोलावून घेतले. त्यांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसराची बारकाईने पाहणी करण्यात आली. पाहणीनंतर महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या दुरुस्ती कामांसाठी त्वरित रपटे व आराखडा तयार करण्याचे आदेश दिले. तसेच ही कामे कोणत्याही विलंबाशिवाय तात्काळ सुरू करण्यात यावीत, अशी कडक सूचना त्यांनी दिली.

महापौरांनी स्पष्टपणे सांगितले की, नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेवर मिळणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे आणि त्यात कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नाही. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची नव्हे तर नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी असून सर्वांनी मिळून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या पाहणीदरम्यान नगरसेवक दिपक साहु (सम्राट) व रेखा पंजाबराव तायवाडे, सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, उपअभियंता आशिष अवसरे, अभियंता आनंद जोशी, ज्येष्ठ स्वच्छता निरीक्षक राजू डिक्याव, स्वच्छता निरीक्षक सैय्यद, पी.डब्ल्यू.डी. विभागाचे अभियंता महल्ले तसेच बिटप्यून मयूर उपस्थित होते.

### ११ आयएएस अधिका-यांच्या

मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. गीतांजली बाविस्कर

(आयएएसःएससीएसः२०१५), मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग मंडळ, मुंबई यांची सहसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली आहे. ड?. दिलीप जगदाळे (आयएएसःएससीएसः२०१५), सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, कल्याण यांची सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली झाली आहे. पंकज देवरे (आयएएसःएससीएसः२०१६) यांची सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई येथे बदली झाली आहे. मीनल करनवाल (आयएएसःएससीएस२०१९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांची प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प , मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

करिश्मा नायर (आयएएसःएससीएस २०२१) अतिरिक्त महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. अमित रंजन (आयएएसःएससीएस २०२२) प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, केळापूर उपविभाग, यवतमाळ यांची अतिरिक्त महापालिका आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### तंत्र-मंत्राच्या नावाखाली

ढोंगी बाबाला अटक केली आहे. पोलिसांनी या प्रकरणी अधिक तपास सुरू केला असून, या आरोपीने अशाच प्रकारे इतरही कोणाची फसवणूक केली आहे का? याचा शोध घेतला जात आहे. तसेच अशा कोणत्याही भोंदू बाबांच्या किंवा तंत्र-मंत्राच्या भूलथापांना बळी पडू नका. संकटकाळात अंधश्रद्धेचा आधार घेण्याऐवजी कायदेशीर मार्गांचा अवलंब करा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए'

करण्यासाठी कसा राजी करायचा? त्यांना गंडा घालण्यासाठी नेमक्या कोणत्या गोष्टी केल्या? तो महिलांना कसे आपल्या जाळ्यात ओढायचा याबद्दलची माहिती खरातनेच सांगितली आहे.

**खरातच्या मालमत्तेची चौकशी**

ईडीच्या अधिका-यांनी खरातची कोठडी मिळवून चौकशी करण्याची तयारी सुरू केली आहे. खरातच्या मालमत्तांवर ईडीचे अधिकारी लवकरच छापेमारीदेखील करणार असल्याची माहिती ईडीमधील सूत्रांनी दिली आहे. तसेच खरातच्या नाशिकमधील कार्यालयासह तृप्तबाला बंगल्यातून शेकडो आधार कार्ड तसेच पॅन कार्ड एसआयटीने जप्त केले आहेत. प्राथमिक तपासात १३१ बनावट खाती पतसंस्थांमध्ये आढळून आली आहेत.

### ४० माओवाद्यांसह 'पीएलजीए'च्या

फेब्रुवारी रोजी नक्षलवादी चळवळीत ४० वर्षे घालवलेला आणि पॉलिटब्युरोचा सर्वोच्च नेता ६२ वर्षीय थिप्पिरी तिरुपती उर्फ देवजी याने पोलिस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांच्यासमोर आत्मसमर्पण केले. यावेळी त्याच्यासोबत वरिष्ठ नेता मल्ला राजी रेड्डीसारखे महत्त्वाचे नेते होते. त्यानंतर ७ मार्च रोजी हैदराबादमध्ये १३० नक्षल सदस्यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्या उपस्थितीत सामूहिकरीत्या शरणागती पत्करली होती. आता या यादीत जहाल कमांडर सोडी केशालू उर्फ मल्ला याचा समावेश झाला आहे.

माओवाद्यांची तेलंगणा राज्य समिती संपुष्टात

पोलिसांचा वाढता दबाव आणि शासनाच्या विकास योजनांमुळे नक्षलवादी आता भरकटत असल्याचे चित्र आहे. तेलंगणा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक वरिष्ठ नेत्यांनी शस्त्रे सोडल्यामुळे आता ही चळवळ पूर्णपणे खिळखिळी झाली असून तेलंगणा राज्य समितीचे अस्तित्व आता संपुष्टात आल्याचे अधिकृतपणे जाहीर करण्यात आले आहे.

### ट्रम्प इराणच्या विरोधात

इतिहासातील आजच्या सर्वात महत्त्वाच्या रात्रीच ते कळू शकेल. ४७ वर्षांची लूटमार, भ्रष्टाचार आणि मृत्यूचे तांडव अखेर संपुष्टात येईल, असेही ट्रम्प पुढे म्हणाले आहेत.

### १ कोटी ४० लाख लोक

तयार आहेत.देशाचे रक्षण करण्यासाठी एक कोटी ४० लाखांहून अधिक इराणी लोकांनी आपल्या प्राणांचे बलिदान देण्याची तयारी दर्शवली आहे. मी सुद्धा इराणसाठी माझे प्राण देण्यासाठी तयार आहे आणि राहीन, असे विधान पेझेश्कियन यांनी केले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ट्रम्प यांनी मंगळवारी रात्री ८ वाजेपर्यंतची (ईस्टर्न टाइम) मुदत निश्चित केली आहे. ट्रम्प यांनी दिलेल्या अंतिम मुदतीपूर्वी इराण होर्मुझची सामुद्रधुनी उघडणार का? हा महत्त्वाचा प्रश्न होता. मात्र यावर आता इराणनेही आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

**अंतिम मुदतीपूर्वी इराणकडून आव्हान-**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची कथित मुदत जवळ येत असताना इराणने माघार घेण्यास स्पष्ट नकार दिला आहे. अमेरिका आणि इस्रायलच्या संभाव्य हल्ल्यांच्या भीतीमुळे इराणी अधिका-यांनी तरूणांना वीज प्रकल्पांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणांभोवती मानवी साखळी तयार करण्याचे आवाहन केले आहे. तसेच इराणने युद्धविरामाचा प्रस्ताव फेटाळून लावला असून हा संघर्ष कायमचा संपुष्टात आणावा अशी मागणी केली आहे.

**इराणवर तीव्र हल्ले-**अमेरिका आणि इस्रायलने इराणवरील हल्ल्याची तीव्रता वाढवली आहे. शिराझमधील एका पेट्रोकेमिकल प्रकल्पासह इतर अनेक ठिकाणी अमेरिका आणि इस्रायलने पुन्हा हल्ले केले आहेत. इराणच्या प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार अनेक भागांमध्ये जीवितहानी झाली आहे. इस्रायलने इराणी जनतेला सार्वजनिक वाहतूक व्यवस्था न वापरण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे रेल्वेच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य केले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**इराणला एका रात्रीत नष्ट करू**-डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाउसमधील पत्रकार परिषदेला संबोधित करताना म्हटले की, त्यांना संभाव्य युद्ध गुन्हे करण्याबद्दल मुळीच चिंता वाटत नाही. जर होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासंदर्भात इराणने मंगळवारची रात्री ८ वाजण्याची अंतिम मुदत पाळली नाही तर इराणच्या पायाभूत सुविधा नष्ट करू.

### 'पुढील ४८ तास जिथे आहात,

लोकांनी घरातच रहावे आणि जर त्यांना महामार्गावर कुठे जायचे असेल, तर दूतावासाशी संपर्क करावा.'

'जे लोक दूतावासाने व्यवस्था केलेल्या हाटेल्समध्ये राहत आहेत. त्यांनी बाहेर पडू नये आणि स्थानिक दूतावासाशी सातत्याने संपर्क करत रहावें', असा मेसेज दूतावासाकडून देण्यात आला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशलवर एक पोस्ट केली. त्यात त्यांनी म्हटले की, 'आज रात्री एका संस्कृतीचा अंत होईल, जी पुन्हा कधीही परत येणार नाही. हे असे व्हावे अशी माझी इच्छा नाहीये, पण कदाचित ते घडेलच."आता आपल्याकडे पूर्ण आणि संपूर्ण सत्तापालट झाला आहे, जिथे विविध, अधिक हुशार आणि कमी धर्मांध असलेले लोक प्रभावी ठरतील, कदाचित काहीतरी क्रांतिकारी आणि अद्भुत घडू शकेल, कोणास ठाउक? जगाच्या एका मोठ्या आणि गुंतागुंतीच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या क्षणांपैकी एक काय आहे, हे आपल्याला आज रात्री कळेल. ४७ वर्षांच्या खंडणी, भ्रष्टाचार आणि हत्यांचा आज शेवट होईल. इराणच्या महान जनतेवर ई[illegible]राची कृपा राहो', अशी धमकी ट्रम्प यांनी दिली आहे.


**पाहिजे**

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/
८००७३४२३३५



## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १५४/२०२६ ने.ता.०५.०५.२०२६

**अर्जदार :** १. सुनील सुधाकर वाकेकर, वय ४७ धंदा - मजुरी
रा.बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. अनिल सुधाकर वाकेकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.बेलोरा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. संगीता संतोष तायवाडे, वय ५० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत सुधाकर मारोतराव वाकेकर** यांचा मृत्यू दिनांक **१६.१०.२०२५** रोजी रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक प्रमिलाबाई सुधाकर वाकेकर** हिचा दि.**१२.०१.१९९४** रोजी रा.बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१५४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२५.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार



मा.सह **दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.९२/२०२६ ने.ता.२४.०४.२०२६

**अर्जदार :** १. ललिता सुनील मडावी, रा.जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती
२. उषा गणपतराव धुर्वे, रा.पहुर, ता.बाभुळगांव, जि.यवतमाळ
३. रेखा ज्ञानेश्वर मडावी रा.सुलतानपूर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. निर्मला मारोतराव करपाती, रा.रई, ता.जि.यवतमाळ
५. ज्ञानेश्वर मारोतराव करपाती, रा.रई, ता.जि.यवतमाळ

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **अन्नपूर्णा रामवरावजी सिडाम** यांचा मृत्यू दि.**०८.०४.२०२१** रोजी येथे झाला अर्जदार नं.१ ते ४ ह्या मुली आहेत व अर्जदार नं.५ हा मयत शकुंतला मारोतराव करपती यांचा मुलगा आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर



## कागदपत्र हरवले

मी दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास नवसारी ते पंचवटी रोड अमरावती येथे जात असताना. माझ्या जवळील प्लॅस्टिक पिशवी हरवली त्या पिशवीमध्ये महत्त्वाचे कागदपत्र होते.

दिनांक ३०/ ६ / २०१६ रोजी तयार केलेला मूळ परस्पर आपसी वाटणी पत्राचा लेख जो माझे मयत वडील विश्वासराव मोतीरामजी लेव्हरकर व विनोद विश्वासराव लेव्हरकर यांच्यामध्ये करण्यात आला होता.
सापडल्यास कृपया संपर्क करावा.
योग्य बक्षीस देण्यात आले.

**प्रमोद विश्वासराव लेव्हरकर**
**रेखा कॉलनी ,अमरावती**
**मो ९५१८३०३८२४**

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १३१ ■ बुधवार, ८ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


अखेर... खासदारांच्या प्रयत्नाला यश

# ३० वर्षे झोपलेले सरकार, काळेंनी एका वर्षात खेळ फिरवला

### पुलगाव-आर्वी-वरूड रेल्वेला निधी; खासदार अमर काळे यांची दमदार बाजी

**वर्धा जनमाध्यम :** तीन दशकांपासून रखडलेला पुलगाव-आर्वी-वरूड रेल्वे मार्ग अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने सरकला आहे. या मार्गासाठी केंद्र सरकारने अर्थसंकल्पात २.४९ कोटी रुपयांची तरतूद करत हिरवा कंदील दाखवला आहे. खासदार अमर काळे यांच्या हट्ट, पाठपुरावा आणि थेट दिल्ली दरबारातील दबावामुळेच हा 'झोपलेला' प्रश्न जागा झाल्याची चर्चा रंगली आहे.

पुलगाव-आर्वी ही नॅरोगेज रेल्वे १९१७ पासून धावत होती. मात्र २००५ मध्ये अचानक बंद पडली आणि आर्वी, आष्टी, कारंजा भाग अक्षरशः रेल्वेपासून तोडला गेला. कापसाच्या मोठ्या बाजारपेठेला रेल्वेचा आधारच गेला. लोकांनी अनेकदा मागण्या केल्या, आंदोलने झाली, पण सरकारच्या फाइल्स हलत नव्हत्या.

मात्र २०२४ मध्ये खासदार झाल्यानंतर अमर काळे यांनी हा मुद्दा पकडला आणि सोडला नाही. लोकसभेत प्रश्न, मंत्र्यांना पत्रे, दिल्लीत सतत भेटीगाठी या सगळ्याचा 'प्रेशर' शेवटी कामाला आला. रेल्वे मंत्री अश्विनी वैश्नव यांनी या प्रकल्पाला तत्वतः मंजुरी दिली,



तर संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्यापर्यंतही हा मुद्दा पोहोचवण्यात आला.

या मार्गाला राष्ट्रीय सुरक्षेचाही कोन जोडला गेला. पुलगाव-नागपूर-आमला मार्ग लांब आणि कमी सुरक्षित असल्याचे सांगत पुलगाव-आर्वी-वरूड-आमला हा पर्याय अधिक योग्य असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. यामुळे केंद्र सरकारलाही या प्रकल्पाचे महत्त्व पटले.

सर्वात मोठी बाब म्हणजे, या मार्गासाठी आधीच बहुतांश पायाभूत सुविधा तयार आहेत. त्यामुळे भूसंपादनाचा अडथळा नाही. सर्वेक्षण, स्टेशन निश्चिती यासारखी कामेही पूर्ण झाल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे काम प्रत्यक्ष सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


या रेल्वेमुळे वर्धा ते आमला अंतर तब्बल १०५ किलोमीटरने कमी होणार आहे. कापूस, शेतीमाल आणि प्रवासी वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. आर्वी, आष्टी, कारंजा आणि वरूड भागासाठी ही रेल्वे 'लाईफलाइन' ठरणार आहे.

एकेकाळी 'अशक्य' वाटणारा हा प्रकल्प आता प्रत्यक्षात उतरण्याच्या मार्गावर आहे. जनतेच्या पाठिंब्यावर खासदार अमर काळे यांनी हा लढा जिंकला, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. आता पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या हस्ते या रेल्वेचे लोकार्पण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इतवारात पहाटे भीषण आग; चार दुकाने खाक, लाखोंचा माल राख

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील इतवारा फ्रूट मार्केट परिसरात मंगळवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत चार दुकाने जळून खाक झाली. फळ, भंगार आणि मसाल्यांच्या दुकानांतील सर्व माल आगीत भस्मसात झाल्याने व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अचानक भडकलेल्या आगीमुळे परिसरात एकच गोंधळ उडाला, तर प्रशासनाच्या ढिसाळ व्यवस्थेवर संताप व्यक्त केला जात आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास बाजारात अचानक आगीच्या ज्वाळा उसळताना दिसल्या. काही मिनिटांतच आगीने भीषण रूप घेत शेजारील दुकानांनाही आपल्या विळख्यात घेतले. पहाटेच्या शांततेत उठलेल्या या आगीने नागरिकांना हादरवून सोडले. लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाला कळवण्यात आले. मात्र, घटनास्थळी अग्निशमन बंब वेळेवर न पोहोचल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. व्यापारी आणि स्थानिकांनीच पुढाकार घेत बोअरवेलच्या पाण्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. नंतर अग्निशमन दल पोहोचल्यावर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले.

या आगीत छमू शेख, रवी चावरे, शकील रिजवी, हरीश केवढे आणि शेख शोएब यांची दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली. दुकानांमधील सर्व माल कोळसा झाल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.

### व्यापाऱ्यांनीच आणला बंब

घटनेच्या वेळी अग्निशमन बंब उपलब्ध नसल्याचे समोर आले. नगर परिषदेकडे संपर्क साधला असता बंब इंझापूर येथील डम्पिंग यार्डमध्ये असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे व्यापाऱ्यांनी स्वतःच तो बंब घटनास्थळी आणला. अग्निशमन दल येण्याआधीच नागरिकांनी आग विझवण्यासाठी जीवाची बाजी लावली. अभिजीत त्रिवेदी, परवेज खान, इमरान कैसर, मलिक, अब्दुल रफिक, सोनू कांबळे, कमर अली, शुभम आदींनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मदत केली. वेळीच अग्निशमन बंब उपलब्ध असता तर नुकसान कमी झाले असते, अशी भावना व्यापाऱ्यांमध्ये आहे. कर आकारायला पुढे, पण संकटात प्रशासन गायब, अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे. सामूहिक प्रयत्नांमुळे मोठी दुर्घटना टळली, पण चार व्यापाऱ्यांचे संसार राख झाले. इतवाऱ्यातील ही आग केवळ दुर्घटना नाही, तर प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा जळता पुरावा ठरत आहे.

# दारूबंदी जिल्ह्यात दारूचा पूरः कायदा कागदावर, धंदा मैदानावर

### वॉशआऊटमध्ये कोटींचा माल जप्त; तरीही माफियांचा उन्माद कायम



**वर्धा जनमाध्यम :** दारूबंदीचा शिक्का असलेल्या वर्धा जिल्ह्यातच दारूचा पूर उसळल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. कागदोपत्री बंदी असली तरी गावठीपासून ते नामांकित ब्रँडपर्यंत दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याने कायद्याची उघडपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर ६ एप्रिल रोजी पोलिसांनी राबविलेल्या 'वॉशआऊट' मोहिमेत मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दारूबंदी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ११० आरोपींवर १०८ गुन्हे दाखल करण्यात आले. या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असले तरी, या धंद्याचे खोलवर रुजलेले जाळे पुन्हा उघड झाले आहे. या मोहिमेला पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. ४ उपविभागीय अधिकारी, १९ ठाणेदार आणि तब्बल २५१ पोलिस कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे कारवाई करत जिल्ह्यातील १९ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकले.

**दारूबंदीचा फज्जा उडाला!**

वर्धा जिल्हा दारूबंदीचा आदर्श म्हणून ओळखला जात असताना, प्रत्यक्षात मात्र अवैध दारूचा सुळसुळाट सुरू असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. 'दारूबंदी आहे की फक्त नावापुरती असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

**कारवाई एक दिवसाची, धंदा रोजचा!**

पोलिसांनी केलेली 'वॉशआऊट' मोहीम कौतुकास्पद असली तरी ती केवळ एकदाच मर्यादित राहिली तर त्याचा परिणाम अल्पकाळ टिकेल, अशी भीती व्यक्त होत आहे. अवैध दारूचा व्यवसाय इतका खोलवर रुजला आहे की, तो पूर्णपणे नष्ट करण्यासाठी सातत्याने आणि कठोर कारवाईची गरज आहे.

**सरकारला प्रश्न...**

दारूबंदीचा कायदा आहे, पण अंमलबजावणी कुठे ?

कोटींचा माल सापडतो, मग रोज किती विक्री होते, ?

**माफियांना संरक्षण कोण देतंय?**

वर्ध्यातील ही परिस्थिती दारूबंदीच्या धोरणावरच प्रश्नचिन्ह उभी करत आहे.

**आता प्रश्न एकच**

दारूबंदीचा कायदा वाचणार, की माफियांचा धंदाच चालणार,

# सिंदी पालिका उपाध्यक्षांच्या गाडीचा अपघात; दोघे गंभीर जखमी

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** येथील नगरपालिकेचे उपाध्यक्ष अकील भाई शेख यांच्या चारचाकी वाहनाचा नागपूर–चंद्रपूर महामार्गावर भीषण अपघात झाला. सोमवारी (ता.६) रात्री १० ते ११ वाजण्याच्या सुमारास नागपूर जिल्ह्यातील सोनेगावजवळ ही घटना घडली. या अपघातात उपाध्यक्षांसह त्यांचे मित्र मुकेश डोळसकर हे दोघे गंभीर जखमी झाले.

अपघाताची तीव्रता इतकी होती की वाहनाचे मोठे नुकसान झाले. अपघाताच्या वेळी गाडीत हे दोघेच प्रवास करत होते. दरम्यान, महामार्गावरून जाणाऱ्या एका वाहनचालकाने तत्काळ मदत करत दोघांना सिंदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.

प्राथमिक उपचारांनंतर जखमींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने नागपूर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. सध्या दोघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांकडून मिळाली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. ही घटना नागपूर जिल्ह्यातील बेला पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने पुढील तपास पोलीस करत आहेत.

# देवळी बसस्थानकात वृद्ध महिला बसच्या चाकाखाली; दोन्ही पाय निकामी

**देवळी जनमाध्यम :** देवळी बसस्थानकावर मंगळवार सकाळी सुमारे ११ वाजताच्या दरम्यान भयानक अपघात घडला. नागझरी येथील ७० वर्षीय शकुंतला चोखोबा पाटील बसच्या मागील चाकाखाली आल्या. या अपघातात त्यांचे दोन्ही पाय गंभीरपणे जखमी झाले आणि दोन्ही पाय निकामी होण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून यवतमाळकडे जाणारी बस (MH14MH2733) देवळी बसस्थानकात येत असताना शकुंतला पाटील बसच्या मागील बाजूस धडकून खाली पडल्या. नंतर बसच्या मागील चाकाखाली आल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली.तत्काळ उपचारासाठी वृद्ध महिला वर्धा येथील रुग्णालयात दाखल करण्यात





आल्या. गंभीर प्रकृती लक्षात घेता त्यांना सेवाग्राम आणि नंतर नागपूरमध्ये पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.

या घटनेनंतर बस चालक प्रदीप शिरसाट (रा. नाचणगाव) यांच्याविरुद्ध देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन साक्षीदारांची माहिती गोळा केली आहे. चालकाच्या जबाबदारीची चौकशी सुरू करण्यात आली आहे,

घटनेचा तपास ठाणेदार अमोल मंडाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली एएसआय किशोर साखरे, पोलीस हवालदार स्वप्निल वाटकर आणि धर्मेंद्र गिरी हे करत आहेत.

# मनरेगा निधी अपहारः ४ बीडीओ, ३ एएओंच्या विरोधात चौकशी सुरू

## इंट्रोगेशनदरम्यान संशयितांचा घाम फाटण्याची तयारी

**-गुन्ह्यातील इतर आरोपींविरुद्ध कठोर कारवाई होईल**

**-राष्ट्रपती दौ-यामुळे तपासाची गती थोडी मंदावला**

**वर्धा जनमाध्यम –** आर्वी पंचायत समितीत घडलेल्या मनरेगा निधी अपहार प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने अलीकडेच ४ गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि ३ सहाय्यक लेखा अधिकारी (एएओ) यांचे बयाण नोंदविले आहे. यामध्ये एका सेवानिवृत्त बीडीओचा समावेश असून, बराच काळ प्रभारी बीडीओ म्हणून काम केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश देखील आहे.

आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासाचा पुढचा टप्पा म्हणजे इंट्रोगेशन, ज्यात बयाण दिलेल्या काही संशयितांना चौकशीसाठी बोलावले जाणार आहे. तपासाच्या या प्रक्रियेदरम्यान अटकेची तलवार मानेवर असल्यामुळे संशयितांना घाम फुटण्याची स्थिती निर्माण होईल, असे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले.

सध्या या प्रकरणी आतापर्यंत दोघींना अटक झाली आहे. त्यापैकी तक्रारदार असलेल्या महिला गटविकास अधिकारी जामिनावर बाहेर आहेत. मार्च आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासाला गती देण्यात आली, आणि या टप्प्यात ४ बीडीओ आणि ३ एएओंचे बयाण नोंदविले गेले.

**राष्ट्रपती दौ-यामुळे तपास मंदावला**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू वर्धा दौ-यावर येत आहेत. त्यामुळे जिल्हा पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी विविध कामांमध्ये व्यस्त असल्याने मनरेगा निधी अपहार प्रकरणाचा तपास थोडा मंदावला आहे.

काही जबाबदाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांवरही सोपविल्या गेल्याने प्रकरणाची गती कमी झाली आहे.

**इंट्रोगेशन म्हणजे काय?**

इंट्रोगेशन म्हणजे एखाद्या संशयिताची पोलिस किंवा तपास अधिकाऱ्याद्वारे सखोल चौकशी करणे होय. गुन्ह्याशी संबंधित माहिती मिळवण्यासाठी, कबुली घेण्यासाठी किंवा सत्य शोधण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये अनेक प्रश्नांची सरबत्ती केली जाते आणि कधी कधी दबाव किंवा युक्तीचा वापरही केला जातो.

**तपासाची पुढची टप्प्ये**


आर्थिक गुन्हे शाखा आता बयाण दिलेल्या संशयितांना इंट्रोगेशनसाठी बोलावणार आहे. यामुळे अटकेची धमकी प्रत्येक संशयितावर राहणार आहे. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार गुन्ह्यातील इतर आरोपींविरुद्ध कठोर पावले उचलली जातील, असा विश्वास तपास अधिकाऱ्यांमध्ये आहे.

# मृत्यूच्या दारातून हात परत : मायक्रोव्हॅस्क्युलर शस्त्रक्रियेत डॉक्टरांचा चमत्कार

### इलेक्ट्रिशियनचा कापलेला हात वाचला

**वर्धा जनमाध्यम :** वर्ध्यातील सावंगी येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात (एव्हीबीआरएच) मायक्रोव्हॅस्क्युलर शस्त्रक्रियेत ४० वर्षीय इलेक्ट्रिशियनचा कापलेला हात वाचवण्यात डॉक्टरांना यश मिळाले.

राहत्या घरी लाकडी ब्लॉक कापत असताना इलेक्ट्रिक सॉमुळे त्याचा डावा हात गंभीरपणे जखमी झाला. तळव्याच्या सर्व स्नायू, रक्तवाहिन्या आणि नसा कापल्या गेल्याने हात वाचण्याचा धोका निर्माण झाला होता. प्राथमिक उपचारानंतर रुग्णाला सावंगीतील एव्हीबीआरएच येथे हलवण्यात आले.



प्लास्टिक सर्जरी विभागाचे डॉ. फिरोज बोरले आणि त्यांच्या टीमने तातडीने रुग्णाची तपासणी करून आपत्कालीन शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. पहाटे ४ वाजेपर्यंत पाच तास चाललेल्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेत मायक्रोस्कोपच्या साहाय्याने कापलेले स्नायू, धमन्या, शिरा आणि नसा बारकाईने जोडल्या गेल्या. या उपचारामुळे हातात पुन्हा रक्तपुरवठा सुरू झाला आणि कार्यक्षमता वाचवण्यात यश मिळाले.

# आरटीई प्रवेश : पालकांचे मनस्ताप वाढले; पाल्याची निवड कळण्याची वाट पाहावी लागणार

## -११३ शाळांनी नोंदणी केली; १,३९० विद्यार्थी लाभार्थी

**वर्धा जनमाध्यम :** आरटीई २५ऽ प्रवेश प्रक्रियेत गरीब व गरजूंच्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत प्रवेश मिळवण्यासाठी सोडत (लकी ड्रॉ) प्रक्रिया सोमवार, ६ एप्रिल रोजी पूर्ण झाली. मात्र, ७ एप्रिल दुपारी ४.३० वाजेपर्यंत कोणाचा पाल्य निवडला गेला, याची माहिती आरटीई अधिकृत संकेतस्थळावर जाहीर केलेली नव्हती. परिणामी पालकांना आपल्या पाल्याची निवड आरटीई अंतर्गत झाली की नाही, हे सहज कळू शकत नव्हते.

शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, १० एप्रिलपासून पालकांना निवडले गेलेल्या शाळेत प्रवेशासाठी मॅसेज पाठविले जाईल. यंदा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आरटीई प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीला १ किमीची अंतरमर्यादा निश्चित करण्यात आली होती, परंतु नंतर न्यायालयाच्या आदेशानुसार ती बदलण्यात आली.

**ठळक आकडेवारी**

११३: शाळांनी नोंदणी केली

१,३९०:आरटीई अंतर्गत जागा

३,९८४:ऑनलाईन अर्ज प्राप्त

जिल्ह्यातील ११३ शाळांनी नोंदणी केली असून, आरटीई अंतर्गत १,३९० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. यंदा ३,९८४ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले असून, मुदत वाढीमुळे मोठ्या संख्येने पालकांनी अर्ज केला आहे. सोडत प्रक्रिया सोमवार, ६ एप्रिल रोजी प्रत्यक्षात पार पडली असली, तरी आरटीई संकेतस्थळावर कुणाचा नंबर लागला, याची माहिती जाहीर न झाल्यामुळे पालकांचा मनस्ताप वाढला आहे.

पुणे येथील शिक्षण सचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी एक पत्र निर्गमित करून सांगितले की, निवड यादी १० एप्रिल २०२६ ला जाहीर केल्यानंतर पालकांना १० एप्रिल ते २० एप्रिल २०२६ पर्यंत प्रवेशासाठी लिंक उपलब्ध करून दिली जाईल. वरिष्ठ तांत्रिक संचालक आदिती एकबोटे यांना याची सूचना देण्यात आली आहे.


MAHAVITARAN

**E-TENDER NOTICE**

Proposals are invited on e-tender by this office from registered & experienced Firms/Contractors in the prescribed Tender form **for Preventive Maintenance of Substation in Wardha_Circle Nagpur Zone. Tender No. SE/WRD/Tech/26-27/PMSS/T-05**

The e-tenders can be downloaded from Our website www.mahadiscom.in or http://etender.mahadiscom.in/eatApp after payment of requisite Tender fee ONLINE only. Tenders can be downloaded from **08.04.2026 to 15.04.2026**, The Pre Bid Meeting on Dt. 10.04.2026 at 15:00 Hrs. The last date of tender submission is 15.04.2026 at 15.00 Hrs. & Tender will be opened on Dt. 15.04.2026, at 16.00 Hrs. if possible. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc., if any shall be available in our website only and will not be published in the News Papers separately. Contact person: - Executive Engineer (Adm) Mobile No. **7875761027**

**NZ PRO No. 66/2026 Dt.07.04.2026** **Sd/-**

**Superintending Engineer, O&M, Circle, MSEDCL, Wardha.**



जा/क/ ८७२/ २०२६,
दि, २७/०३/२०२६

पत्ता - सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय राजेश नरहरशेट्टीवार यांची इमारत दुसरा माळा हिरो शोरूम च्या मागे मोहन नगर नागपूर रोड वर्धा,

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक ९० / २६ कलम १९

अर्जदार श्री मारोती शिवराम सहारे, सार्वजनिक न्यासाचे नाव व नोदणी कमाक लक्ष्मीमाता मंदिर समिती हिंगणघाट ता. हिंगणघाट जि, वर्धा, सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे तर जमूद केलेल्या नोदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये स्वालील मुद्यावर चौकशी करणार आहेत

(१) वर जमुद केलेला न्यास अस्तिवात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत ४५००/- मारोती शिवराम सहारे यांच्याकडे जमा आहे स्थावर मिळकत (वर्णन) जिरंक

सदस्च्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाने आत या कार्यालयाते वरील पत्यावर मिळेत अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व नोदणी अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील,

हि नोटीस माझे सहीनिशी व मा सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक २७/०३/२०२६, रोजी दिली

**अधिक्षक**

**(न्याय शाखा) सार्वजनिक न्यास नोदणी कार्यालय,**

**वर्धा विभाग, वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मेट्रो लाईन-९ चा पहिला टप्पा सुरू

## मुंबई-मीरा-भाईंदर प्रवास होणार जलद-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** दहिसर पूर्व ते काशीगाव या ४.७ किलोमीटर लांबीच्या मार्गिकेवर चार स्थानकांसह आजपासून मेट्रो सेवा सुरू झाली आहे. यामुळे मुंबई आणि मीरा-भाईंदर हा प्रवास जलद होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मेट्रो लाईन-९ च्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार, बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या महापौर रितू तावडे, आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय उपाध्याय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे आयुक्त संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या टप्प्यात दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मीरागाव आणि काशीगाव अशी स्थानके असून, ही मेट्रो लाईन-७ शी जोडली गेल्याने प्रवाशांना अधिक चांगली कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. दुस-या टप्प्यात साईबाबा नगर ते सुभाषचंद्र बोस मैदान या मार्गाचे काम ९६ टक्के पूर्ण झाले असून, याच वर्षात त्याचेही उद्घाटन करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सुमारे ६,६०७ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे सध्या एक ते दोन तास लागणारा प्रवास केवळ ३० मिनिटांत पूर्ण होणार आहे. पुढील टप्प्यांमध्ये ही मेट्रो लाईन-३ शी जोडली जाणार असून, मीराभाईंदर ते कुलाबा दरम्यान सीमलेस प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

मेट्रो सेवेत कॅशलेस व्यवहाराला प्राधान्य देण्यात आले असून, सध्या ८० टक्के तिकीट व्यवहार डिजिटल पद्धतीने होत आहेत. स्मार्ट कार्ड आणि वन कार्ड प्रणालीमुळे एकात्मिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळत आहे. हा प्रकल्प सौर उर्जा, रेन वाटर हार्वेस्टिंग, एलईडी लाईटिंग आणि रिजेनरेटिव्ह ब्रेकिंग यांसारख्या तंत्रज्ञानामुळे हरित प्रकल्प ठरत आहे. तसेच नागपूरप्रमाणेच मेट्रो आणि फ्लायओव्हर एका पिलरवर उभारण्याची डबल डेकर रचना येथेही वापरण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. सध्या मुंबईत १०० किलोमीटरहून अधिक मेट्रो मार्ग कार्यान्वित झाले असून, देशात दिल्ली नंतर मुंबई दुस-या क्रमांकावर पोहोचली आहे. पुढील काही वर्षांत आणखी प्रकल्प पूर्ण होउन मुंबईतील मेट्रो जाळे अधिक विस्तारणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी एमएमआरडीए, संबंधित महानगरपालिका, कंत्राटदार आणि मजूर यांचे योगदानाबद्दल आभार मानून ही मेट्रो सेवा मुंबईकरांना समर्पित केली असल्याची घोषणा केली.

**मुंबई-एमएमआर कनेक्टिव्हिटीला मोठी चालना-** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दहिसर ते काशीगाव दरम्यानच्या मेट्रोच्या पहिल्या टप्प्याच्या उद्घाटनामुळे मुंबई आणि एमएमआर परिसरातील कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळाली असून हा दिवस दहिसर व मीरा-भाईंदरमधील नागरिकांसाठी ऐतिहासिक ठरल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.ही मेट्रो दहिसर स्थानकावरून मेट्रो २अ आणि मेट्रो ७ शी जोडली गेली असून पुढील काळात मेट्रो ७अ मेट्रो ३ द्वारे कुलाबा आणि छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय एअरपोर्ट थेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात एकात्मिक मेट्रो जाळे तयार होणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

राज्यातील मेट्रो नेटवर्क सध्या १०१ किलोमीटरपर्यंत पोहोचले असून भविष्यात ते ३३७ किलोमीटरपर्यंत विस्तारण्याचे उद्दिष्ट आहे. हे नेटवर्क पूर्ण झाल्यानंतर मुंबईचे मेट्रो जाळे जगातील अग्रगण्य ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

मेट्रो प्रकल्पामुळे रस्त्यावरील वाहतूक २० ते ३० टक्क्यांनी कमी होईल, इंधन बचत होईल, प्रदूषण घटेल आणि नागरिकांचा वेळ वाचेल. त्यामुळे कामकाजाची कार्यक्षमता वाढून नागरिकांना कुटुंबासाठी अधिक वेळ देता येईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रकल्प पूर्ण करण्यासाठी भूमी संपादन व पुनर्वसनासारखी आव्हाने पार करत शासनाने गतीने काम केल्याचे सांगून त्यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांचे अभिनंदन केले. हा लोकहिताचा प्रकल्प असून नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. मुंबईकरांसाठी ही मेट्रो मोठी दिलासा देणारी ठरणार असून भविष्यात संपूर्ण एमएमआर परिसरातील प्रवास अधिक सुलभ आणि वेगवान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दहिसर पूर्व ते काशीगाव या मेट्रो ९ प्रकल्पाचे लोकार्पण केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासह अनेक मान्यवरांनी मेट्रोने प्रवास केला.

## शालेय सहलींतून एसटीला मिळाले १२७ कोटींचे उत्पन्न

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय सहलींसाठी २५ हजार ५५८ बस फे-यांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक करत तब्बल १२७ कोटी १८ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक असून, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित सहलींसाठी एसटीशिवाय पर्याय नाही, असे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.मंत्री सरनाईक म्हणाले, शालेय सहल हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील एक हळवा आणि संस्मरणीय अनुभव असतो. शैक्षणिक वर्षात विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांकडून सहली आयोजित केल्या जातात. या सहली एसटीच्या माध्यमातून आयोजित केल्यास विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यात शासनाकडून ५० टक्के सवलत दिली जाते. त्यामुळे एसटीमार्फत आयोजित सहली सुरक्षित, विश्वासार्ह आणि माफक दरात उपलब्ध होतात. विशेषतः ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थीना याचा मोठा लाभ होतो. यंदाच्या शैक्षणिक वर्षात राज्यभरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या मागणीनुसार एसटी महामंडळाने तब्बल २५ हजार ५५८ बस फे-या उपलब्ध करून दिल्या. या फे-यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांनी विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी देत सुरक्षित आणि सुखकर प्रवास केला. या उपक्रमातून महामंडळाला १२७ कोटी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, ते मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक आहे.यावर्षी बहुतांश शालेय सहलींसाठी एसटीने नव्या आणि अद्ययावत बसेस उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, आरामदायी आणि समाधानकारक झाला असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. भविष्यातही शालेय सहलींसाठी एसटी बसेस वेळोवेळी उपलब्ध करून दिल्या जातील.

*महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी महावितरणची आर्थिक पुनर्रचना*

## महावितरणचा आयपीओ येणार
## कृषी वीज पुरवठ्यासाठी स्वतंत्र वितरण कंपनी

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) कंपनीचे औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती व इतर सर्व बिगर कृषी ग्राहकांसाठीची वितरण संस्था आणि कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसईबी सोलार अग्रो पावर लिमिटेड (एमएसएपीएल) असे विभाजन करून दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

**भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास मान्यता**

बिगर कृषी वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीने विविध पायाभूत योजनांसाठी घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी आहे. या कर्ज दायित्वापोटी महाराष्ट्र शासन पंधरा वर्षे मुदतीचे दीर्घकालिन सरकारी रोखे जारी करणार आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा कमी होउन आर्थिक स्थिती आणखी चांगली होण्यास मदत होणार आहे.

**आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी पुनर्रचना**

राज्यातील ग्राहकांना उर्जा सुरक्षा आणि गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात येणार आहे. उर्जा क्षेत्रातील बाजारपेठीय संधीचा लाभ घेण्यासाठी अशा दोन कंपन्यांची निर्मिती केली जाईल. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या शिफारशी तसेच मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना २.० च्या धोरणात्मक उद्दिष्टानुसार एमएसईबी सोलार ॲग्रो पावर लिमिटेड ही कंपनी ३१ मे २०२३ रोजी स्थापन करण्यात आली आहे. या कंपनीच्या माध्यमातून शेतीसाठीच्या वीज पुरवठ्याचे नियोजन आणि सौर उर्जेवर आधारित कृषि उर्जा प्रणाली विकसित करण्यासाठी संस्थात्मक आधारभूत रचना निर्माण होणार आहे.

**राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्यांकडून-**महावितरणाच्या आर्थिक पुनर्रचनेनंतर राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्याकडून केले जाईल. यात कृषी वितरण संस्था म्हणजेच एमएसईबी सोलार ॲग्रो प?वर लिमिटेड- एमसएएपीएल कंपनी केवळ कृषी ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देईल. तर अकृषिक वितरण संस्था म्हणजेच महावितरण औद्योगिक, वाणिज्यिक, घरगुती आणि इतर बिगर कृषी ग्राहकांना सेवा पुरवेल. या दोन्ही कंपन्यांचा वीज विक्री, महसूल व खर्चाचा तपशील यांचा लेखा-जोखा स्वतंत्रपणे मांडला जाईल. विभाजनानंतर सहा ते नउ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल.

## 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमत्र्यांच्या हस्ते शुभारंभ



**मुंबई/प्रतिनिधी :**जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणा-या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.राज्य शासनाने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्तआणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

## इस्त्रायलकडून इराणी नागरिकांना रेल्वेगाड्या, रेल्वे रुळांपासून दूर राहण्याचा इशारा

**जेरु सलेम//वृत्तसंस्था :**अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस अधिक भयावह होत चालला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला बुधवार सकाळपर्यंत उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली आहे. दरम्यान, इस्त्रायलने इराणी नागरिकांना रेल्वेने प्रवास करू नये असा इशारा दिला आहे.इस्त्रायली सैन्याने इराणी नागरिकांना सावध करत सांगितले की, रेल्वेमध्ये किंवा रेल्वे मार्गांच्या आसपास त्यांची उपस्थिती त्यांच्या जीवासाठी धोकादायक ठरू शकते. इस्त्रायली सैन्याने फारसी भाषेत जारी केलेल्या इशा-यात म्हटले आहे, तुमच्या सुरक्षेसाठी आम्ही विनंती करतो की, आतापासून इराणच्या वेळेनुसार रात्री ९ वाजेपर्यंत देशभरात रेल्वेचा वापर किंवा रेल्वेने प्रवास टाळावा. दरम्यान, तेहरान प्रशासनाने अनेक आठवड्यांपासून संपूर्ण इराणमध्ये इंटरनेट सेवा बंद ठेवली आहे, त्यामुळे इशारे आणि माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे कठीण झाले आहे. मात्र, इराणबाहेरून कार्यरत फारसी भाषेतील सॅटेलाइट नेटवर्कद्वारे अशा बातम्या प्रसारित होत असून त्यातून माहिती इराणमध्ये पोहोचत आहे. मंगळवारी पहाटे इस्त्रायलने इराणवर हल्ल्यांची नवी मालिका सुरू केली, तर त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल आणि त्याच्या खाडीतील अरब शेजारी देशांवर क्षेपणास्त्र हल्ले केले.इराणने ट्रम्प यांनी सुचवलेला युद्धविराम प्रस्ताव फेटाळून लावल्यानंतर ट्रम्प यांनी ४८ तासांत इराणला उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली होती. त्यांनी इराणमधील वीज प्रकल्प आणि पूल लक्ष्य करण्याचा इशाराही दिला होता. आता ट्रम्प यांनी दिलेली मुदत संपत आली असून, इस्त्रायली सैन्याच्या ताज्या इशा-यामुळे युद्धाची शक्यता आणखी वाढली आहे.



# इराणविरोधी कठोर वक्तव्यामुळे डोनाल्ड ट्रम्प पुन्हा वादात

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा आपल्या वक्तव्यामुळे वादाच्या भोव-यात सापडले आहेत. यावेळी वाद त्यांच्या त्या सोशल मीडिया पोस्टमुळे निर्माण झाला आहे, ज्यामध्ये त्यांनी इराणबाबत अत्यंत कठोर आणि आक्षेपार्ह भाषा वापरली होती. ट्रम्प यांनी म्हटले होते की, जर इराणने युद्ध समाप्त करण्यासाठी करार केला नाही, तर त्याला प्रचंड विध्वंसाचा सामना करावा लागेल.

या वक्तव्यानंतर पत्रकारांनी त्यांच्यावर होत असलेल्या टीकेबाबत प्रश्न विचारला असता, ट्रम्प यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की त्यांना टीकाकारांची अजिबात पर्वा नाही. त्यांनी म्हटले, मला टीकाकारांची काहीही पर्वा नाही. काही लोक त्यांच्या मानसिक आरोग्यावर प्रश्न उपस्थित करत असल्याबाबत विचारले असता त्यांनी तेही दुर्लक्षित करत म्हटले की, जर असे असेल तर देशाला त्यांच्या सारख्या आणखी लोकांची गरज आहे.ट्रम्प यांनी आपल्या बचावात सांगितले की, ते राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी अमेरिकेला व्यापारासह अनेक क्षेत्रांत नुकसान सहन करावे लागत होते, मात्र त्यांनी सत्तेत आल्यानंतर परिस्थिती बदलली. त्यांच्या मते, त्यांची कठोर धोरणे आणि आक्रमक वक्तव्ये ही अमेरिकेच्या हितासाठीच आहेत. मात्र, त्यांच्या या विधानानंतर विरोधक आणि अनेक टीकाकारांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. विशेषत? ईस्टरच्या दिवशी केलेल्या त्यांच्या सोशल मीडिया पोस्टला अनेकांनी घृणास्पद आणि अशोभनीय म्हटले. काही नेत्यांनी तर त्यांच्या मंत्रिमंडळाने अमेरिकेच्या संविधानातील २५व्या दुरुस्तीचा वापर करून त्यांना पदावरून हटवण्याचा विचार करावा, अशी मागणीही केली.या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर



राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, निर्णय त्यांच्या हातात असता तर अमेरिका इराणच्या तेलावर ताबा मिळवू शकली असती, कारण ते स्वत?ला प्रथम एक व्यावसायिक (बिझनेसमन) मानतात. व्हाइट हाउसमधील पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, अमेरिका यापूर्वी व्हेनेझुएलासोबत तेलासंदर्भात भागीदारी केली आहे, त्यामुळे इराणच्या बाबतीतही तसे करता येउ शकते.त्यांनी असेही म्हटले की, युद्ध जिंकणा-याला त्याचा फायदा मिळायलाच हवा आणि अमेरिकेनेही त्याचा उपयोग केला पाहिजे. यावरून अमेरिकेची युद्धानंतर संसाधनांवर ताबा मिळवण्याची भूमिका बदलू शकते, असा स्पष्ट संकेत त्यांनी दिला. ट्रम्प यांनी पुढे सांगितले की, दुस-या महायुद्धानंतर अमेरिकेने इतर देशांना मदत केली, पण आता तसे करणे आवश्यक नाही.या दरम्यान ट्रम्प यांनी पुन्हा एकदा इराणला इशारा देत सांगितले की, करार करण्यासाठी मंगळवार रात्री ८ वाजेपर्यंत (भारतीय वेळेनुसार बुधवार सकाळी ५:३० वाजेपर्यंत) मुदत आहे. त्यांनी इशारा दिला की, या वेळेत करार झाला नाही तर इराणमध्ये ना पूल उरतील, ना वीज प्रकल्प आणि देश पाषाणयुगात पोहोचेल.ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, इराणने सुरुवातीला सात दिवसांची मुदत मागितली होती, पण अमेरिकेने त्यांना दहा दिवस दिले. आता ही अंतिम मुदत असून निर्णय इराणनेच घ्यायचा आहे. त्यांनी या कालावधीला अत्यंत महत्त्वाचा काळ असे संबोधले.राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी असा दावा केला की, २८ फेब्रुवारीला संघर्ष सुरू झाला तेव्हा इराण अधिक मजबूत होता, मात्र आता अमेरिका त्याला कमकुवत करण्यात यशस्वी झाली आहे. त्यांनी म्हटले की, गेल्या ४७ वर्षांत जे पाउल उचलले गेले पाहिजे होते, ते आता उचलले जात आहे.

## फिक्कीचा 99 वा स्थापना दिन साजरा

**मुंबई :** मध्य पूर्वेतील युद्धामुळे जगातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन बाधित झाले आहे. अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर युद्धामुळे विपरीत परिणाम होत आहे. शताब्दी वर्षात पदार्पण करीत असलेल्या फिक्की संस्थेने या युद्धामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर विशेषतः सेवा तसेच सूक्ष्म, लघु व माध्यम उद्योगांवर होणा-या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन करावे व नुकसान कमी करण्याच्या दृष्टीने शिफारसी कराव्या असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कामर्स अँड इंडस्ट्री (फिक्की) या संस्थेचा ९९ वा स्थापना दिवस राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते. युद्धामुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर देखील विपरीत परिणाम होत आहे. काही कंपन्यांनी मोठी कर्मचारी कपात केली आहे. युद्धाची झळ जनसामान्यांना बसू नये याकरिता शासन आपल्या स्तरावर सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. 'फिक्की'ने देखील लोकांच्या कौशल्य वर्धनासंबंधी शिफारशी कराव्या असे राज्यपालांनी सांगितले. फिक्कीने राज्यातील विद्यापीठांसोबत काम करावे तसेच स्नातकांसाठी प्रशिक्षणाच्या संधी निर्माण कराव्या असे आवाहन देखील राज्यपालांनी यावेळी केले. भारत ही सर्वात जलद गतीने वाढत असलेली अर्थव्यवस्था असून राज्याचे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये योगदान सर्वाधिक असून राज्य थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीत सर्वात आघाडीवर आहे. राजशिष्टाचार विभागाने थेट परकीय गुंतवणूक वाढवण्यासाठी व देश विदेशातील महाराष्ट्राच्या लोकांना राज्याच्या अर्थव्यवस्थेशी जोडण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा गांधी यांच्या सूचनेवरून फिक्की संस्थेची सुरुवात मुंबई येथे झाली. पुढील वर्षी फिक्की शताब्दी वर्ष साजरे करीत आहे, असे फिक्कीचे अध्यक्ष अनंत गोयंका यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते फिक्कीचे गेल्या तीस वर्षांमधील माजी अध्यक्ष राजीव भारती मित्तल, हर्ष पती सिंघानिया, राजीव चंद्रशेखर, हाबिलं खोराकीवाला, हर्ष मरीवाला, सरोज कुमार पोद्दार, ओंकार कंवल, डॉ. ए. सी. मुथैय्या, राजेंद्र लोढा, चिरायू अमीन, सुधीर जालान, के के मोदी, ए एस कासलीवाल, दीपक बँकर, ए. के. रुंगटा आदींचा त्यांच्या उद्योग जगातला दिलेल्या योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला.

## कुंभमेळ्यासाठी येणा-या भाविकांना सेवा देण्यास आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवा

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे होणा-या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणा-या भाविकांना आरोग्य सेवा देण्यास आरोग्य यंत्रणा पूर्णत? सज्ज ठेवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले .आरोग्य मंत्रालयातील समिती कक्षात आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्या जाणा-या आरोग्य सुविधाचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.यावेळी नाशिक परिमंडळातील आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की, यंदा सिंहस्थ पर्वणी निमित्त नाशिक मधील तेरा घाटावर अंदाजे १२ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकप्रतिनिधी, कुंभमेळा प्राधिकरण आणि विविध विभागांच्या समन्वयातून त्र्यंबक, रामकुंड, सीता गुंफा, साधू धाम, मुक्ती धाम व इतर धार्मिक स्थळावर आरोग्य सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात यावा. लवकरच स्वतः नाशिक येथे भेट देउन आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.सिंहस्थ पर्वणी काळात गर्दीमुळे संपर्क यंत्रणेत अडचणी निर्माण होउ नसे यासाठी आरोग्य विभागाने रुग्णसेवेसाठी वाकी-टाकीचा वापर करणे, त्याबाबतची माहिती अद्यावत ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण प्रणाली उभारण्याचे निर्देशही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिले. देशभरातून येणा-या भाविकांनी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय गैरसोय होउ नये याची काळजी घ्यावी. आरोग्य सेवा व्यवस्थापनासाठी विविध स्तरांवर जबाबदा-या निश्चित करण्यात आल्या आहेत.

## कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी जयपूर येथे पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषद

**मुंबई, दि. ७ :** पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषद ही केंद्र आणि राज्यांमधील समन्वय अधिक मजबूत करत शेती क्षेत्रासाठी ठोस दिशा देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. या माध्यमातून घेतलेले निर्णय थेट महाराष्ट्रातील शेतक-यांच्या प्रगतीस चालना देतील, असे मत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले. ते जयपूर येथे आयोजित पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेत बोलत होते. देशातील कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या क्षेत्रीय परिषदांच्या मालिकेची सुरुवात जयपूर येथे पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेद्वारे झाली. या परिषदेत महाराष्ट्रासह राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि गोवा राज्यांचे कृषी मंत्री आणि प्रतिनिधी सहभागी झाले. महाराष्ट्र शासन व कृषी विभागातर्फे राबविण्यात आलेले महाविस्तार अप, ॲग्रीस्टॅक व एआय धोरण यांचे या परिषदेत अनेकांनी कौतुक केले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परिषदेत केंद्र-राज्य समन्वय बळकट करणे, विविध कृषी योजनांचा आढावा घेणे तसेच आगामी खरीप हंगाम २०२६ साठी धोरण निश्चित करणे यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेताना ॲग्रिस्टॅक अंतर्गत १.३२ कोटी शेतक-यांची नोंदणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यात क्षेत्रातील आघाडीचा उल्लेख केला. २०२५-२६ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे राज्यातील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहितीही त्यांनी दिले. सुमारे १३६ लाख शेतकरी आणि १०५ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून राज्य शासनाने २०,१९६ कोटी रुपयांची मदत मंजूर असून यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष आभार त्यानी व्यक्त केले.

## महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) राबविण्यास मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र रिझिलन्स फायनान्सिंग प्रोग्राम या नवीन संकल्पनेला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते या कार्यक्रमांतर्गत जागतिक बँकेकडून मिळणा-या १६५ कोटी रूपये निधीचा आपत्तीत फटका बसलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी मदत होणार आहे. आपत्तीग्रस्तांना गृह कर्जात तसेच त्या परिसरातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना कर्जासाठी सवलत तसेच विमा सुरक्षा उपलब्ध होणार आहे. यात असंघटीत क्षेत्रातील कामगार तसेच महिला उद्योजक, बांधकाम, तसेच अन्य व्यावसायिक क्षेत्रातील छोट्या घटकांनाही मदत होणार आहे. यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्रा येथे अंमलबजावणी गट स्थापन करण्यात येणार आहे. पूर, उष्णतेची लाट, चक्रीवादळ अशा नैसर्गिक आपत्तीत या घटकांना वित्तीय सहायता करता येणार आहे. आपत्तींचा प्रभावी सामना करण्यासाठी विभाग, जिल्हा, शहर स्तरावरील प्रशासनांच्या प्रतिसाद क्षमता वाढविण्यासंदर्भात अंमलबजावणी गट म्हणून मित्रा संस्था काम करणार आहे. कोल्हापूर, सांगली, इचलकरंजी शहरांसह, कृष्णा खो-यातील पूराचा धोका कमी करण्यासाठी प्रतिबंधक आराखडे तयार करण्यात येतील. यात कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील कृष्णा व पंचगंगा नदी क्षेत्रातील कामांसाठी महाराष्ट्र मृद व जलसंधारण महामंडळ प्रकल्प अंमलबजावणी गट म्हणून काम करेल. या प्रकल्पांवरील देखरेखीसाठी आपत्ती व्यवस्थापन मंत्री व जलसंपदा मंत्री यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली प्रकल्प मूल्यांकन समिती स्थापन करण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

## अंगणवाडी कर्मचा-यांच्या मागण्यासंदर्भात शासन सकारात्मक

*महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे*

**मुंबई, दि. ७ :** अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या प्रलंबित मागण्या आणि समस्यांवर सखोल चर्चा करून सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेत मंत्रालय येथील दालनात अंगणवाडी कर्मचा-यांच्या विविध समस्यांसंदर्भात बैठक झाली. बैठकीत एकात्मिक बालविकास प्रकल्प आयुक्त माधवी सरदेशमुख, सहसचिव वि.रा.ठाकूर, अवर सचिव श्री. कुलकर्णी, भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष अनिल ढुमणे आणि अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, भरती प्रक्रियेसंदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने होणा-या विलंबामुळे पर्यवेक्षिका पदासाठीची वयोमर्यादा उलटून जाणा-या सेविकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. याशिवाय प्राथमिक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी आणि इतर सुविधा, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन योजना, वैद्यकीय सुविधा, भाउबीजऐवजी एक महिन्याचा पगार, रिक्त पदे भरणे, पदोन्नती आणि आजारपणाची रजा या मागण्यांवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

## संपादकीय


प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# डब्ल्यूटीओचे भविष्य अधांतरी

मध्य पूर्वेतील युद्धामुळे जागतिक अर्थकारण आणि व्यापारचक्र ऐतिहासिक संकटासमीप पोहोचले आहे. युद्धविरामासंदर्भातील चार वाक्येही भांडवली बाजाराची दिशा वेगाने बदलत आहेत. अशा चिंताजनक वातावरणात यूएईतील अबुधाबी येथे जागतिक व्यापार संघटनेची (डब्ल्यूटीओ) १४ वी मंत्रिस्तरीय परिषद नुकतीच पार पडली. संघटनेच्या स्थापनेपासून मंत्रिस्तरीय परिषद हे सर्वोच्च निर्णय घेणारे व्यासपीठ राहिले आहे. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या बैठकांमध्ये जागतिक व्यापाराच्या दिशा ठरवल्या जातात. 'डब्ल्यूटीओ'मध्ये १६६ सदस्य देश असून, जागतिक व्यापाराचे नियमन करण्यासाठी आणि मुक्त व्यापाराला चालना देण्यासाठी स्थापन झालेल्या या संघटनेने तीन दशकांचा टप्पा पार केला आहे. ही संघटना सुरुवातीपासूनच पाश्चिमात्य देशांच्या आणि प्रबळ सत्तांच्या प्रभावाखाली राहिली.आजही एकीकडे विकसित राष्ट्रांचा अजेंडा रेटण्याचा हट्ट आणि दुसरीकडे भारतासारख्या विकसनशील देशांनी अन्नसुरक्षेसाठी पुकारलेला एल्गार, अशा दोन टोकांच्या भूमिकांमुळे या संघटनेमध्ये एक प्रकारचे ध्रुवीकरण झालेले आहे. यंदाच्या मंत्रिस्तरीय परिषदेने तर जागतिकस्तरावर 'मतैक्य' किंवा 'कन्सेसस' हा शब्द केवळ नावापुरता उरला आहे, यावर शिक्कामोर्तब केले. सामर्थ्यवान देश आता सर्वांना सोबत घेण्याऐवजी आपल्या विरोधातील देशांना वळसा घालून स्वतःच्या हिताचे गट तयार करण्याला प्राधान्य देऊ लागले आहेत, ही बाब या बैठकीतून सुस्पष्ट झाली. ही प्रवृत्ती 'डब्ल्यूटीओ'च्या मूळ चौकटीला आणि तिच्या लोकशाही रचनेला तडा देणारी आहे. संघटनेत कोणत्याही निर्णयासाठी बहुमताचा वापर न करता सर्वसंमतीचा आधार घेतला जातो. या प्रक्रियेत प्रस्तावावर मतदान होत नाही. चर्चेदरम्यान उपस्थित कोणत्याही सदस्याने औपचारिकपणे विरोध दर्शवला नाही, तर तो प्रस्ताव सर्वसंमतीने मंजूर मानला जातो. याचा दुसरा अर्थ सर्वच देश प्रस्तावाच्या बाजूने नसले, तरी कोणाचाही त्याला कडाडून विरोध नाही. यामुळे जगातील सर्वात लहान देशालाही अमेरिकेसारख्या महासत्तेच्या प्रस्तावावर नकाराधिकार वापरण्याचा समान अधिकार मिळतो.एखादा नियम अशा पद्धतीने मान्य होतो, तेव्हा त्याला उच्च कायदेशीर वैधता प्राप्त होते आणि त्याची अंमलबजावणी सोपी होते. विकसित आणि विकसनशील देशांचे हितसंबंध जपले जावेत, हा यामागचा मूळ उद्देश आहे. मात्र, हीच पद्धत सध्या 'डब्ल्यूटीओ'च्या अपयशाचे प्रमुख कारण ठरत आहे. राष्ट्रा-राष्ट्रांमधील हितसंबंधांच्या प्राथमिकता बदलत चालल्याने आता सर्व देशांची संमती मिळवणे अशक्य होत आहे. परिणामी, बहुपक्षीय करारांची संकल्पना पुढे येत आहे. सामूहिक सहमतीची वाट न पाहता इच्छुक देश एकत्र येऊन स्वतःचे नियम बनवत असून, हा पायंडा घातक आहे. यंदाच्या बैठकीत डिजिटल ट्रान्समिशनवरील सीमा शुल्कबंदीची चर्चा सर्वाधिक झाली. अनेक वर्षांपासून इंटरनेटद्वारे होणाऱ्या व्यवहारांवर कर न लावण्याचे धोरण पाळले जात होते. अमेरिका आणि प्रगत देशांमध्ये तंत्रज्ञान कंपन्यांचे जाळे असल्यामुळे त्यांच्यासाठी ही एक मोठी बाजारपेठ आहे. साहजिकच, अमेरिकेने ही बंदी कायम ठेवण्यासाठी सर्व कसब पणाला लावले. मात्र, ब्राझील आणि तुर्कियेसारख्या देशांनी याला प्रखर विरोध दर्शवला. वाढत्या डिजिटल युगात यावरील कराचा अधिकार देशांकडे असायला हवा, अशी ब्राझीलची भूमिका आहे. या मुद्द्यावरून सर्व देशांची सहमती मिळवणे अशक्य आहे, हे लक्षात आले तेव्हा अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीयर यांनी, 'डब्ल्यूटीओ' आमसहमतीतून हा करार करू शकत नसेल, तर आम्ही बाहेर जाऊन इच्छुक देशांशी स्वतंत्र करार करू, अशी धमकी दिली. हे विधान जागतिक व्यापार व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. 'डब्ल्यूटीओ'च्या एकमताच्या तत्त्वाचा अपमान करणारे आहे.दुसरीकडे, चीन आपली आर्थिक सत्ता प्रस्थापित करण्यासाठी 'विकास आणि गुंतवणूक सुविधा करार' (आयएफडी) रेटण्याचा प्रयत्न करत होता. १६६ पैकी १२९ देशांनी याला पाठिंबा दिला असला, तरी भारताने नकाराधिकाराचा वापर करून ही खेळी उधळून लावली. डिजिटल क्रांतीच्या युगात आम्ही आमच्या महसुलावर पाणी का सोडावे, हा भारताचा सवाल रास्त आहे. तसेच, अशा करारांमुळे विकसनशील देशांच्या धोरणात्मक स्वायत्ततेवर गदा येऊ शकते. 'डब्ल्यूटीओ' हे व्यापारासाठीचे व्यासपीठ आहे, गुंतवणुकीचे नियम ठरवण्यासाठीचे नाही, अशी ठाम भूमिका भारताने बैठकीत मांडली. यानंतर चीननेही अमेरिकेप्रमाणेच आपल्या धोरणाशी सहमत असणाऱ्या देशांना सोबत घेऊन 'डब्ल्यूटीओ'च्या परिघाबाहेर हा करार राबवण्याचे संकेत दिले. त्यामुळे जागतिक व्यापार संघटनेच्या मूळ संकल्पनेलाच धक्का बसला आहे. 'डब्ल्यूटीओ'च्या अधोगतीची सुरुवात खरे तर संघटनेच्या न्यायालयीन प्रक्रियेला खीळ बसवण्यापासूनच झाली आहे. जागतिक व्यापारातील वादविवाद, तंटे सोडवण्यासाठी या संघटनेची एक स्वतंत्र न्यायिक प्रणाली आहे. मात्र, पहिल्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी यासाठीच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीला स्थगिती देऊन ही यंत्रणा खिळखिळी केली. त्यांच्यानंतर आलेल्या जो बायडेन प्रशासनानेही याच धोरणाचे समर्थन केले. परिणामी, 'डब्ल्यूटीओ'ची निवाडा करणारी यंत्रणाच निकामी झाली आहे. एखाद्या देशावर अन्याय होतो, तेव्हा दाद मागण्यासाठी कोणतेही प्रभावी व्यासपीठ उपलब्ध नाही. यामुळेच अनेक देश आता द्विपक्षीय व्यापार करार करण्याला प्राधान्य देत आहेत. यामुळे गरीब आणि विकसनशील देशांचा आवाज दाबला जाण्याची भीती आहे. प्रगत देश सोयीनुसार स्वतंत्र गट बनवून व्यापार करू लागले, तर डब्ल्यूटीओचे भविष्य अधांतरी का? असा प्रश्न उभा राहील. त्यातून जागतिक व्यापार क्षेत्रात एक प्रकारची अराजकता निर्माण होईल. मोठी बाजारपेठ असणारे किंवा आर्थिकदृष्ट्या ताकदवान देश छोट्या देशांवर आपल्या व्यापार अटी लादण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास जागतिक व्यापाराचे लोकशाहीकरण करण्याच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे. सबब, 'डब्ल्यूटीओ'च्या रचनेत तातडीने सुधारणा झाली नाही आणि मोठ्या देशांनी आपल्या हट्टापायी जागतिक संस्थांना कमकुवत करणे थांबवले नाही, तर येणारा काळ व्यापार युद्धाचा असेल आणि त्याचा फटका विकसनशील अर्थव्यवस्थांना बसल्याशिवाय राहणार नाही.

# रुपयात घसरण तर मद्यपींमध्ये चिंता

**मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम जगात सर्वत्र जाणवत आहे. अशा परिस्थितीत काही मध्यपूर्वेतील घडामोडींमुळे रुपया ऐतिहासिक नीचांकावर गेल्याचे पहायला मिळाले. त्यातच मद्यप्रेमींची चिंता वाढवणारी बातमी समोर आली. गॅसची टंचाई आणि कच्च्या मालाची कमतरता यामुळे बियर महाणणार आहे. दुसरीकडे, गुंतवणूकदारांसाठी वातावरण तणावाचे बनले आहे.**




मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षांचा परिणाम जगात सर्वत्र जाणवत आहे. तेल हा जगाच्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक बनला असताना तेलटंचाईमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर त्याचा परिणाम झाला नसता तरच नवल. अशा परिस्थितीत काही बातम्यांनी सर्वांचे लक्ष वेधले आहे. मध्यपूर्वेतील घडामोडींमुळे रुपया ऐतिहासिक नीचांकावर गेल्याचे पहायला मिळाले. त्यातच मद्यप्रेमींची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. गॅसची टंचाई आणि कच्च्या मालाची कमतरता यामुळे बियर महागणार आहे. दुसरीकडे गुंतवणूकदारांसाठी वातावरण तणावाचे बनले आहे.

**डॉलरसमोर रुपया कमकुवत**

अमेरिकन डॉलरच्या मजबुतीसमोर भारतीय रुपया कमकुवत ठरत असून, गेल्या काही दिवसांमध्ये रुपयाने मोठी घसरण नोंदवली. तो ९४.२९ प्रति डॉलर या नव्या ऐतिहासिक नीचांकावर पोहोचला. रुपयातील या तीव्र घसरणीमागील मुख्य कारण म्हणजे पश्चिम आशियामध्ये सुरू असलेला संघर्ष, गेल्या महिन्याच्या अखेरीस सुरू झालेल्या या तणावानंतर आतापर्यंत रुपयात सुमारे ३.५ टक्कांची घसरण झाली आहे. युद्ध लांबण्याची शक्यता लक्षात घेता जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठे संकट निर्माण शाले आहे. या भू-राजकीय अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप शंभर डॉलर्सच्या वर गेल्या आहेत. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेल्या देशासाठी याचा थेट आर्थिक परिणाम होतो. त्यामुळे जागतिक शेअर बाजारांमध्ये मंदीचे वातावरण असून बॉंड विल्डमध्ये वाढ होत आहे. डॉलर मजबूत झाल्यास भारतात महागाई वाढण्याची शक्यता अधिक होते. या परिस्थितीचा परिणाम कर्जावरही होऊ शकतो. महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक व्याजदर वाढवण्याचा विचार करू शकते. असे झाल्यास गृहकर्ज, वाहनकर्ज यांसारख्या कर्जाच्या ईएमआयमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच आयातीत लक्झरी वस्तू, चाहने आणि यंत्रसामग्रीही महाग होऊ शकतात.

या घसरणीमागे परकीय गुंतवणूकदारांकडून भारतीय बाजारातून निधी काढून घेणे हेही एक महत्त्वाचे कारण आहे. मध्यपूर्वेतील तणावामुळे जागतिक गुंतवणूकदारांचा दृष्टिकोन नकारात्मक झाला आहे; मात्र या परिस्थितीत काही क्षेत्रांना फायदा होऊ शकतो. आयटी आणि फार्मा क्षेत्रातील निर्यातदार कंपन्यांना डॉलर मजबूत असल्यामुळे अधिक रुपयांमध्ये उत्पन्न मिळू शकते. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो आणि त्याचे व्यव्हार डॉलरमध्ये होतात. त्यामुळे रुपया कमकुवत झाल्यास तेलासाठी अधिक पैसे मोजावे लागतात. याचा परिणाम पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतींवर होण्याची शक्यता आहे तसेच खाद्यतेल आणि डाळींसारख्या आयातीत वस्तूही महाग होऊ शकतात. त्यामुळे घरगुती खर्च वाढू शकतो. याशिवाय इलेक्ट्रॉनिक वस्तूंवरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. स्मार्टफोन, टीव्ही, लॅपटॉप यांसारख्या उत्पादनांचे अनेक भाग परदेशातून आयात केले जातात. रुपयातील घसरण कायम राहिल्यास या वस्तूंच्या किमतींमध्ये सुमारे दहा टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते. परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही आणि विदेश प्रवास करणाऱ्यांनाही अधिक खर्च करावा लागू शकतो.

**संघर्षाचा परिणाम अनेक देशांवर**

मध्य-पूर्वेतील संघर्षाचे परिणाम जगातील सर्वच देश अनुभवत आहेत. अनेक देशांमध्ये इंधन आणि गॅसचे मोठे संकट उगे ठाकले आहे. या देशांगध्ये वर्क फ्रॉग होम आणि इतर अनेक उपाय करण्यात येत आहेत. पेट्रोल पंप बंद असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. विमानफेऱ्यासुद्धा कमी झाल्याने पर्यटक चिंतेत आहेत. ऊर्जा संकटामुळे अनेक देश वेठीस धरले गेले आहेत. इतकेच नाही, तर मद्यप्रेमींची काळजी वाढवणारी बातमी समोर येत आहे. कच्च्या मालाची कमतरता आणि वाहतुकीतील अडथळे यामुळे महा तयार करणाऱ्या कंपन्यांचे गणित विघडवले आहे. त्यामुळे बिअरच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्याची बिअरप्रेमींच्या खिशाला झळ बसणार आहे. हे युद्ध आखाताच्या जवळपास लढले जात आहे; पण त्याचा जगातील बड्या महासत्तांना फटका बसला आहे. अनेक छोट्या देशांमध्ये ऊर्जेचे भीषण संकट उद्भवले आहे. पाकिस्तान, नेपाळ, बांगला देश, श्रीलंकेसह अनेक देशांमधील व्यापार आणि सर्वच घटकांवर मोठा परिणाम झाला आहे. भारत हा गरजेच्या जवळपास ९० टक्के कच्चे तेल आयात करतो. हे इंधन इराणजवळील होर्मुज सामुद्रधुनीच्या चचोळ्या समुद्र मार्गाद्वारे भारतात येते. हा मार्ग गेल्या ३० दिवसांपासून भू-राजकीय संघर्षाचा केंद्रबिंदू ठरला आहे. इराणने भारत, चीन, रशिया आणि पाकिस्तानव्यतिरिक्त इतर देशांसाठी हा मार्ग बंद ठेवल्याने गॅस आणि कच्चा तेलाच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

**बिअरच्या किमतीत वाढीची शक्यता?**

बाजारात बिअर काचेची बाटली कवा कॅनमधून दिली जाते. या बाटल्या आणि कैन्स तयार करण्यासाठी कंपन्यांना कच्चा माल आयात करावा लागतो. शिवाय त्यांचे उत्पादन करण्यासाठी कारखान्यांना गॅसची गरज असते. गॅसची टंचाई सुरू झाल्यापासून या कंपन्यांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. काचेची बाटली तयार करणाऱ्या कारखान्यांवर मोठा परिणाम दिसून येत आहे. काही कंपन्यांचे काम ठप्प पडले आहे. 'ब्रुअर्स असोसिएशन ऑफ इंडिया च्या दाव्यानुसार या घडामोडींमुळे काचेच्या बाटल्यांच्या उत्पादनखर्चात २७ टक्के वाढ झाली आहे, तर पॅकेजिंग आणि वाहतुकीचा खर्च वाढल्याने बिअरच्या किमतीत मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. बिअर तयार करण्यासाठी आणि ग्केजिंगसाठी मोठा खर्च येत असल्याने बिअर कंपन्यांनी आता बिअरच्या किमतीत १५ टक्के वाढीची मागणी केली आहे. अनेक दिग्गज बिअर कंपन्यांनी विअरच्या कमतीत मोठी वाढ करण्याची मागणी लावून धरली आहे. उन्हाळ्यात बिअरची मागणी वाढते. ऐन मोसमातच बिअरच्या किमतीत वाढ होण्याची दाट शक्यता असल्याने विअप्रेमींच्या घशाला कोरड पडली आहे. कारण आता सगळीकडे महागाई वाढत असताना बिअरची चवसुद्धा जास्त कडू लागणार आहे. विअर बाटलीसाठी जास्त किमत मोजावी लागणार आहे.

**वर्षाच्या तिमाहीत मोठे चढ-उतार**

दुसरीकडे वर्षाची पहिली तिमाही मोठ्या चढ-उतारांनी भरलेली ठरली. यामागील मुख्य कारण म्हणजे वाढता भू-राजकीय तणाव आणि युद्धाची स्थिती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्म यांनी इराणला एप्रिलपर्यंत होमुर्जची सामुद्रधुनी खुला ठेवण्याचा अल्टिमेटम दिला आहे, अन्यथा ऊर्जा पायाभूत सुविधांवर कारवाईचा इशारा दिला आहे. यामुळे पुढील काही दिवस गुंतवणूकदारांसाठी अत्यंत तणावपूर्ण ठरणार आहेत, कारण याच काळात महत्त्वाचे आर्थिक आकडे आणि कंपन्यांचे तिमाही निकालही जाहीर होणार आहेत. पहिल्या तिमाहीत जागतिक बाजार पूर्णपणे भू-राजकीय घडामोडींनी प्रभावित झाले. इराणशी संबंधित संघर्षांमुळे जागतिक शेअर बाजारांमध्ये सुमारे ७ ट्रिलियन डॉलर्सची घसरण झाली आहे. तेल आणि गॅसच्या किमतींमध्ये आत्तापर्यंत अनुक्रमे सुमारे ७० आणि ८५ टक्के वाढ झाली आहे. व्याजदर कमी होण्याऐवजी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत आणि मोठ्या प्रगाणावर ऊजर्जा वापरणाऱ्या 'एआय' उद्योगावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मार्च महिना तेल बाजारासाठी अत्यंत अस्थिर ठरला. एका टप्प्यावर ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर काही मिनिटांतच तेलाच्या किमतींमध्ये १५ टक्क्यांची घसरण झाली. यापूर्वी गोठ्या प्रमाणावर विक्री आदेश आल्याने बाजारात मोठी हालचाल झाली होती. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची स्थिती समजून घेण्यासाठी गाचंगधील रोजगाराचा डेटा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. फेब्रुवारीमध्ये रोजगारात घट आणि बेरोजगारीत वाढ झाल्यामुळे गुंतवणूकदार आधीच चिंतेत आहेत. महागलेल्या ऊर्जेमुळे खर्च आणि आर्थिक वाढीवर किती परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याशिवाय, दक्षिण कोरियाच्या व्यापार आकडेवारीकडेही लक्ष असेल. त्यातून जागतिक अर्थव्यवस्था युद्धाच्या परिणामांना कितपत तोंड देत आहे हे स्पष्ट होईल. विशेषतः 'एआय' क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या 'डीआरएएम चिप्सच्या' पुरवठ्यावरही लक्ष ठेवले जात आहे.युरोपमध्येही महागाई पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. कारण ऊर्जा किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे युरोपची मध्यवर्ती बँकेवर व्याजदर चाढवण्याचा दबाव निर्माण होऊ शकतो. एकूणच, जागतिक बाजारात अनिश्चितता कायम असून गुंतवणूकदारांना प्रत्येक घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे.

**महेश देशपांडे**

# ट्रंप यांचा कबुलीनामा !



जानेवारी २०२६ ला इराणमध्ये महागाईच्या विरोधात मोठे जनआंदोलन झाले होते.आंदोलकांनी दुकाने बंद ठेवली होती.रस्ते बंद केले होते.ते आंदोलन नंतर इराणभर पसरले होते.हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मग इराणच्या प्रशासनाने पाशवी बळाचा वापर केला होता.सुरक्षा रक्षकांनी केलेल्या गोळीबारात शेकडो आंदोलक मृत्युमुखी पडले होते.तेंव्हा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इराणमधील आंदोलकांना आश्वासन दिले होते की, अमेरिका तुमच्या मदतीला येत आहे.ट्रंप यांचा स्वभाव लक्षात घेता,ते गंभीरपणे बोलले नसतील,असे वाटत होते.मात्र ट्रंप यांनी ते आश्वासन गंभीरपणे दिल्याचे नंतर लक्षात आले.इराणच्या हुकूमशाही राजवटी विरोधात आंदोलन करणाऱ्या आंदोलकांना, ट्रंप यांनी कुर्दिश बंडखोरांच्या माध्यमातून शस्त्रे पुरवण्याचा प्रयत्न त्यावेळी केला होता,याचा गौप्यस्फोट खुद्द ट्रंप यांनी नुकताच केला आहे.मात्र ट्रंप यांचा तो प्रयत्न फसल्याचे, त्यांनी कबूल केले आहे.इराणी आंदोलकांना मदत करण्यासाठी,जी शस्त्रे कुर्दिश बंडखोरांच्या हवाली करण्यात आली होती,ती शस्त्रे त्यांनी स्वतःकडे ठेवून घेतली असे ट्रंप यांनी कबूल केले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी आपल्या ट्रुथ सोशल अकाउंटवर नुकत्याच टाकलेल्या पोस्ट मध्ये इराणला असा इशारा दिला आहे की होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करण्याची वाढवून दिलेली अंतिम मुदत संपल्यानंतर अमेरिका इराणमधील पॉवर प्लॅंट्स आणि पुलांवर हल्ले करेल.ट्रंप यांनी एखाद्या गावगुंडाला शोभेल अशा भाषेत ( क्रेझी बास्टर्ड्स वगैरे ) इराणला सुनावले की होर्मुझ सामुद्रधुनी ओपन करा नाहीतर नरकात जाण्यासाठी तयार रहा.त्या अगोदर ट्रंप यांनी अशी शपथ घेतली होती की इराणने युद्धविराम संबंधी सकारात्मक भूमिका घेतली नाही तर, किंवा होर्मुझची सामुद्रधुनी ओपन केली नाही तर, अमेरिका इराणवर बॉंबचा वर्षाव करेल.ट्रंप यांनी या अगोदर दोन वेळा होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करण्यासंबंधात इराणला अंतिम मुदत दिली होती.त्यांनी आता तिसऱ्यांदा मुदत वाढवून दिली आहे.इराणने मात्र ट्रंप यांच्या पोकळ धमक्यांना भीक न घालता, होर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रवेश करणाऱ्या शत्रू राष्ट्रांच्या जहाजांवर हल्ले करणे सुरूच ठेवले आहे.जगातील एकूण तेल पुरवठ्याच्या २० टक्के तेल हे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून पास होते,ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी.

एकीकडे इराणला धमकी देताना, दुसरीकडे, ट्रंप हे इराण बरोबर पडद्याआडून बोलणी सुरू असल्याचे सांगत आहेत.मात्र इराणकडून त्याचा स्पष्टपणे इन्कार करण्यात आला आहे.इस्त्रायलच्या एका टीव्ही चॅनेलवर बोलताना ट्रंप यांनी असा दावा केला की ते इराण बरोबर वाटाघाटी करत आहेत.मात्र हे युद्ध आपण मध्येच सोडणार नाही असेही त्यांनी सांगितले.जर इराणने युद्धविराम केला नाही तर अमेरिका, इराणमधील सर्वकाही नष्ट करेल,असा इशारा त्यांनी दिला.ट्रंप यांच्या दाव्यानुसार, पाकिस्तान, इजिप्त आणि तुर्कस्तान या देशांच्या मध्यस्थीने इराण बरोबर बोलणी सुरू आहेत.इराणमधील निरपराध लोक अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यात मारले जात आहेत, त्याबाबत तुम्हाला काळजी वाटत नाही का? असा प्रश्न ट्रंप यांना विचारण्यात आला असता,ते म्हणाले की इराणमधील लोक, तेथील हुकूमशाही राजवटीच्या दहशतीखाली भयग्रस्त आहेत.त्यांना असे वाटत आहे की आम्ही मध्येच युद्ध सोडले तर, त्यांना पुन्हा हुकूमशाही राजवटीच्या दहशतीखाली रहावे लागेल.पण आम्ही युद्ध मध्येच सोडणार नाही. इराणच्या संसदेचे अध्यक्ष घालिबाफ यांच्या बरोबर अमेरिकेच्या वाटाघाटी सुरू असल्याचे बोलले जात आहे.घालिबाफ यांनी नुकताच असा दावा केला की ट्रंप हे, इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या म्हणण्यानुसार वागत आहेत.त्यामुळे आखातातील सर्व देशांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होईल.ट्रंप यांचे धमकी सत्र सुरू असताना, ओमान आणि इराण यांच्यात होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करण्याच्या बाबतीत बोलणी सुरू असल्याचे बोलले जात आहे.आजवरच्या युद्धात इराणची प्रचंड प्रमाणात हानी झाली असली तरी इराणने होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करण्याच्या बाबतीत कोणतीही सकारात्मकता दाखवलेली नाही.कारण इराणला माहित आहे की, अमेरिकेला नमवायचे असेल तर होर्मुझची सामुद्रधुनी हा, त्याच्याकडे हुकुमी एक्का आहे.तसेच मध्य पुर्वेकडील ज्या देशांत अमेरिकेचे लष्करी तळ आहेत,त्यांवर मिसाईल आणि ड्रोनच्या सहाय्याने हल्ले करून, इराणने अमेरिकेवरील दबाव वाढवला आहे.ट्रंप यांनी इराणला घाबरवण्यासाठी असाही इशारा दिला आहे की,जर इराण बरोबरची आमची बोलणी यशस्वी झाली नाहीत तर आम्ही इराणचे तेल ताब्यात घेऊ. युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेने अशी अट घातली आहे की, इराणने आपला अणूविषयक कार्यक्रम गुंडाळावा.बॅलिस्टिक मिसाईल्सचे उत्पादन मर्यादित ठेवावे.हुती,हेजबुल्लाह या अतिरेकी संघटनांना मदत करणे थांबवावे आणि होर्मुझची सामुद्रधुनी ओपन करावी.इराणने या सर्व मागण्या फेटाळून लावल्या असून, आपल्या काही मागण्या पुढे केल्या आहेत.त्यामध्ये इराणचे युद्धात जे नुकसान झाले ते अमेरिकेने पूर्णपणे भरून द्यावे आणि इराणवर पुन्हा हल्ला करणार नाही,अशी हमी, अमेरिकेने इराणला द्यावी,या मागण्यांचा समावेश आहे.होर्मुझच्या सामुद्रधुनी बाबत बोलायचे झाल्यास ही सामुद्रधुनी, पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडते.त्यामुळे ही सामुद्रधुनी ओपन करण्याच्या बाबतीत इराण आणि ओमान यांच्यातील बोलणी महत्त्वाची ठरू शकतात.

**अभय गोखले**

# तरुणींच्या वाढत्या आत्महत्या चिंताजनक

आपल्या देशातील लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये तरुण-तरुणींची संख्या जरी जास्त असली तरी गेल्या पाच वर्षात पुरुषांपेक्षाही महिलांचे प्रमाण जास्त असल्याचे आकडेवारीवरून सिद्ध झालेले आहे. मागील दहा वर्षांपूर्वी महिलांची संख्या पुरुषांच्या तुलनेत कमी होती. किंबहुना महिलांच्या बाबतीत होणारा सामाजिक अन्याय हादेखील शिगेला पोहोचला होता. अलीकडच्या काळात बेटी बचाव, बेटी पढाव यासारख्या मोहिमांमधून महिलांच्या सक्षमीकरणाचे विशेष प्रयत्न केले गेले. ज्यात महिला बचत गटापासून ते अंगणवाडी सेवेविकांपर्यंत किंवा लखपती दीदीपासून ते सर्व प्रकारच्या सुरक्षा दलामध्येसुद्धा महिलांना सामान संधी देण्याचे धोरण आखले गेले. समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे आणि एकूण देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत महिला ह्या तितक्याच क्षमतेच्या आहेत.

आज देशाला लाभलेली ही लोकसंख्येची ताकद तंत्रज्ञानाच्या युगामध्ये सर्वात मोठे भांडवल आहे. त्यातही देशाकडे असलेल्या या युवाशक्तीचा अधिकाधिक सकारात्मक वापर करून घेण्याच्यादृष्टीने जरी काही उपाययोजना होत असतील तरी ती पुरेशी ठरत नाही. अगदी अलीकडच्या नॅशनल क्राईम रेकॉर्डप्रमाणे जे धक्कादायक वास्तव समोर आल्यानंतर या सर्वाधिक लोकसंख्येचा आणि त्यातही युवाशक्तीचा अपमान होत असल्याचे दिसते. नॅशनल क्राईम रेकॉर्डप्रमाणे देशात तरुणांच्या आत्महत्येचे प्रमाण प्रचंड वाढल्याचे सांगितलेले गेले आहे. परंतु त्यातही ते पंचवीस या वयोगटातील तरुणींकडून जीवन संपवण्याच्या घटना अत्यंत दुर्देवी स्वरूपाच्या ठरतात. अलीकडेच राजस्थान राज्यात तेवीस आणि पंचवीस वर्षाच्या बहिणींनी विवाहाच्या कारणावरून आत्महत्या केल्याचे समोर आले. त्याआधी उत्तर प्रदेश राज्यातही दोन तरुनींनी इमारतीवरून उड्या घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. अशा प्रकारच्या आत्महत्या झाल्यानंतर बऱ्याच वेळेला पोलीस दप्तरी कौटुंबिक वाद किंवा मतभेद अशा प्रकारचे कारण नोंदवले जाते. परंतु प्रत्यक्षात त्यामागची खरी करणे वेगळीच असतात.

**प्रा. मधुकर चुटे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

# पाणंद रस्ता समितीची महत्त्वपूर्ण बैठक !

## ग्रामीण रस्त्यांच्या दर्जा व गतीवर भर



जनमाध्यम प्रतिनिधी

दारव्हा - ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत सहज व सुरक्षित पोहोचता यावे या उद्देशाने तालुका पाणंद रस्ता समितीची महत्त्वपूर्ण बैठक आज येथील शासकीय विश्रामगृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यवतमाळ मतदारसंघाचे आमदार मा. बाळासाहेब मांगुळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीस विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल, वन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते. याशिवाय समितीचे सदस्य आणि मतदारसंघातील कार्यकर्त्यांचीही लक्षणीय उपस्थिती होती.यावेळी ग्रामीण भागातील पाणंद रस्त्यांची सद्यस्थिती, अपूर्ण कामे तसेच नव्याने आवश्यक असलेल्या रस्त्यांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. शेतकरी व ग्रामस्थांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन रस्त्यांचे मजबुतीकरण, दर्जेदार बांधकाम आणि वेळेत काम पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांना गती देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कामांमध्ये पारदर्शकता राखत गुणवत्ता व वेळेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देशही आमदारांनी दिले. यावेळी नानाभाऊ ढोंगे, द्रोणागिरी गिरी, डॉ. अलीमखान सुजातखान, धर्मराज चव्हाण, श्रावण राठोड यांच्यासह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गॅस सिलेंडर कधी मिळणार ?

## वंचित बहुजन आघाडीचे झुणका-भाकर आंदोलन



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - घरगुती गॅस सिलेंडरच्या उपलब्धतेबाबत नागरिकांमध्ये वाढत असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शहरातील संविधान चौक येथे अनोखे आंदोलन करण्यात आले. "गॅस सिलेंडर कधी मिळणार?" या प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन उभारण्यात आले.

जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिलांनी प्रत्यक्ष चुलीवर झुणका-भाकर बनवत आपला संताप व्यक्त केला. कार्यकर्त्यांनीही या ठिकाणी भाकर खाऊन शासनाच्या धोरणांचा निषेध नोंदविला. आंदोलनादरम्यान डॉ. वाघमारे यांनी गळ्यात गॅस सिलेंडरची प्रतिकात्मक माळ घालून सत्ताधाऱ्यांविरोधात नाराजी व्यक्त केली.

तसेच जिल्हाधिकाऱ्यांना झुणका-भाकर देऊन अनोख्या पद्धतीने आपली मागणी मांडण्यात आली. घरगुती गॅस पुरवठा सुरळीत करण्यात यावा, तसेच सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर सिलेंडर उपलब्ध व्हावेत, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

# तरुणाच्या हत्येप्रकरणात आरोपीला जन्मठेप

## मजुरीच्या पैशाचा वाद घाटंजीच्या अंजी येथील घटना



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : मजुरीच्या क्षुल्लक पैशांच्या वादातून लाकडी दांड्याने डोक्यावर घार करून तरुणाची हत्या केल्याचा दोष सिध्द झाल्याने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा ठोठवण्यात आली. येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. यु बघेल यांनी याप्रकरणाचा निर्वाळा दिला.

सचिन वंदन पाटील (२६) रा. आंजी, ता. घाटंजी असे शिक्षा ठोठविण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयीन सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जानेवारी २०२० रोजी रात्री ९:३० वाजताच्या सुमारास घाटंजी तालुक्यातील आंजी येथील मृत अविंद कोहरे हे आपल्या पत्नी आणि दोन लहान मुलांसह घरी असताना, आरोपी सचिन पाटील तिथे आला. आज तुझा हिशोबच करतो, असे म्हणत त्याने अरविंद यांना घराबाहेर बोलावले. यावेळी दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि हा वाद ग्रामपंचायत कार्यालयासमोर पोहोचला. तिथे संतापलेल्या सचिनने लाकडी दांडघाने अरविंदच्या डोक्याचर जोरदार वार केला. या गंभीर हल्ल्यात अरविंदचा जागीच मृत्यू झाला. पतीवर झालेला हा हल्ला पत्नी पुनेरता कोहरे यांनी प्रत्यक्ष पाहिला होता, घटनेनंतर त्यांनी घाटंजी पोलीस ठाणे गाठ्न याप्रकरणी रितसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक किशोर भुजाडे यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यानंतर सोमवार, ६ हृप्रिल रोजी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. यु बघेले यांच्या न्यायालयात या प्रकरणाची पेक्षी घेण्यात आली. यावेळी सरकारी पक्षाच्या वतीने एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये मृतकची पत्नी पुनेरता कोहरे यांची प्रत्यक्षदर्शी साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरली. तसेच पंच साक्षीदार विवेक ठाकरे, राहुल इंभारे, शवविच्छेदन करणारे डॉ. राजेंद्र बन्सोड आणि तपास अधिकारी किशोर भुजाडे यांची साक्ष य इतर परिस्थितीजन्य पुरावे ग्राहा धरून, जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. दु. बघेले यांनी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा आणि १० हजारांचा दंड व दंड न भरल्यास अतिरिक्त २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने ॲड. विजय एस. तेलंग यांनी युक्तिवाद केला. त्यांना घाटंजी पोलीस स्टेशनच्या महिला पैरवी अधिकारी हवालदार सारिका बोधनकर यांनी सहकार्य केले.

## वेचक



### बाभुळगाव येथे भाजपा स्थापना दिवस साजरा

बाभुळगाव - बाभुळगाव येथे भाजपा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. यावेळी माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. भाजपा स्थापना दिवस दरवर्षी ६ एप्रिल रोजी साजरा केला जातो. स्व. अटल बिहारी वाजपेयी, भारत रत्न लालकृष्ण अडवाणी या नेत्यांनी पुढाकार घेवून सन १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना भारतीय जनसंघ या पक्षाच्या उत्तराधिकारी म्हणून केली. देशभरात पक्षाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. कार्यकर्त्यांशी संवाद आणि सभा, सामाजिक उपक्रम (सेवा कार्य), पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार या निमित्ताने केला जातो. यावेळी जिल्हा सचिव तथा राळेगाव विधानसभा प्रमुख सतीश मानलवार, माजी जि.प.सभापती प्रज्ञा भूमकाळे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश भूमकाळे, चुडामण मदारे, गौतम लांडगे, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष महादेव गर्जे,शहर अध्यक्ष अनिकेत पोहोकार, प्रशांत मेघे, मिलिंद नवाडे, नानाजी मानकर, देवराव शिंदे, वैभव पांडे, हनुमंत जगताप, पद्माकर तायडे, नानाजी आगलावे, मिलिंद पडोळे, सुभाष धोटे, बाळू जांभूळकर, प्रथमेश भूमकाळे, संतोष सोनुर्ले, चंदू वांगाडे, सुरेंद्र नासरे, गोपाल घोडमारे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### 'कृषी अवजारे बँक' योजनेसाठी अर्जाची मुदत २५ एप्रिलपर्यंत वाढ

यवतमाळ - नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) अंतर्गत 'गावस्तरा वरील कृषी अवजारे बँक' स्थापन करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली असून आता पात्र महिला बचत गट व महिला गाव संघांना २५ एप्रिल २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. यापूर्वी ही मुदत ५ एप्रिलपर्यंत होती; मात्र प्रकल्पातील 'उमेद' व 'माविम' पुरस्कृत महिला गटांचा सहभाग वाढावा या उद्देशाने मुदतवाढ देण्यात आली आहे.या योजनेसाठी प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांतील नोंदणीकृत महिला बचत गट व महिला गाव संघ पात्र ठरणार आहेत. एका गावातून एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लाभार्थी गटाची निवड ऑनलाईन लॉटरी पद्धतीने केली जाणार आहे. दरम्यान, १५ एप्रिल २०२६ पर्यंत जिल्हास्तरावर विशेष मेळावे आयोजित करण्यात येणार असून, या मेळाव्यां मध्ये बँक प्रतिनिधींच्या उपस्थितीत कर्ज सुविधे बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.या योजनेचा जास्तीत जास्त महिला शेतकरी गटांना लाभ मिळावा, असे निर्देश प्रकल्प संचालक परिमल सिंह यांनी दिले आहेत. इच्छुक गटांनी अधिक माहितीसाठी संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी किंवा 'आत्मा' कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'त्या' खुनातील फरार आरोपी जेरबंद

यवतमाळ : जुन्या वादातून शहरातील उमरसरा परिसरात तीन फोटोमागील गल्लीत एका युवकाचा चाकूने भोसकून खून करण्यात आला होता. ही घटना १३ मार्च रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली होती. या प्रकरणात सुरूवातीी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली होती. दरम्यान, आज सोमवारी फरार तिसऱ्या आरोपीलाही अवधूतवाडी पोलिसांनी जेरबंद केले आहे. अमोल संगीत खडसे (२५), रा. आंबेडकर नगर, असे मृतकाचे नाव आहे. तर नितीन उर्फ गुड्डू त्र्यंबक गजभिये (४२) रा. उमरसरा असे अटकेतील तिसऱ्या आरोपीचे नाव आहे. यापूर्वी घटनेच्या दुसऱ्या दिवशी सतीश त्र्यंबकराव गजभिये (३८) आणि कुणाल त्र्यंबकराव गजभिये (४४) या दोघांना अटक करण्यात आली होती. अमोलची आई शारदा संगीत खडसे (४५) यांनी अवधूतवाडी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करून लगेच पोलीस पथक आरोपीचे मागावर निघाले होते. त्यानंतर सुरूवातीला दोघांना अटक केली होती. त्यानंतर सोमवारी ६ एप्रिल रोजी उमरसरा परिसरातूनच पोलिसांनी ताब्यात घेतले.

# सा.बा. विभागाकडून अपुरा निधी !

## कंत्राटदारांचा साखळी उपोषणाचा इशारा




जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मार्च अखेर सुमारे १२० कोटी रुपयांच्या देयकांची मागणी सादर करण्यात आली असताना केवळ १४.५० कोटींचेच वितरण करण्यात आल्याने कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. वर्षभर स्वतःच्या आर्थिक जोखमीवर काम करणाऱ्या कंत्राटदारांना शासनाकडून केवळ ८ ते १० टक्केच रक्कम मिळत असल्याची तक्रार असून, देयक वाटपातही भेदभाव होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

जुनी प्रलंबित देयके असलेल्या कंत्राटदारांना प्राधान्य न देता नव्याने काम करणाऱ्यांनाही समान देयक दिले जात असल्याने अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. "कोणी उपाशी तर कोणी तुपाशी" असे धोरण राबविले जात असल्याचा संतप्त सूर यावेळी उमटला. पूर्ण देयके तत्काळ अदा करण्याच्या मागणीसाठी पुसद येथील सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर मंगळवारी सकाळी कंत्राटदार, मजूर सोसायट्या व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांनी एकदिवसीय साखळी उपोषण केले. देयक न दिल्यास महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या वतीने काम बंद आंदोलनाचा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात अनेक कंत्राटदार पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# घाटंजी 'बसस्थानकात' थंड पाणपोई'ची सुविधा




## प्रवाशांची तहान भागवण्यासाठी दानशूर नागरिकांचा पुढाकार

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर तापमानाने ४० ते ४२ अंशांचा टप्पा ओलांडला असून, बसस्थानकावरील प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या भेडसावत होती. उपलब्ध पाणीही अत्यंत गरम असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याने हा प्रश्न गंभीर बनला होता.

याच पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत घाटंजीतील दानशूर नागरिक पुढे सरसावले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त तसेच स्व. प्रभाबाई अक्कलवार, स्व. दादासाहेब कोमावार व स्व. लक्ष्मण शामराव ढवळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ थंड पिण्याच्या पाण्याची 'पाणपोई' उभारण्यात आली. दि. ७ एप्रिल रोजी शुभमुहूर्तावर या पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमासाठी पांढरकवडा आगार प्रमुख आशिष काकडे यांनी बसस्थानक परिसरात जागा उपलब्ध करून दिली. त्यांच्या सहकार्याबद्दल किशोर अक्कलवार, अनिल कोमावार व गजानन ढवळे कृतज्ञता व्यक्त केली. उद्घाटन सोहळ्यात वाहतूक नियंत्रक सविता कामळे, अनंत कटकोजवार, अनिल कोमावार, अनंत नखाते, महेंद्र देवतळे, संतोष अक्कलवार, अरुण कांबळे, दिनेश गाऊत्रे, संतोष पोटपिल्लेवार, किशोर अक्कलवार, विजू मोहिजे, कविता मोहिजे यांच्यासह अनेक नागरिक व प्रवासी उपस्थित होते.

# मतदारसंघातील वीजपुरवठा सुरळीत ठेवा : आ. किसनराव वानखेडे



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - उमरखेड येऊ घातलेल्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील वीजपुरवठा अखंड व सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना तात्काळ राबवाव्यात, असे निर्देश आमदार किसनराव वानखेडे यांनी दिले. उपविभागीय अधिकारी कार्यालयात महावितरण व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.बैठकीत सोलर प्रकल्पांचा आढावा घेत प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्यासोबतच सुरू असलेल्या कामांची गती वाढविण्याचे आदेश देण्यात आले. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्या बाबत अधिकाऱ्यांना जाब विचारत, या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. पावसाळ्यात वादळी वारे व मुसळधार पावसामुळे वीजपुरवठा विस्कळीत होऊ नये यासाठी झाडांची छाटणी, धोकादायक फांद्या हटविणे, वीजतारांचे मजबुतीकरण व देखभाल ही कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा इशाराही आमदार वानखेडे यांनी दिला.तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवणे, नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करणे आणि शेतकरी व वीज ग्राहकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले. "प्रत्येक नागरिक सुरक्षित व समाधानी राहावा, यासाठी प्रशासनाने पूर्ण क्षमतेने काम करावे," असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, तहसीलदार राजेश सुरडकर, मुख्याधिकारी अजय कुरवाडे तसेच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# खेलो इंडिया-२०२६ मध्ये साक्षी बुरकुलेची सुवर्ण कामगिरी !

## पुसदमध्ये उत्स्फूर्त सत्कार



जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - रायपूर (छत्तीसगड) येथे नुकत्याच पार पडलेल्या खेलो इंडिया 2026 वेटलिफ्टिंग स्पर्धेत पुसद येथील साक्षी सुशिला बुरकुले हिने उल्लेखनीय कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. तिच्या या अभिमानास्पद यशामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्था, पुसद संचालित श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय, सवना तसेच संपूर्ण पुसद व महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशानिमित्त संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर यांनी साक्षीच्या निवासस्थानी भेट देत तिचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच पेढा भरवून अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीसाठी आर्थिक मदतीची घोषणाही केली. यावेळी निळकंठ पाटील, अविनाश देशमुख, प्राचार्य प्रदीप जयस्वाल, प्रा. डॉ. केशव चेटुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. साक्षी सध्या बी.कॉम अंतिम वर्षात शिक्षण घेत असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत तिने हे यश संपादन केले आहे. लहान वयातच वडिलांचे छत्र हरपल्याने तिच्या आईने शेतमजुरी करून तिचे संगोपन केले. या कठीण परिस्थितीतही जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर साक्षीने सुवर्ण यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, पुसद येथील रावजी जिममध्ये लेडीज ट्रेनर म्हणून पार्ट-टाईम काम करत ती स्वतःच्या सरावाचा खर्च भागवत आहे. तिच्या या संघर्षमय प्रवासात महाविद्यालयातील व्यवस्थापक शिवाजीराव देशमुख, माजी प्राचार्य डॉ. हेमंत महल्ले, सेवानिवृत्त शारीरिक शिक्षण संचालक डॉ. केशव चेटुले, प्रा. प्रदीप जयस्वाल यांच्यासह प्राध्यापकवृंदाचे मार्गदर्शन लाभले. साक्षीच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, भविष्यातही ती देशासाठी अधिकाधिक पदके मिळवून नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास संस्थाध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर यांनी व्यक्त केला.

# अवकाळी व गारपिटीचा तडाखा, बळीराजाला तात्काळ मदत द्या



जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - आठ दिवसापासून तालुक्यात सुरू असलेल्या अवकाळी पाऊस त्याबरोबरच गारपीट यामुळे तालुक्यात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. काढणीच्या उंबरठ्यावर असलेल्या गहू, हरभरा, कांदा, ज्वारी, तीळ ही पिके जमीनदोस्त झाली आहे

शिवाय आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे सुद्धा प्रचंड नुकसान झालेले दिसून येत आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ पंचनामे करून बळीराजाला मदत देण्याची मागणी ग्राम संवाद सरपंच संघटना जिल्हाप्रमुख यादव गावंडे यांनी केली आहे.

तालुक्यात सतत दोन वर्षाच्या नापिकीमुळे अगोदर शेतकरी डबघाईस आला असताना अशातच खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातून गेला सोयाबीनला एकरी तीन पोते उतारा,तर कापसाला दोन ते तीन क्विंटल उतारा आल्यामुळे शेतीला लावलेला खर्चही न निघाल्यामुळे अशातच सिंचनाची व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी गहू हरभरा, ज्वारी या पिकाच्या आशेवर इतर खर्च फेडल्या जाईल या विवंचनेत शेतकरी वावरत असताना अचानक मागील पाच ते सहा दिवसापासून तालुक्यात अनेक गावात अवकाळी पाऊस सुसाट वारा व कुठे पिकांना गारपिटीचा फटका बसल्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे.

त्यामुळे शासनाने तात्काळ पंचनामे करून तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी गावंडे यांनी केली आहे.

# हिवरा ग्रामपंचायत पोटनिवडणूक याचिका खारीज !, कदम यांना दिलासा

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - तालुक्यातील हिवरा (संगम) ग्रामपंचायत वॉर्ड क्रमांक ४ च्या पोटनिवडणुकीसंदर्भात दाखल करण्यात आलेली निवड रद्द करण्याची याचिका महागाव न्यायालयाने खारीज केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे विद्यमान सदस्य पंजाबराव धोंडीराव कदम यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वॉर्ड क्रमांक ४ मधील सदस्यांनी राजीनामा दिल्यानंतर सन २०२२ मध्ये निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करून सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत निवडणूक पार पाडली होती. या निवडणुकीत न्यु परिवर्तन पॅनलकडून सारिका आंडगे तर एकता पॅनलकडून पंजाबराव कदम यांनी उमेदवारी केली होती. झालेल्या चुरशीच्या लढतीत कदम विजयी झाले. दरम्यान, पराभूत उमेदवार आंडगे यांनी न्यायालयात याचिका दाखल करत निवडणुकीत अनियमितता झाल्याचा आरोप केला होता. प्रारूप मतदार यादी न बनविता जुन्या यादीनुसार मतदान घेण्यात आले तसेच विजयी उमेदवारास अनुकूल मतदारांचा समावेश केल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून व सादर पुराव्यांची तपासणी करून निवडणूक प्रक्रिया ही निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार व कायदेशीर चौकटीत पार पडल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे निवडणूक रद्द करण्यास कोणतेही ठोस कारण नसल्याचे नमूद करत याचिका फेटाळण्यात आली. तसेच न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याबद्दल याचिकाकर्त्यांवर स्टॅम्प ड्युटी भरण्याचे आदेश देण्यात आले. या निर्णयामुळे पंजाबराव कदम व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिलासा मिळाला असून राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

कदम यांनी हा विजय मतदारांचा आशीर्वाद असल्याचे सांगत विरोधकांच्या आरोपांविरोधात कायदेशीर लढा देण्याचा इशाराही दिला.

# महात्मा ज्योतिबा फुले उड्डाणपूल नामकरणाची मागणी

## बांधकामास गती देण्याचे युवक कॉंग्रेसचे जिल्हाधिकारी व मनपा आयुक्तांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

महान समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शहरातील चित्रा चौक येथे उभारण्यात येत असलेल्या उड्डाणपूलास 'महात्मा ज्योतिबा फुले उड्डाणपूल' असे नाव देण्यात यावे तसेच पुलाच्या बांधकामास तातडीने गती देण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, येत्या ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांची जयंती साजरी होत असून यावर्षी त्यांचे द्विशताब्दी वर्ष आहे. समाजात समता, बंधुता आणि शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे. विशेषतः स्त्री शिक्षण आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला.अमरावती शहरातील चित्रा चौक (महात्मा फुले चौक) हा अत्यंत वर्दळीचा भाग असून येथे सुरू असलेल्या उड्डाणपूलाचे बांधकाम अनेक वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित उड्डाणपूलाचे काम तातडीने पूर्ण करून त्यास 'महात्मा ज्योतिबा फुले उड्डाणपूल' असे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या नामकरणामुळे महात्मा फुले यांच्या कार्याला योग्य सन्मान मिळेल तसेच पुढील पिढीला त्यांच्या विचारांची प्रेरणा मिळेल, असेही निवेदनात म्हटले



आहे.तसेच महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त या उड्डाणपूलाचे लोकार्पण करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती करण्यात आली आहे. अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेसद्वारे या आशयाचे निवेदन मा. जिल्हाधिकारी तसेच मा. मनपा आयुक्त यांना सादर करण्यात येऊन निवेदनाची प्रत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनाही पाठविण्यात आली आहे.हे निवेदन सादर करताना अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, युकॉं माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, बडनेरा विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष आशिष यादव, एनएसयुआय शहराध्यक्ष संकेत साहू, ॲड. श्रीकांत नगरीक, अमर देशकर, राहुल बागडे,धनंजय बोबडे, मोहित भेंडे, कृणाल गावंडे, प्रफुल तंतरपाडे, प्रियाल मोहोड, शुभम बांबल, श्रेयसा धर्माळे,ओम कुबडे व इतर युवक कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांना पुण्यतिथीदिनी अभिवादन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



शेतकरी, शेतमजुरांचे कैवारी, दिन दलित सर्व सामान्य जनतेचे लोकनेते, ओ.बी.सी. स्कॉलरशिपचे शिल्पकार, जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष व आमदार दिवंगत डॉ. पांडुरंग ढोले यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्य चांदूर रेल्वे शहरातील ढोले कॉम्प्लेक्स मधील स्व डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच कार्यालयात श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात ढोले हॉस्पिटलचे संचालक डॉ. क्रांतिसागर ढोले, डॉ. अनुया ढोले, आम आदमी पार्टीचे नेते नितीन गवळी, प्रभाकर भगत यांनी स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करून अभिवादन केले. यांनतर स्व. डॉ. पांडुरंग ढोले विचारमंचच्या सर्व उपस्थित कार्यकर्त्यांनी व मित्रपरिवारांनी प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले. यावेळी डॉ. क्रांतिसागर ढोले, नितीन गवळी, महेमूद हुसैन, प्रभाकर भगत यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, स्व. डॉ. पांडुरंग ढोले हा एक विचार होता आणि त्यांनी महाराष्ट्रातील ओ.बी.सी. विद्यार्थांना स्कॉलरशिप मिळावी यासाठी त्यांनी अखंड संघर्ष उभा केला व यशही मिळवून दिले.

## आदिवासी बांधवांना दिली बोअर विहीर बांधून

### पाणी टंचाई समस्या निकाली; प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांचा पुढाकार

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांच्या विशेष पुढाकारातून हिरादेही येथील आदिवासी गावाच्या फाट्याजवळ, श्री हनुमान मंदिर परिसरात बोअर विहिरीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना, विशेषतः आदिवासी बांधवांना, पिण्याच्या पाण्याची मोठी सोय उपलब्ध झाली आहे. यापूर्वी पाण्यासाठी दूरवर जावे लागत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. मात्र, या बोअर विहिरीमुळे त्या अडचणींवर मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असून गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रा. डॉ.हेमंत देशमुख यांनी नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध विकासकामांना प्राधान्य दिले असून, या उपक्रमातून त्यांच्या लोकाभिमुख कार्याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील मूलभूत गरजांकडे लक्ष देत त्यांनी हा उपक्रम राबवला असून, स्थानिक नागरिकांनी त्यांचे



मनापासून आभार व्यक्त केले आहेत.या कामाच्या पूर्ततेनंतर परिसरात छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा सामाजिक उपक्रमांची आजच्या काळात अत्यंत गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, पुढील काळातही अशाच प्रकारच्या विकासकामांसाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.या प्रसंगी दिपक महाराज, निखिल देशमुख, शिवाजी आवटे, ॲड. निमकर, ॲड. सुनील सातपुते, मंगेश पवार, ओमप्रकाश शोभनते, भीमराव आवटे, राम आवटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक नागरिकांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक भरारी

### 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' अन् साबरमती आश्रमाला भेट!

**अमरावती/का.प्र.**

पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून इतिहास आणि संस्कृती शिकण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा, जेवड येथील विद्यार्थ्यांनी गुजरात राज्याची शैक्षणिक सहल केली. जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'ला भेट देत विद्यार्थ्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या उत्तुंग कार्याचा आढावा घेतला, तर साबरमती आश्रमात महात्मा गांधींच्या सत्य-अहिंसेचे धडे गिरवले.

या शैक्षणिक सहलीमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थी सहभागी झाले होते. शैक्षणिक आणि ऐतिहासिक वारसा जवळून पाहता यावा, या उद्देशाने या सहलीचे नियोजन करण्यात आले होते. जगातील सर्वात उंच पुतळ्याचे दर्शनकेवडिया येथील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' परिसरात पोहोचल्यावर विद्यार्थ्यांनी अवाढव्य असा सरदार पटेलांचा पुतळा पाहून आश्चर्य व्यक्त केले. यासोबतच व्हॅली ऑफ फ्लॉवर्स आणि परिसरातील विलोभनीय निसर्गाची माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिली.साबरमतीत गांधीजींच्या



विचारांचा वारसा सहलीच्या दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी अहमदाबाद येथील ऐतिहासिक साबरमती आश्रमाला भेट दिली. महात्मा गांधींचे साधे जीवन आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे योगदान पाहून विद्यार्थी भारावून गेले.सहलीचे आयोजन गटनेता डॉ. राजेंद्र तायडे, उपसभापती सुमती ढोके, नगरसेविका शारदा खोंडे, नगरसेवक संजय गव्हाळे यांचे योगदानातून तसेच उपायुक्त नरेंद्र वानखडे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांचे मार्गदर्शनात पार पडली. शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत नालसे व शिक्षकवृंद शीला डांगे, सीमा शिरभाते, किरण नालिंदे, वैशाली बुटे, हर्षा दिवे, पुष्पा कोरडे, सोनाली चापके, किरण शेंडे, शिरीष फसाटे व पालक यांच्या सहकार्याने करण्यात आले. याशिवाय अहमदाबाद शहरातील इतर शैक्षणिक व ऐतिहासिक स्थळांनाही भेटी देण्यात आल्या. महानगरपालिकेच्या विद्याथ्यांना खऱ्या अर्थाने अभ्यासक सहलीचे आयोजन केल्याबद्दल आयुक्त वर्षा लड्ढा यांनी कौतुक केले.

## मनपा स्तरावर जनगणना २०२७ साठी फिल्ड ट्रेनर्स प्रशिक्षणाला सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेत फिल्ड ट्रेनर्सच्या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित या प्रशिक्षणाचे उद्घाटन आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी वर्षा लड्ढा यांच्या हस्ते करण्यात आले.

या उद्घाटन सोहळयास उपायुक्त (१) तथा शहर जनगणना अधिकारी योगेश पिठे, जनगणना संचालनालयाचे जिल्हा समन्वयक ऋषिकेश पाथरे, सहायक अभियंता अजय विंचुरकर (मास्टर ट्रेनर), सहायक शहर जनगणना अधिकारी अक्षय निलंगे, तसेच नंदकिशोर तिखीले, भुषण पुसतकर, नितीन बोबडे, मनोज शहाळे (सहायक आयुक्त तथा चार्ज अधिकारी) यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त वर्षा लड्ढा यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून देशाच्या विकासाचा पाया आहे. शासनाच्या विविध योजना, धोरणे आणि संसाधनांचे नियोजन हे जनगणनेतून मिळालेल्या अचूक माहितीवर अवलंबून असते. त्यामुळे ही प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि जबाबदारीने पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे.तांत्रिक बाबी, नोंदणी प्रक्रिया, डेटा संकलनातील अचूकता आणि वेळेचे व्यवस्थापन या सर्व गोष्टींवर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रशिक्षण काळात मिळणाऱ्या प्रत्येक



सूचनेची नोंद करून प्रत्यक्ष कामात त्याचा प्रभावी उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी उपायुक्त योगेश पिठे यांनी प्रस्ताविकातून प्रशिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, आगामी जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत अचूक माहिती पोहोचवणे आणि ती नोंदवणे हे मोठे आव्हान असून, त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. कार्यक्रमाचे संचालन कैलास कुलट यांनी प्रभावीपणे केले. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सागर अठोर, प्रतीक खिराडे आणि अक्षय महल्ले यांनी विशेष सहकार्य केले.तीन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणामध्ये जनगणनेचे विविध टप्पे, माहिती संकलनाची पद्धत, डिजिटल साधनांचा वापर, तसेच प्रत्यक्ष क्षेत्रात येणाऱ्या अडचणींवर मात करण्याच्या उपाययोजना यावर सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे.

# सौदा तूर डाळीचा अन कट्टूयात दिले गहू

## गुरुदेवनगरातील नागरिक बनले 'एप्रिल फुल'

## डाळी ऐवजी गव्हाचे कट्टे देऊन ठगबाजाचा पोबारा

**तिवसा/वार्ताहर**

चांगल्या प्रतीची तूर डाळ हातात घेऊन,ती नागरिकांना दाखवून ,त्या डाळीचा सौदा केल्या जातो मात्र कट्टूयात गहू देऊन नागरिकांना चक्क 'एप्रिल फुल' बनविण्याचा प्रकार तिवसा तालुक्यातील गुरुदेवनगर येथे घडला आहे. काही ठगबाजांनी धान्य विक्रेते बनून अनेक जणांना डाळी ऐवजी गव्हाचे कट्टे देऊन फसवणूक केली आहे.

सध्या खुल्या बाजारात धान्याचे भाव वाढलेले दिसत आहे.तूर डाळीने शंभरी पार केल्याची संधी साधून काही ठगबाजांनी नागरिकांना




फसविण्यासाठी नवीन शक्कल लढविली.गव्हाचे कट्टे मिनीट्रक मध्ये भरून गावागावात जाणे, हातात उच्च दर्जाची आकर्षण म्हणून तूर डाळ नेणे,उच्च दर्जाची डाळ कमी किंमतीत म्हणजे ८० रुपये किलोने देण्याची बतावणी करणे,नागरिकांशी तसा सौदा करणे आणि देतांना मात्र डाळी ऐवजी गव्हाचा कट्टा देऊन सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांची हुबेहूब फसवणूक करण्याचा प्रकार रविवारी तिवसा तालुक्यातील गुरुदेवनगर येथे काही नागरिकांशी घडला.गुरुदेवनगरात नागरिकांना डाळी ऐवजी गव्हाचे कट्टे देऊन ठगबाज अज्ञात धान्य विक्रेत्यांनी हातावर तुरी देऊन पोबारा केला. जेव्हा नागरिकांनी कट्टे फोडले तेव्हा हा प्रकार समोर आला.या प्रकारामुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून ईतर नागरिकांनी सुद्धा सावध राहावे,असे आवाहन नागरिकांनीच केले आहे.एका कट्टयामागे सरळसरळ १८०० रुपयांची फसवणूक नागरिकांची झाली आहे. वृत्त लिहेस्तोवर पोलीस प्रशासन व पुरवठा विभागाकडे मात्र याबाबत कुठलीही तक्रार झालेली नव्हती.

■ काही धान्य विक्रेते हे हातात तुर डाळ घेऊन गावागावात फिरत आहे,त्याचा सौदा झाल्यानंतर देण्यात येणारा कट्टा नेमका कशाचा याची तेव्हाच खात्री करावी.जर डाळी ऐवजी गव्हाचा कट्टा दिल्यास तातडीने सदर इसमास पकडून पोलिसांच्या स्वाधीन करा.ही चक्क फसवणूक असून यापासून सर्वानी सावध राहावे.

**-प्रभाताई निखाडे**
माजी ग्रा.पं. सदस्या,गुरुदेवनगर.

### ■ नेमके किती जणांनी फसवणूक?

डाळी ऐवजी गव्हाचे कट्टे देऊन नेमके कोणकोणत्या गावात,किती नागरिकांची फसवणूक झाली,हे मात्र अद्यापही स्पष्ट झाले नसून फसवणूक झालेल्या नागरिकांनी एकत्रित येऊन पोलीस व पुरवठा विभागाकडे याबाबत तक्रार करणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त

### हरभरा पिक नोंदणी करीता मुदतवाढ



**शिराळा -** अनेक शेतकऱ्यांचे सातबारा अद्याप अपडेट झाले नव्हते. तसेच हरभरा पिक पेरा नोंदणीची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ होती. याचबरोबर हरभरा हमीभावासाठी अर्ज भरण्याची मुदतही ३१ मार्च २०२६ पर्यंतच होती.सातबारा अपडेट न झाल्यामुळे अनेक शेतकरी या प्रक्रियेतून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर शासन व नाफेड यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत मुदतवाढ ६ ते १५ एप्रिल २०२६ पर्यंत दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.चिरायू सप्तऋषी फेड फार्मर प्रोड्यूसर कंपनीने या संदर्भात वारंवार पाठपुरावा करत शेतकऱ्यांची अडचण शासन व नाफेड यांच्या निदर्शनास आणून दिली. कंपनीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही बाब लक्षात घेण्यात आली.शासन व नाफेड यांचे यासाठी मनःपूर्वक आभार शिराळा येथील शेतकऱ्यांनी मानले आहेत.

### आयुक्त वर्षा लड्ढा यांनी महापौरांची घेतली सदिच्छा भेट



**अमरावती -** नव्याने नियुक्त झालेल्या अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त वर्षा लड्ढा यांनी महापौर श्रीचंद तेजवाणी यांची सदिच्छा भेट घेतली.या भेटीत शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता तसेच नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर दोघांमध्ये सकारात्मक संवाद झाला.महापौर तेजवाणी यांनी आयुक्त वर्षा लड्ढा यांचे स्वागत करून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शहराच्या प्रगतीसाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.आयुक्त लड्ढा यांनीही शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत, नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देण्यात येईल, अशी ग्वाही दिली.यावेळी सभागृह नेते चेतन गावंडे, गटनेते डॉ.राजेंद्र तायडे,नगरसेवक संजय नरवणे, ॲड. प्रशांत देशपांडे, जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, कामेश साहु उपस्थित होते.

### कराओके गायक प्रमोद चव्हाण यांचा सत्कार



**अमरावती-** मार्डी रोड, राजुरा येथील रहिवासी तथा एसबीआय लाइफ इन्शुरन्स चे काम करणारे गायक कलावंत प्रमोद चव्हाण यांचा त्यांच्या वाढदिवस प्रित्यर्थ व त्यांच्या उत्कृष्ट गायकी करिता मुख्याध्यापक दिलीप सदार यांचे हस्ते मित्रमंडळी सह शाल व इंजिनीयर दीपक दारव्हेकर लिखित बाप माझा हे पुस्तक देऊन त्यांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. अंबादेवी जवळील गोरक्षण येथे झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी त्यांचे वाढदिवस अभिष्टचिंतन करून त्यांना त्यांच्या उज्वल भविष्याकरिता याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास प्रकाश ढोले, नरेंद्र तायडे,नंदकिशोर वानखडे, प्रा. डॉ. वामन जवंजाळ, डॉ. गोविंदभाऊ कासट. प्राचार्य दिलीपसिंह खांबरे, उमेश वैद्य, सुभाष गावपांडे इत्यादी सर्वांची उपस्थिती होती.

### कला वैभव संगीत अकॅडमीच्या 'स्वर ताल उत्सव'



**अमरावती -** स्थानिक वैभव कॉलनी, दस्तूर नगर येथील कला वैभव संगीत अकॅडमीतर्फे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, तसेच रंगमंचावर सादरीकरणाचा आत्मविश्वास वाढावा या उद्देशाने आयोजित 'स्वर ताल उत्सव – २०२६' हा संगीत सोहळा नरहरी मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात परमपूज्य श्री माताजी निर्मला देवी यांच्या पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. अतिथी म्हणून श्री महेश धनराज मूलचंदानी, डॉ. अमित वडुरकर आणि श्री मिलिंद दलाल (पुणे) यांची उपस्थिती लाभली. या संगीत महोत्सवात बालकलाकार व ज्येष्ठ कलाकारांनी शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, व्हायोलिन, हार्मोनियम वादन, तबला वादन अशा विविध माध्यमांतून दर्जेदार कलासादरीकरण केले.कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे भक्तीरसावर आधारित सुमारे ३६ भक्ती रचना विद्यार्थ्यांनी सादर केल्या.साथसंगत करणाऱ्या कलाकारांमध्ये हार्मोनियम - डॉ. संदीप दलाल, कीबोर्ड – नागेश तायडे, तबला – तारक दलाल, सर्वज्ञ दलाल, नंदन वसु, सुजल कोहळे, दीप हरणे, केशव राठी, राम बजाज यांचा समावेश होता.कार्यक्रमाचे निवेदन ठाकरे , सावदेकर व वैष्णवी बावस्कर यांनी प्रभावीपणे केले. कला वैभव संगीत अकॅडमीने केवळ भारतातच नव्हे तर रशिया, चायना, युरोपसह विविध देशांत शास्त्रीय संगीताचा प्रचार–प्रसार केला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संदीप अ. दलाल, निलिमा दलाल, रोहिणी वारेकर, अनिता दलाल तसेच संगीत वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी मोठे योगदान दिले. यावेळी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना दिशा देणाऱ्या सर्व आदरणीय गुरूजनांचे अरविंद दलाल, पं. वामनराव धावंजेवार, उस्ताद लड्डू मियां खा साहेब, डॉ. देवेंद्र यादव, मुकुंद सराफ मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

# खतटंचाईचा सांगावा



**भा**रताकडे जगातील दुसऱ्या क्रमाकांची सर्वाधिक सुमारे १,५४० लाख हेक्टर लागवडीयोग्य जमीन आहे. तीनही हंगामांत पिके घेता येणाऱ्या जगातील काही मोजक्या देशांत भारताचा समावेश आहे. हिमालयीन राज्यांतील काही जमीन वगळता देशाच्या उर्वरित भागात खरीप, रब्बी आणि उन्हाळी, अशा तीन हंगामांत पिके घेतली जातात. त्यात बारमाही फळपिकांचाही समावेश आहे. खरीप हंगामात सरासरी १,१०० लाख हेक्टरवर लागवड होते. खरिपातील पिकांसाठी देशाला सुमारे ३९० लाख टन रासायनिक खतांची गरज असते. त्यात सुमारे १९० लाख टन युरियाचा समावेश असतो.

युद्ध भडकण्यापूर्वी झालेली आयात आणि देशातील विविध खत प्रकल्पांमध्ये उत्पादित झालेल्या खतांचा सुमारे ४६ टक्के साठा उपलब्ध (ओपनिंग स्टॉक) आहे. पण आणखी सुमारे ३० टक्के खतांची मागणी जगभरातील देशांकडे नोंदविली गेलेली असून तिचे मात्र भवितव्य अधांतरी आहे. कारण आखाती युद्धामुळे आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक जवळपास बंदच असल्यामुळे खतांच्या पुरवठ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. खतटंचाईचा प्रश्न इतका गंभीर आहे की, आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक आढावा बैठकीत खतांच्या मुद्द्यावर चर्चा केली जात आहे.आपली खतांची गरज पूर्ण करण्यासाठी प्रामुख्याने ओमान, रशिया, सौदी अरेबिया, मोरोक्को आणि चीन यांसारख्या देशांतून आयात केली जाते. अडचणीच्या काळात चीन नेहमी दगा देतो, त्याचा प्रत्यय आताही येत आहे. चढ्या दराने करार करूनही चीन खते आणि कच्च्या मालाच्या निर्यातीत हात आखडता घेत आहे.

आखातातून तयार युरिया आणि युरिया निर्मितीसाठी लागणाऱ्या नैसर्गिक वायूची आयात विस्कळीत झाली आहे.

डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) प्रामुख्याने रशिया, सौदी अरेबिया, चीन, मोरोक्को आणि जॉर्डन या देशांवर अवलंबून आहे. पण ही आयात विस्कळीत झाली आहे. भारतात पोटॅशचे (एमओपी) साठे नसल्यामुळे देशाला १०० टक्के आयात करावी लागते. मुख्यत्वे सौदी अरेबिया, मोरोक्को, कॅनडा, रशिया आणि बेलारूसमधून याची आयात होते. नत्र, स्फुरद, पलाश (एनपीके) या संयुक्त खतांसाठी रशिया हा भारताचा सर्वात मोठा पुरवठादार असून, त्याखालोखाल सौदी अरेबिया, चीन आणि इंडोनेशिया या देशांचा क्रमांक लागतो. देशात युरिया निर्मिती प्रकल्प आहेत, पण त्यांना क्षमतेच्या ६० टक्के नैसर्गिक वायूचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे युरिया निर्मितीवर परिणाम झाला आहे. स्फुरद, पलाश खतांची सुमारे ९० टक्के आयात करावी लागते, ही आयात बंद आहे. जॉर्डन, ट्युनिशिया, ओमानमध्ये भारतीय खत कंपन्या इफ्को, कृभको यांचे खतांचे प्रकल्प आहेत. पण युद्धजन्य स्थितीमुळे उत्पादन विस्कळीत झाले आहे.रशिया, युक्रेन, कॅनाडा, इंडोनेशियामधून पर्यायी खत आयातीचे प्रयत्न सुरू आहेत. पण त्यात अनेक अडचणी येत आहेत. केंद्र सरकारकडून गतवर्षी सर्व प्रकारच्या खत आयातीवर सुमारे १.३० लाख कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. रशिया- युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर २०२२-२३ खतटंचाई निर्माण झाल्यामुळे २.२५ लाख कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. यंदाही खतांवरील अनुदान दोन लाख कोटींच्या पुढे जाण्याचा अंदाज आहे. आखाती देश युद्धाच्या खाईत लोटले असल्यामुळे खते आणि खतांसाठीच्या कच्च्या मालाच्या आयातीवर मोठा परिणाम झाला आहे.होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी आयात बंद असल्यामुळे बिगरआखाती देशांतून होणारी खतांची आवक थांबली आहे. अन्य पर्यायी समुद्रमार्गाचा वापर केला तर वाहतूक खर्चात वाढ होते. शिवाय युद्धजन्य स्थितीमुळे खतांचे दरही वाढले आहे.

वाढीव दराने करार करूनही खतांची आयात होत नाही.

जहाज वाहतूक कंपन्या आणि जहाज वाहतुकीला विमा संरक्षण देणाऱ्या कंपन्याही वाहतूक करण्यास तयार नाहीत. त्यामुळे खरीप हंगामात युरियासह अन्य खतांची टंचाई भासणार हे जवळपास नक्की आहे.

हंगामातील पहिले दोन महिने पुरेल इतकाच खतसाठा आहे. सरकार उपलब्ध खतांचे वितरण कसे करते, काळाबाजार, दरवाढ कसे रोखते, यावरच यंदाच्या खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून आहे.

# ॲमेझॉनः जगाचे 'फुप्फुस' धोक्यात!

**मा**नवनिर्मित विविध कारणांमुळे पृथ्वीचे 'फुप्फुस' म्हटल्या जाणाऱ्या ॲमेझॉनच्या जंगलाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे हे असेच सुरू राहिले तर २०५० सालापर्यंत ॲमेझॉन जंगल दुर्धर अशा पर्यावरणीय संकटात सापडू शकते, असा धोक्याचा इशारा अभ्यासकांकडून दिला जातो आहे. जंगलाची नैसर्गिक रचना एकदा बदलली की त्याचा मोठा भाग कोरडाठाक बनू शकतो. जगाचे हे फुप्फुस उत्कृष्ट रीतीने कार्यरत राहणे ही भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाची आणि दुर्लक्ष करता न येण्यासारखी बाब आहे.


पृथ्वीवरील सर्वात मोठे वर्षावन असणाऱ्या ॲमेझॉनला 'जगाचे फुप्फुस' म्हणून ओळखले जाते. जगातील सर्वात मोठे असे हे वर्षावन पृथ्वीवरील ऑक्सिजन मोठ्या प्रमाणावर एकट्याने तयार करण्याचे महत्त्वाचे काम करते. तसेच मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साईड शोषून घेत असल्याने पृथ्वीवरील हवामान बदलाचा वेग कमी होण्यास त्याची मोठी मदत मिळते. हे जगाचे फुप्फुस आजच्या घडीला विविध कारणांमुळे धोक्यात येत आहे, असा गंभीर इशारा अभ्यासकांनी दिला आहे.

मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड आणि हवामान बदलाचे होत असलेले गंभीर परिणाम या दोन गोष्टी त्याला प्रामुख्याने कारणीभूत ठरत असल्याचे जाणकारांचे मत आहे. सातत्याने लागणाऱ्या आणि लावल्या जाणाऱ्या आगींमुळे खूप मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचे नुकसान होते आहे. ॲमेझॉनची जंगले ही दलदल आणि गवताळ प्रवेशाने व्यापलेली आहेत. या जंगलांमध्ये जैवविविधतादेखील प्रचंड आहे. ४० हजार प्रकारच्या वनस्पती या जंगलात असल्याचा दावा अभ्यासक करतात. त्यामध्ये अनेक दुर्मिळ आणि फक्त ॲमेझॉनच्या जंगलातच सापडतील अशाही वनस्पतींचा समावेश आहे. येथे सस्तन प्राण्यांच्या ५२५ हून अधिक प्रजाती आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ३७५ हून अधिक प्रजातींचा समावेश आहे. तसेच सुमारे तीन हजारांहून अधिक माशांचे प्रकार येथे आहेत. त्यामुळे ॲमेझॉनचे जंगल म्हणजे एक स्वतंत्र परिसंस्थाच आहे असे मानले जाते.

शेकडो प्रकारच्या स्थानिक समुदायांचे हे आश्रयस्थान आहे. जगातील सर्वात मोठी ॲमेझॉन नदीसुद्धा इथूनच वाहते आणि या नदीच्या तब्बल ११ उपनद्या आहेत. गोड्या पाण्याचा सर्वात मोठा स्रोतदेखील येथेच आहे. हे पाणी पुढे अटलांटिक समुद्राला मिळते. मात्र, अ?मेझॉनच्या या जंगलातून कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन वाढत असल्याचे आता दिसून येत असल्याने अभ्यासकांच्या चिंतेत भर पडली आहे. जंगलांची तोड, जमिनीचा ऱ्हास या गोष्टी जशा त्याला कारणीभूत आहेत त्याचप्रमाणे तापमानातील वाढ, दीर्घकाळ सुरू असलेला दुष्काळ आणि जंगलात सतत पेटत असलेले वणवे हेदेखील ॲमेझॉनच्या समृद्धतेला व संपन्नतेला बाधा आणत आहेत. एरवी हिरवेगार असणारे हे जंगल आता अनेक ठिकाणी कोरडे पडत चालले असून त्याचे अनेक भाग आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत.

वृक्षतोडीची गंभीर समस्या

ॲमेझॉनच्या जंगलात मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड हा केवळ पर्यावरणाचाच नाही, तर संपूर्ण पृथ्वीवरील जैवविविधतेचा आणि हवामानाचा अत्यंत गंभीर असा प्रश्न आहे. दक्षिण अमेरिकेतील नऊ देशांमध्ये पसरलेले ॲमेझॉनचे जंगल हे जगातील सर्वात मोठे उष्णकटिबंधीय जंगल आहे. 'पृथ्वीचे फुप्फुस' म्हणून ओळखले जाणारे हे जंगल ऑक्सिजनची निर्मिती, कार्बनचे उत्सर्जन, जलचक्र संतुलन आणि लाखो प्रजातींचा निवास यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. तथापि, गेल्या काही वर्षांत वृक्षतोडीच्या समस्येने इथे अनेक गंभीर प्रश्न निर्माण केलेले आहेत.



ॲमेझॉनमधील जंगलतोडीचे मुख्य कारण म्हणजे कृषिविस्तार. सोयाबीन, ऊस आणि इतर खाद्यपिकांच्या उत्पादनासाठी या भागात शेती केली जाते. त्या शेतीसाठी जमीन मिळावी म्हणून वृक्षतोड केली जाते. तसेच गाई-म्हशींना चरायला जागा मिळावी म्हणूनदेखील वनक्षेत्रे साफ केली जातात. ब्राझीलमध्ये मांसनिर्मिती उद्योगात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. त्यामुळे पशुपालनाकडे लोकांचा कल वाढतो आहे. जनावरे बाळगण्यासाठी आणि चारण्यासाठी जी जागा लागते ती वृक्षतोड करून मिळवली जाते. बेकायदेशीर लाकूडतोड हीदेखील एक मोठी समस्या आहे. जंगलात झाडांची समृद्धता असल्याकारणाने तेथील महागडी झाडे अवैध मार्गाने तोडून त्यांची तस्करी केली जाते. नियमबाह्य पद्धतीने होणारी ही वृक्षतोड हे पर्यावरणाचे नुकसान होण्याचे मुख्य कारण मानले जाते.

पृथ्वीवर ज्ञात असलेल्या एकूण प्रजातींपैकी १० टक्के प्रजाती एकट्या ॲमेझॉनच्या जंगलात आहेत, असा अभ्यासकांचा सांगावा आहे. परंतु गेल्या काही वर्षांत वाढत्या वृक्षतोडीचे परिणाम या जंगलातही दिसून येऊ लागले आहेत. हवामान बदलाचे परिणाम येथेदेखील जाणवू लागले आहेत. वाढत्या वृक्षतोडीमुळे कार्बनडॉयऑक्साईडचे उत्सर्जन वाढते, एकूण दैनंदिन तापमानात वाढ होते, जागतिक हवामानाचे चक्र असंतुलित होते. वृक्षतोडीमुळे पर्जन्यमान बदलते आणि कालांतराने दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ लागते. हा परिणाम अलीकडच्या काळातील आकडेवारीवरून समोर आला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आता वृक्षतोडीची समस्या गंभीर बनली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावर प्रभावी असा तोडगा काढणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे खाणकाम करणारी माणसे आणि बेकायदेशीररीत्या वृक्षतोड करणारे तस्कर यांच्यावर कडक निर्बंध जारी करणे गरजेचे बनले आहे.ज्याप्रमाणे वृक्षतोड ही एक गंभीर समस्या आहे त्याचप्रमाणे जंगलांमध्ये लागणाऱ्या आगी हेसुद्धा जंगल नष्ट होण्याचे प्रमुख कारण मानले जाते आहे. २०२४ साली ॲमेझॉनच्या जंगलांमध्ये आग लागण्याची १लाख ४० हजार ठिकाणे निदर्शनास आलेली होती. २०२३ सालच्या तुलनेत हे प्रमाण जवळपास दुप्पट झाल्याचे दिसून आले आहे. २००७ सालानंतर हे सर्वाधिक प्रमाण वाढल्याचे अभ्यासकांच्या लक्षात आले आहे. २०२४ सालच्या ऑगस्ट महिन्यामध्ये ॲमेझॉनच्या जंगलात लागलेल्या आगीत नष्ट झालेले वनक्षेत्र ६ लाख ८५ हजार हेक्टर इतके होते. २०२३च्या तुलनेत हे प्रमाण तब्बल १३२ टक्क्यांहून जास्त आहे. या आगींमध्ये केवळ जंगलच नाही, तर कृषिक्षेत्राचेही खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान होते आहे. ऊाहर्जेम या संस्थेने यासंदर्भात एक अहवाल प्रकाशित केलेला असून त्यानुसार, २०२४ साली ॲमेझॉनच्या जंगलात लागलेल्या आगींचे प्रमाण अलीकडच्या काळातील सर्व वर्षांतील आगीच्या तुलनेत सर्वाधिक होते. अशा आगींमुळे जंगले ताबडतोब नष्ट होत नाहीत; परंतु जंगलातील जमिनींची गुणवत्ता घसरते. तसेच स्थानिक जनजाती, वन्यजीवांवर त्याचा विपरीत परिणाम होतो. वनातील एकूणच परिसंस्था यातून धोक्यात येऊ शकते अशी भीती अभ्यासक वर्तवतात.

मानवनिर्मित विविध कारणांमुळे पृथ्वीचे 'फुप्फुस' म्हटल्या जाणाऱ्या ॲमेझॉनच्या जंगलाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे हे असेच सुरू राहिले तर २०५० सालापर्यंत ॲमेझॉन जंगल दुर्धर अशा पर्यावरणीय संकटात सापडू शकते, असा धोक्याचा इशारा अभ्यासकांकडून दिला जातो आहे. जंगलाची नैसर्गिक रचना एकदा बदलली की त्याचा मोठा भाग कोरडाठाक बनू शकतो. जगाचे हे फुप्फुस उत्कृष्ट रीतीने कार्यरत राहणे ही भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाची आणि दुर्लक्ष करता न येण्यासारखी बाब आहे.

**पराग पोतदार**

# निवृत्तीचा प्रवास एका 'अतिरिक्त' आनंदाचा...

**३०** मार्च २०२६ ची ती संध्याकाळ माझ्या आयुष्यातील एका मोठ्या पर्वावर पडदा पाडणारी होती. निवृत्ती! हा शब्द ऐकायला जेवढा शांत वाटतो, तेवढीच अस्वस्थता मनात दाटून आली होती. तब्बल ३३ वर्षे आणि ७ महिन्यांचा हा काळ एखाद्या चित्रपटासारखा माझ्या डोळ्यांसमोरून सरकत होता. कपाटातील ती जुनी फाईल काढली की हिंगणघाट, मोझरी आणि कोरा येथील सुरुवातीचे दिवस आठवतात. ९० च्या दशकात अभ्यासक्रम बदलला आणि माझ्यासारख्या अनेक शिक्षकांवर 'अतिरिक्त' होण्याचे संकट आले. पण नियतीला काहीतरी वेगळेच आणि अधिक चांगले द्यायचे होते.

१९ डिसेंबर १९९७ रोजी माझ्या हातात आदेश पडला.'सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय, कामठी'. एका अनोळखी शहरात, अनोळखी संस्थेत जाताना मनात धाकधूक होती. पण प्राचार्य डॉ. भांदककर आणि रजिस्ट्रार वर्माजी यांनी ज्या प्रेमाने माझे स्वागत केले, तिथेच माझा अर्धा ताण निळा झाला. शासन आदेशाचा मान राखून एका 'अतिरिक्त' ठरलेल्या शिक्षकाला आपल्या परिवारात सन्मानाने सामावून घेण्याची या संस्थेची वृत्ती खरोखरच महान होती.

माझ्या या दुहेरी भूमिकेला मिळालेली दाद हीच माझी खरी कमाई. निरोप देताना मिळालेल्या भेटवस्तू आणि फुलांच्या बुकेपेक्षाही, 'तुमच्या लेखणीत समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य आहे' असे जेव्हा कोणीतरी म्हणाले, तेव्हा शिक्षक म्हणून मिळालेल्या कृतज्ञतेत पत्रकार म्हणून मिळालेल्या समाधानाची एक पावती असते.काही लोक म्हणतात निरोप म्हणजे अंत. पण मला वाटतं, निरोप म्हणजे 'नव्याने भेटण्याची पूर्वतयारी. ज्या मातीने आपल्याला वाढवलं, ज्या आभाळाने आपल्याला स्वप्न बघायला शिकवलं, तिथून बाहेर पडणं सोपं नसतं. पण झाडालाही आपली पानं गाळावी लागतात, नव्या पालवीसाठी... आणि पाखरालाही घरटं सोडावं लागतं, क्षितिजाचा शोध घेण्यासाठी. निवृत्ती म्हणजे केवळ कामाचा शेवट नसतो, तर तो स्वतःला पुन्हा नव्याने शोधण्याचा मार्ग असतो. कार्यक्रमात एकामागून एक तब्बल २२ सहकारी आणि कर्मचारी यांनी आपली मनोगते मांडली. कोणी जुन्या आठवणींना उजाळा दिला, तर कोणी भविष्यातील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. प्रत्येकाच्या शब्दांत एक आपुलकी होती. सत्कार झाला, मानपत्र मिळालं, भेटवस्तूंचा ढीगही जमला; पण खरी भेट होती ती समोर बसलेल्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आदर. निरोप घेताना काळजाचा कोपरा थोडा जड झाला होता. निरोप घेऊन महाविद्यालयाच्या गेटबाहेर पडलो, तेव्हा वाटलं होतं की आता हा प्रवास एकट्याचाच. पण संस्कार आणि स्नेह इतके कच्चे नसतात. प्रा. पंकज गौरकर, प्रा. वैशाली मस्के आणि प्रा. स्वाती निंबाळकर या माझ्या सहकाऱ्यांनी केवळ निरोप दिला नाही, तर ते माझ्यासोबत सावलीसारखे सोबत आले. चक्क १२० किलोमीटरचा प्रवास करत त्यांनी मला वर्ध्याच्या माझ्या निवासस्थानी सुखरूप सोडलं. प्रवासात गप्पांचा ओघ सुरूच होता, पण मनात विचार येत होता की, नाती किती खोलवर रुजली आहेत! फुलांचा तो सुगंध आणि शुभेच्छांची ती गाठोडी घेऊन जेव्हा मी घराकडे निघालो, तेव्हा जाणीव झाली की, आयुष्याच्या या वळणावर मी निवृत्तीची श्रीमंती घेऊन चाललो आहे. १२० किलोमीटरचा तो परतीचा प्रवास त्या फुलांसारखाच सुगंधी आणि सुखकर झाला, कारण सोबतीला मैत्रीचा आणि आदराचा तो अफाट 'बुके' सदैव माझ्या सोबत होता.

आज मी माझ्या घरी निवांत बसलेलो असलो, तरी मन अजूनही महाविद्यालयाच्या त्या कॉरिडॉरमध्ये घुटमळतंय. माझ्या जागी आता प्रा. विश्वनाथ वंजारी यांची नियुक्ती झाली आहे, तर प्रा. एन. डी. मेंढे पर्यवेक्षक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. कामाच्या खुर्च्या बदलतात, माणसं बदलतात, पण विचारांचा आणि प्रेमाचा हा प्रवाह कधीच थांबत नाही.सहकाऱ्यांचे हे समर्पण 'शिक्षक' या नात्यापलीकडचे एक कौटुंबिक नाते अधोरेखित करून गेले. महाविद्यालयातील ती जिद्द, तो आदर आणि सहकाऱ्यांनी दिलेली ही मायेची सावली सदैव माझ्या हृदयाच्या कोपऱ्यात जिवंत राहील. निरोपाचा तो भावूक क्षण संस्मरणीय ठरला, जेव्हा प्रा. पंकज गौरकर, प्रा. वैशाली मस्के आणि प्रा. स्वाती निंबाळकर यांनी चक्क १२० किलोमीटरचा प्रवास करून मला माझ्या वर्ध्याच्या निवासस्थानी सुखरूप पोहोचवले. सहकाऱ्यांचे हे समर्पण 'सहकारी' या नात्यापलीकडची कौटुंबिक ओढ अधोरेखित करून गेले. आज निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना, मागे वळून पाहताना फक्त आठवणींचा सुगंधी मळा दिसतोय, जिथे अपूर्ण राहिलेली कामे आता पुढच्या पिढीच्या विश्वासावर सोपवून मी समाधानाने नवा प्रवास सुरू करत आहे. हा निरोप म्हणजे एका गौरवशाली अध्यायाचा शेवट नसून, आठवणींच्या गावाकडे जाणारी एक नवी आणि सुखद वळणवाट आहे. मागे वळून पाहताना दिसतो तो फक्त आणि फक्त कृतज्ञतेचा महासागर!

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
९५६१५९४३०६



# ....उगाच काडीमोड!

**आ**पला सांस्कृतिक देश, विविध संस्कारांनी घडलेले समाज या देशाचे वैभव म्हणजे विविध विधी, सण, उत्सव, रीत, प्रथा, परंपरा, रीवाज आणखी काय काय ते पायंडे असलेला भारत.मानव सुसंस्कृत झाला की, त्याला सभ्य मानव (शिष्टाचार) म्हणून ओळखले जाते.सभ्यपण जपण्यासाठी पण माणसाला सुसंस्कृत रहाणे आवश्यक आहे.सुसंस्कृत म्हणजे चांगल्या संस्काराने राहणे व चांगले संस्कार म्हणजे मानवी उत्क्रांतीचे टप्पे आहे.

एकीकडे उत्क्रांतीचा सिद्धांत आपण चार्लेस डार्विन यांचे नावे लावतो. परंतू उत्क्रांती ही मानव वंशाच्या जडणघडणतीतून निसर्गतः घडते.त्यामुळे मानवी उत्क्रांती ही आजतायगत सुरू आहे.मात्र मानवी उत्क्रांती आता सीमाबद्ध व्हायला पाहिजे;नाही तर ! मानवी वंश हा पुन्हा पशुवत व्हायला सुरुवात झाली असा सवाल समाज व्यवस्थेत दिसतो.मेरठ येथे घडलेली घटना व नुकताच केलेला सर्वे म्हणजे भयंकर विचार करायला लावते.आजची पिढी उद्याच्या पिढीचे वाटोळे करू शकते.ही परिस्थिती दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे त्या विषयाकडे लक्ष देणे गरजेचे वाटते. हा विषय सर्व जाती, पंथ, संप्रदाय व धर्म यांचा आहे.या विषयाची गरज समजून घेताना आपल्या आयुष्याचे उद्दिष्ट सुद्धा आपल्या समजदारीच्या स्तरावर मोजता येईल.शहरातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये नोंदविलेले गुन्हे किती आणि कसे याबाबत माहिती जाणून घेण्याची उत्सुकता कुणालाही असते.त्यामुळे गुन्ह्याचे प्रकार कोणते? असा प्रश्न नक्कीच आपल्याला पडतो.त्या गुन्हाचे स्वरूप दिवसेंदिवस वाढत जात असेल तर त्याचा पूर्ण परिणाम समाजव्यवस्थेला पोखरुन मानवी वंशाचे विघटन व्हायला सुरुवात झाली; असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही.

२०१७ ते २०२५ या आठ वर्षात अमरावती शहरातील पोलिस स्थानकात नोंदविले गेलेल्या १०७८ गुन्ह्याचे अवलोकन केले.त्यावरून त्या गुन्हाचे वाढते प्रमाण व त्याचा निकाल पाहून थक्क होतो.कारण एवढे गुन्हे नोंदून शेवटी पोलिस विभागाची माहिती मिळते की एकाही केसमध्ये कन्व्हिक्शन (दोषी आढळले )नाही.मात्र गुन्हा नोंद झाल्यावर घडवणाऱ्या वयातील प्रत्येकाच्या आयुष्याचे व सामाजिक पातळीवरील परिणाम चिंताजनक आहे.यात शिक्षितांचे प्रमाण अधिक तर लाडक्या बहिणीचे प्रमाण अधिकच आहे.त्यामुळे उगाच आपल्या आयुष्याला उध्वस्त करण्यासाठी खतपाणी घालणारे विषय आपल्या सामाजिक व्यवस्थेतून बीमोड केले पाहिजे.त्यासाठी लढा उभारणाऱ्यांना सहकार्य करावे.आपली बाजू मांडण्यासाठी नोकरी करणाऱ्या पक्षकाराला व्हिडिओ कॉन्फरन्स उपलब्ध करणे हा निर्णय घेण्यास पत्नी पीडित पक्षकाराने कोर्टात (अमरावती) मांडला त्यासाठी खूप खस्ता खाव्या लागल्या. पण कोर्टाला बाध्य करून आपल्या आयुष्याचा छळ पीडित पक्षकाराला कमी करावा लागतो.हैदराबाद येथील सुभाष तिवारी वैवाहिक मानसिक ताण प्रकरणासारखे अनेक प्रकरणे उघडीस येत आहे.

खरे तर ! व्यक्ती जन्माला येतो नैसर्गिक प्रक्रियेतून; अन् त्याचे संगोपन कुटुंब व्यवस्थेतून होते.या कुटुंब व्यवस्थेला निर्माण व्हायला मानवी वंशाची हजारो वर्षे खर्ची गेली.कारण कुटुंब ही धारणा मानवाच्या सुरक्षेपासून तर ती सुरक्षा कुठल्या घटकांपासून मिळते हा एक शैक्षणिक प्रवास आहे.कुटुंब म्हणजे स्त्री पुरुष एकत्र येऊन प्रसूत झालेल्या स्त्रीला माता व ज्यामार्फत झाले तो पुरुष म्हणजे पिता आणि जन्माला आलेलं अपत्य यांचे संयुक्त रूप होय. ही प्रक्रिया आता सभ्यतेच्या दारापर्यंत आली.अपत्य झाल्यानंतर त्याचे संगोपन, भरणपोषण ही प्रक्रिया मानवाला प्रेम, सेवा, भावना या मूल्यातून सहज प्राप्त झाली.मातृत्व वात्सल्याने, पितृत्व दातृत्वाने तर कुटुंब प्रेमाने पूर्ण होत.समजदारीचा काळ म्हणेज प्रत्येकाच्या शारीरिक वाढीसोबत होणाऱ्या हार्मोन्स निर्मितीच्या काळातील बदल व त्याच्या जाणिवेची मानसिक हालचाल यावरून निश्चित होतो.अशी सर्व प्रक्रिया जेथे घडतात ते कुटुंब, व कुटुंबाची जडणघडणं जिथे होते तो समाज. अशी व्यापक मानवी वंशाची संरचना आहे.या मानवी संरचनेचे आधार मानवी मूल्यांचे निर्वाहन केल्याने होते.मानवी मूल्य संबंधाच्या आधारे निश्चित व संबंध निश्चित झाले ते आई- वडील, आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी, आत्या मामाजी, मावशी- काकाजी इथंपर्यंतचे नातेसंबंध.

मात्र नात्यासंबंधाची खरी सुरुवात सासू सासरे यांच्या पासून होते. स्त्री (पतिपत्नी)पुरुषाचे आई वडील हे सासू सासरे या नात्याने जेव्हा एकत्र येतात तेव्हा समाज रचनेचा पाया निर्माण होतो.कारण दोन वेगळ्या कुटुंबाची बांधणीने समाज रचना बनत असतो.समाजाचे उद्योगधंदे हे उदरनिर्वाहाच्या पलीकडे. उदरनिर्वाह व्यवसाय व नोकरी करून होतो.शेती पूर्वापार, नंतर उद्योग व व्यापार अशी व्यवस्था व ती टिकवण्यासाठी व्यवस्थापन, प्रशासन, परिवहन व सरकार इथपर्यंतचा झालेला प्रवास म्हणजे संपूर्ण मानवी व्यवस्था असे म्हणता येईल.उत्तर प्रदेशातील माजी न्यायाधीशाने आपल्या मुलीला वाजत गाजत काडीमोड करून आणले. ही घटना बघून पोलिस ठाण्यात नोंदवलेल्या गुन्ह्याची माहिती घेताना, त्यात घरोघरी होत असलेल्या अत्याचारात स्त्री पुरुषाची(किरकोळ) भांडणे. मग स्त्री ही अबला अशा धारणेत तिला दिलेल्या सवलती म्हणजे तिच्या हाती कायदेशीर शक्ती, पोलिस संरक्षण व कायद्याचा फायदा असल्याने आमच्या मुलीला सासरचा खूप त्रास आहे! म्हणून कौटुंबिक अत्याचार या गुन्हाअंतर्गत कित्येक युवकांचे व युवतींचे (संसार) आयुष्य उध्वस्त होत असल्याचा आलेख; कौटुंबिक न्यायालयात प्रलंबित प्रकरणावरून दिसून येतो.कोर्टाच्या आवारात बालसंकुल बघताना निरागस अपत्यांची ताटातूट मानवी समाज रचनेला कॅन्सर लागल्यागत दिसते.पाल्याला भेटायला आलेला पालक त्याच्या स्वप्नांना कायद्याच्या चौकटीत बसवताना होणारी मानसिक घुसमट किती होते हे कायदाने समजून घ्यावे, त्याचा विचार व्हावा.कारण वैवाहिक जीवनाच्या काही दिवसातच बहुतेकांना कलम ४९८(अ) (भा.न्या.सं ८५)अंतर्गत नोंदवले गुन्हे हे कौटुंबिक व्यवस्था उध्वस्त करून मानवी संवेदनांना हिंसक वळण देणारे ठरत आहे.

एकीकडे कन्यादान सोहळा लग्नात साजरा करणारे, मुलीचे आई वडील मुलीच्या संसारात ढवळाढवळ करून मुलीचे आयुष्य उध्वस्त करीत असल्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते दिसते. पोलिसांची (कोठडी) भीती, काही वकिलांनी (व्यवसाया साठी) केलेले चुकीचे मार्गदर्शन, कोणतेही ठोस(पुरावे)कारण नसताना किंवा आर्थिक संकटाला न समजून घेता पुरुषाला दोषारोपण करून, आपला 'इगो' जपणाऱ्या आई वडिलांनी भरल्या संसारात (लेकीच्या) माती घालण्याचे प्रकार भयंकर वाटते.

आपल्या मुलीला वाजत गाजत सासरी पाठवणारे आई वडील काडीमोड करून लेकीला वाजत गाजत आणताना (मेरठ घटना)आता ही विवाह संस्था मोडकळीस येऊन अशा पद्धतीच्या संसाराने समाज व्यवस्थेत अराजकता, व्यसनाधीनता, लैंगिक शोषण व येणाऱ्या पिढींचे भवितव्य अनैतिकतेच्या उंबरठ्यावर येऊन ठेपतील.

कारण उभरत्या मानसिकतेला अशा प्रकरणामुळे खीळ बसते व त्याचे पर्यावसन म्हणजे बीगसिटी, मेट्रोसिटी सारख्या महानगरात तिशी ते चाळीशीतील प्रौढत्वाचा उंबरठा धरलेले स्त्री पुरुष गेट टू गेदर मध्ये आपला पार्टनर शोधून तत्क्षणिक आनंदात आपल्या भविष्याची उधळण करताना उगाच काडीमोड नको यार..

**डॉ.प्रवीणकुमार राऊत.**
(समुपदेशन व मानसोपचार)
७७९८६४५५६५.

# युद्धाच्या छायेतही सेवाग्रामचा शांततेचा दीप उजळला



**सेवाग्राम।वर्धा जनमाध्यम**
जगभर तणाव आणि संघर्षाचे ढग दाटत असताना, गांधी विचारांची पावन भूमी सेवाग्राममधून शांतता, अहिंसा आणि मानवतेचा भावनिक संदेश घुमला. सर्वोदय शिक्षण शिबिराच्या निमित्ताने युद्ध नको, शांतता हवी हा हृदयस्पर्शी नारा संपूर्ण परिसरात दुमदुमला आणि उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेला.

शिबिरादरम्यान आयोजित सर्वधर्म प्रार्थनेत विविध धर्मांच्या मूल्यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. या प्रार्थनेतून सहअस्तित्व, परस्पर आदर आणि विश्वबंधुत्वाची भावना व्यक्त झाली. युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत, शांततेचा संदेश केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतूनही जिवंत ठेवला.

प्रार्थना सभेत बोलताना ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत राम धीरज, अरविंद अंजुम, बजरंग सोनवणे, अविनाश काकडे, शेख हुसेन, कु. आसमा तसेच सर्व सेवा संघाचे अध्यक्ष चंदन पाल यांनी युद्धाच्या भीषण परिणामांची जाणीव करून दिली. युद्ध कुठेही झाले तरी त्याची झळ सामान्य नागरिकांनाच बसते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो आणि समाजातील सौहार्द तुटते, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. सध्याच्या जागतिक परिस्थितीत युद्धजन्य वातावरणाचा वापर राजकीय अपयश झाकण्यासाठी केला जातो, ही बाब चिंताजनक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वक्त्यांनी अमेरिका-इराण तणावाचा संदर्भ देत अशा संघर्षांमुळे निरपराध नागरिकांचे प्राण जातात आणि जागतिक शांतता धोक्यात येते, असे सांगितले. 'मानवतेच्या मूलभूत मूल्यांवर घाला घालणाऱ्या या प्रवृत्तीला थांबवणे हीच काळाची गरज आहे, असा संदेश त्यांनी दिला.

शिबिराच्या अंतर्गत सांस्कृतिक हस्तक्षेप आणि सामाजिक जागरूकता या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. बजरंग सोनवणे, नंदलाल मास्टर, अविनाश काकडे आणि भूपेश भूषण यांनी युवकांना मार्गदर्शन करताना शिक्षण, माध्यमे आणि संस्कृतीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवता येतो, असे सांगितले. त्यासाठी संविधानिक जाणीव, चिकित्सक विचार आणि नैतिक मूल्यांची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सायंकाळच्या सत्रात सामूहिक खेळांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, सहकार्य आणि परस्पर समन्वयाचा अनुभव देण्यात आला. या उपक्रमांनी एकजुटीची भावना अधिक दृढ केली. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन भूपेश भूषण, सचिन उगले, विक्रांत कांबळे, श्वेता गेलोतर यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केले. सेवाग्राममधील हे सर्वोदय शिक्षण शिबिर केवळ एक कार्यक्रम न राहता, शांतता, अहिंसा आणि मानवतेचा जिवंत संदेश ठरले. युद्धाच्या पार्श्वभूमीवर सेवाग्रामने पुन्हा एकदा जगाला शांततेचा मार्ग दाखवला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सिंदीत आंदोलनाला तात्पुरता विराम

## आमदारांकडून ग्रामीण रुग्णालयाचे लेखी आश्वासन



**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** ग्रामीण रुग्णालयाच्या मागणीसाठी सिंदीत सुरू असलेल्या आंदोलनाला आमदार समीर कुणावार यांच्या मध्यस्थीनंतर तात्पुरता विराम मिळाला आहे. आंदोलकांशी चर्चा करून जुलै २०२७ पर्यंत ग्रामीण रुग्णालय मंजूर करून आणण्याचे लेखी आश्वासन आमदारांनी दिले. या आश्वासनानंतर आंदोलन समितीने सध्या आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सिंदी रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळावा, या मागणीसाठी नागरिकांनी टप्प्याटप्प्याने आंदोलन छेडले होते.

जानेवारी महिन्यात ठिय्या आंदोलनाने सुरुवात झाली. त्यानंतर १५३७ नागरिकांनी स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून शासनाचे लक्ष वेधले. या अनोख्या आंदोलनामुळे प्रशासनालाही दखल घ्यावी लागली. आंदोलनाच्या पुढील टप्प्यात 'भीक मागो आंदोलन' करण्याचा इशारा देण्यात आला होता. मात्र, आंदोलन तीव्र होण्यापूर्वीच आमदार कुणावार यांनी पुढाकार घेत आंदोलन समितीशी चर्चा केली.

यावेळी त्यांनी ग्रामीण रुग्णालयासाठी प्रयत्न करण्याचे आणि त्यासंदर्भात ठरावीक कालमर्यादा देण्याचे मान्य केले.

लेखी आश्वासन मिळाल्यानंतर परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, आश्वासनाची अंमलबजावणी न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा आंदोलन समितीने दिला आहे.

## संक्षिप्त

### खरेदी केलेल्या घरावर अवैध कब्जा

**वर्धा :** बँकेमार्फत कायदेशीररीत्या खरेदी केलेल्या घरावरच मूळ कर्जदाराने कब्जा केल्याचा प्रकार समोर आला आहे. नेहा परवीन नूर अली (३१) यांनी बँकेकडून प्रक्रिया पूर्ण करून घर खरेदी केले होते. संबंधित व्यक्तीने पूर्वी घेतलेले कर्ज न फेडल्यामुळे बँकेने घराचा ताबा घेतला होता. मात्र, त्यानंतर संबंधिताने घराचे कुलूप तोडून पुन्हा कब्जा केल्याची तक्रार आहे. हा प्रकार उघडकीस येताच परिसरात आश्चर्य व्यक्त होत आहे. कायदेशीर प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या घटनेने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. रामनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### बांधकाम स्थळावरून ३ क्विंटल लोखंड चोरी

**वर्धा :** शहरातील मांढरे ले-आउट, हरीहरनगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी बांधकाम स्थळावरून लोखंड चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. राधा पडवे (३५) यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू असून त्याठिकाणी साहित्य ठेवले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी सुमारे १५ हजार रुपयांचे ३ क्विंटल लोखंड लंपास केले. सकाळी हा प्रकार लक्षात येताच परिसरात खळबळ उडाली. अलीकडील काळात बांधकाम साहित्य चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.`

# प्लास्टिक बंदीचा फज्जा; प्रशासन झोपेत, साहूर प्लास्टिकच्या विळख्यात

**साहूर जनमाध्यम :** 'प्लास्टिकमुक्त भारत'ची घोषणा मोठ्या दिमाखात केली जाते, पण प्रत्यक्षात साहूर व परिसरात प्लास्टिकचा सुळसुळाट सुरूच असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिक पिशव्या आजही बाजारपेठेत खुलेआम वापरल्या जात असून प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे.

साहूरमधील किराणा दुकाने, भाजी मार्केट, फळविक्रेते आणि इतर छोट्या-मोठ्या व्यावसायिकांकडे सर्रास प्लास्टिक पिशव्या दिल्या जात आहेत. ग्राहकही कोणत्याही भीतीशिवाय त्या वापरताना दिसत आहेत. शासनाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर आढळल्यास ५ हजार रुपयांपर्यंत दंड आणि वारंवार उल्लंघन केल्यास २५ हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

मात्र, हा कायदा फक्त कागदावरच असल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात प्लास्टिकचा वापर प्रचंड वाढतो. कचराकुंड्यांमध्ये आणि कचरा संकलन गाड्यांमध्ये बंदी



असलेल्या प्लास्टिकचा ढिग साचलेला दिसतो. शहरांप्रमाणेच आता ग्रामीण भागातही प्लास्टिकचा विळखा घट्ट होत असून पर्यावरणासाठी हा गंभीर धोका ठरत आहे.

एकदाच वापरले जाणारे प्लास्टिक शेकडो वर्षे न विघटित होणारे असल्याने ते जमिनीची सुपीकता नष्ट करते, जनावरांच्या पोटात जाऊन त्यांचा जीव घेत आहे, तर दुसरीकडे अनेक ठिकाणी प्लास्टिक जाळण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे निर्माण होणारा विषारी धूर नागरिकांच्या आरोग्यावर घाला घालत आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, इतक्या गंभीर परिस्थितीतही स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायत आणि संबंधित यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. गावात उघडपणे प्लास्टिक वापर होत असतानाही कोणतीही दंडात्मक कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कायदे फक्त दाखवण्यासाठी आहेत का असा प्रश्न आता विचारला जात आहे.

पर्यावरणप्रेमी, सामाजिक संघटना आणि सुज्ञ नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत तातडीने धडक मोहीम राबवावी, नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि गाव-शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा 'स्वच्छ भारत'चे स्वप्न हे फक्त घोषणा आणि पोस्टरपुरतेच मर्यादित राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# हिंगणघाट येथे रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्ह

**वर्धा जनमाध्यम**
अल्पमुदत प्रशिक्षण आयटीआय स्टेप अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या इच्छुक बेरोजगार उमेदवारांकरीता तसेच जिल्ह्यातील १२ वी, आयटीआय, पदवीधर व डिप्लोमाधारक उमेदवारांकरीता हिंगणघाट येथे पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचा उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

हिंगणघाट येथे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता पंडित दिनदयाल

उपाध्याय रोजगार मेळावा व प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात नामांकीत कंपन्याच्यावतीने प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. इच्छुकांनी मुळ शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्रांसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी कळविले आहे.

# सार्वजनिक व खाजगी आस्थापनांनी त्रैमासिक विवरणपत्र सादर करावे

**वर्धा जनमाध्यम :**
जिल्ह्यातील सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचारी असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील आस्थापनांनी ऑनलाईन त्रैमासिक विवरणपत्र ईआर १ सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांना त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची पुरुष, स्त्री व एकुण अशी सांख्यिकी माहिती प्रत्येक तिमाहीस कायद्याच्या तरतुदीनुसार विहित नमुना ईआर १ नियमितपणे महास्वयंम या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे. माहे जानेवारी ते मार्च अखेर संपणाऱ्या तिमाहीची माहिती ३० एप्रिल पर्यंत सादर करावी.

सदर त्रैमासिक विवरणपत्र कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरुन? डमिनचा वापर करुन ऑनलाईन सादर करावे. प्रत्येक तीन महिन्यांनंतर ३० दिवसांच्या आत ईआर १ ऑनलाईन सादर करणे कायद्यान्वये बंधनकारक आहे. तसे न करणाऱ्या उद्योजक व आस्थापनांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

प्रत्येक नोंदणीकृत आस्थापनांनी आपला नोंदणी तपशिल अद्यावत करावा. आस्थापना प्रोफाईलमध्ये पॅन क्रमांक, टॅन क्रमांक, ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक भरुन तसेच कंपनीचे आस्थापनाच्या नावात बदल केला असल्यास तसे अपडेट करावे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या ०७१५२-२४२७५६ या क्रमांकावर किंवा wardharojgar@gmail.com या ईमलवर संपर्क साधावा, असे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

# खरीपाची धडपड सुरूच!

## सेलूत ४६ हजार हेक्टरवर पेरणी; ८०७० क्विंटल बियाण्यांची गरज

**सेलू जनमाध्यम**
निसर्गाच्या लहरीपणाने हैराण झालेल्या शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा आशेची बीजे पेरण्याची तयारी सुरू केली आहे. सततच्या नापिकीच्या छायेतही 'जिद्दीचा शेतकरी' खरिपासाठी सज्ज झाला असून, कृषी विभागानेही नियोजनाची चाके वेगाने फिरवायला सुरुवात केली आहे.

तालुक्यात यंदा तब्बल ४६ हजार ३६८ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. यात कापूस (२२,७५० हेक्टर) आणि सोयाबीन (१६,६८८ हेक्टर) ही प्रमुख पिके राहणार असल्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. याशिवाय तूर, मका, ज्वारी, बाजरी, मूग, उडीद, तिळ, सूर्यफूल आणि भुईमूग या पिकांचाही समावेश आहे.

मागील हंगामात कपाशीने निराशा दिल्याने अनेक शेतकऱ्यांनी गव्हाकडे वळण्याचा पर्याय निवडला होता. गव्हाने काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरी तुरीच्या भावघटीमुळे अपेक्षित उत्पन्न हाती आले नाही. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांचे पेरणीचे गणित अध्कि सावधपणे आखले जात आहे.

दरम्यान, या संपूर्ण पेरणीसाठी ८०७० क्विंटल बियाण्यांची मागणी निश्चित करण्यात आली आहे. यात सोयाबीनसाठी सर्वाधिक ७२५९ क्विंटल, तर कापसासाठी ४५५ क्विंटल बियाण्यांची गरज भासणार आहे. तूर पिकासाठीही २६२ क्विंटल बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे. खतांचे वाढते दर आणि आर्थिक अडचणींचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांचा कल यंदा कमी खर्चाच्या पिकांकडे झुकताना दिसत आहे. त्यामुळे तुरीच्या पेरणीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नापिकीच्या राखेतून पुन्हा उभारी घेण्याचा प्रयत्न करणारा शेतकरी आता नव्या हंगामाकडून आशेची किरणे शोधत आहे. खरीपाच्या या तयारीतून 'उद्याचा दिवस चांगला जाईल' हीच त्याची एकमेव खात्री ठरत आहे.

# गव्हाला चांगला उतारा; पण भावघसरणीने शेतकरी हवालदिल

**समुद्रपूर जनमाध्यम**
समुद्रपूर तालुक्यात यंदा रब्बी हंगामात गव्हाला चांगला उतारा आला असला, तरी बाजारपेठेतील घसरलेल्या भावांनी शेतकऱ्यांच्या आशांवर अक्षरशः पाणी फेरले आहे. शेतमाल बाजारात येण्याआधीच भाव कोसळत असल्याने शेतकऱ्यांना आपला माल मातीमोल दरात विकण्याची वेळ आली असून, त्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे.

मार्च महिन्यापासून गव्हाची काढणी सुरू होताच बाजारातील दर अचानक घसरले. काही दिवसांपूर्वी ३००० ते ३२०० रुपये क्विंटल दराने विकला जाणारा गहू सध्या केवळ १८०० ते २२?०० रुपयांपर्यंत खाली आला आहे. व्यापाऱ्यांकडून कमी दरात खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

मागील अनेक वर्षांपासून बदलते हवामान, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि किडींचा प्रादुर्भाव यामुळे शेतकरी आधीच संकटात आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही कष्टाने उभे केलेले पीक बाजारात येताच दर कोसळणे, ही शेतकऱ्यांसाठी दुहेरी मार ठरत आहे.

एकरी गव्हाच्या पिकासाठी बियाणे, खत, नांगरणी, फवारणी आणि काढणी यावर सुमारे १८ हजारांहून अधिक खर्च होतो. चांगला उतारा मिळाल्यास २५ ते ३० हजारांचे उत्पन्न अपेक्षित असते. मात्र सध्याच्या दरामुळे हे उत्पन्न ८ ते १० हजारांवर येऊन ठेपले आहे. चार महिन्यांच्या कष्टाचे महिन्याला अवघे तीन हजार रुपये मिळत असल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे. यात भर म्हणजे व्यापाऱ्यांकडून एका पोत्यामागे २ ते ३ किलो जादा घेऊन क्विंटलमागे ८० ते १०० रुपयांची लूट होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. किमान ३००० रुपये भाव मिळेल, या अपेक्षेने शेती केलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून, 'उतारा चांगला; पण भावानेच घात केला' अशी हतबल प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. आता या परिस्थितीकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन हमीभाव आणि बाजार नियंत्रणाची ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# जागेच्या वादातून महिलेस मारहाण

**वर्धा :** शहरातील महाकाळ परिसरात जागेच्या वादातून एका वृद्ध महिलेला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. शकुंतला नेहारे (६५) या घरी असताना शेजारी व नातेवाईक असलेल्या नारायण नेहारे यांच्याशी वाद झाला. मुलाला शिवीगाळ केल्याबद्दल जाब विचारल्याने हा वाद चिघळला. यावेळी नारायणने जागेतील हिस्सा मागितल्याने वाद अधिकच तीव्र झाला. 'ग्रामपंचायतीत जाऊन नोंद तपासा,' असे शकुंतलांनी सांगितल्यावर संतापलेल्या नारायणने लोखंडी अडणीने हल्ला केला. या घटनेत त्या जखमी झाल्या. परिसरात या प्रकारामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# घरगुती वादातून विवाहितेस मारहाण

**समुद्रपूर :** तालुक्यातील निवटे कॉलनी, जाम येथे घरगुती वादातून विवाहितेला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. रेवती पवार (३०) यांनी पती सूरजसिंग याला तिच्या आईला त्रास देण्याबाबत जाब विचारला.

या कारणावरून पती व सासऱ्याने शिवीगाळ करत तिला मारहाण केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. कौटुंबिक वाद हिंसक वळण घेत असल्याच्या घटना वाढत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# ग्रामीण महिलांच्या नशिबी पुन्हा चुलीचा धूर

## महागड्या सिलेंडरमुळे उज्वला योजनेचा फायदा अडगळीत; साहूर परिसरातील विदारक वास्तव

**साहूर जनमाध्यम :**
केंद्र शासनाच्या उज्वला योजनेमुळे एकेकाळी ग्रामीण महिलांच्या आयुष्यात स्वच्छ इंधनाचा नवा प्रकाश पडला होता. धुरकट चुलींपासून मुक्ती मिळाल्याचा दिलासा होता. मात्र आज वाढत्या महागाईच्या झळांनी तो प्रकाश पुन्हा धूसर झाला आहे. पाचशे रुपयांत मिळणारा गॅस सिलेंडर आता अकराशे रुपयांवर पोहोचल्याने सर्वसामान्य कुटुंबांचे कंबरडे मोडले असून साहूर व परिसरात अनेक घरांतील गॅस कनेक्शन अक्षरशः अडगळीत पडले



आहे.

कोरोना महामारीनंतर महागाईने अक्षरशः रौद्ररूप धारण केले आहे. हातावर पोट असलेल्या ग्रामीण कुटुंबांसाठी रोजचा उदरनिर्वाहच कठीण झाला आहे. अशा परिस्थितीत महागड्या गॅस सिलेंडरचा खर्च परवडणे दूरच, पण त्याचा विचारसुद्धा अशक्य होत चालला आहे. परिणामी, ज्या चुली बंद पडल्या होत्या त्या पुन्हा पेटू लागल्या असून ग्रामीण महिलांच्या आयुष्यात धुराचे सावट परत आले आहे.

साहूर परिसरातील अनेक कुटुंबे केवळ मोलमजुरीवर अवलंबून आहेत. काम असेल तर चूल पेटते अशी स्थिती निर्माण झाली आहे. वाढत्या दरांमुळे गृहिणींचे संपूर्ण बजेट कोलमडले असून, सिलेंडर घ्यायचा की घरखर्च भागवायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्या समोर उभा ठाकला आहे. किराणा, इंधन व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीने हा ताण आणखी वाढला आहे.

उज्वला योजनेअंतर्गत २०१८ मध्ये साहूर व परिसरातील अनेक गरीब कुटुंबांना गॅस कनेक्शन मिळाले होते. त्यावेळी स्वयंपाकघरात आलेली ही क्रांती आता माघारी फिरताना दिसते आहे. जंगलातून लाकूड गोळा करण्यासाठी महिलांची पुन्हा धाव सुरू झाली आहे. आधुनिक युगात मिळालेलं हे सोयीचं साधन आता त्यांच्या आवाक्याबाहेर गेल्याने जगावं की मरावं असा प्रश्न त्यांच्या समोर उभा ठाकला आहे.

दरवाढीच्या या जाचक ओझ्याखाली ग्रामीण संसाराचा गाडा कसाबसा पुढे सरकत असून, महिलांच्या आयुष्यातील हा धुरकट वास्तव पुन्हा एकदा व्यवस्थेच्या अपयशावर प्रश्नचिन्हे उभं करत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १३१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

प्रो.नं.१००/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०६.०४.२०२६

वि.सहदिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./११५/२०२६ दिनांक २०.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. सतीश सुरेश सालवे, वय ४१ वर्षे, धंदा - मजुरी
२. प्रभावती सुरेशराव सालवे, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
दोन्ही रा.गणेशपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

गैरअर्जदार-
१. मनोहर गणेशराव उर्फ सिल्व्हेस्टर सालवे, वय ७३ वर्षे, धंदा - मजुरी
२. संदीप सुरेशराव सालवे, वय ४४ वर्षे, धंदा - नोकरी
३. सुषमा सुरेशराव सालवे, वय ३६ वर्षे, धंदा - घरकाम
अ.नं.१ ते ३ रा.गणेशपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. ज्योत्स्ना अमर इंगळे, वय ३७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.१०३, डिसेन्ट स्वागतम अपार्टमेंट, शेगांव-रहाटगांव रोड, देशमुख लॉनजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **देवकाबाई सिल्व्हेस्टर सालवे (साळवे)** हे दिनांक **३०.१०.२००८** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **देवकाबाई सिल्व्हेस्टर सालवे (साळवे)** यांचे नांवे मौजा गणेशपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील ग्रा.पं.गणेशपूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे ग्रा.पं.मालमत्ता नं.६१९ क्षेत्र ५९४ चौ.फुट ही जागा व त्यावर जुनाट पडके कच्चे घर ही मिळकत आहे.

आज दि.**०६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **नाजीम हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **२१.०७.१९८८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६०५/२०२६
**श्री.रामशंकर अधिक तीन -विरुध्द- निरंक**
पुढील ता. २८.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Ramshankar Sitaramji Gupta, Age 80 Yrs. Occu.: Nil
2. Ranjit Ramshankar Gupta, Age 51 Yrs. Occu.:
3. Pawan Ramshankar Gupta, Age 48 Yrs. Occu.:
All R/o Rama Bhavan, Sabnis Plot, Amravati, Tq. Dist. Amravati
4. Rita Sanjay Gupta, Age 53 Yrs. Occu.: Household
R/o N.K.155, Upasana Home, Nishikanan, Teghoriya, Rajarhat, Gopalpur (M) North-24, Parganas Hatiwada, West Bengal

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत लिलाबाई रामशंकर गुप्ता** हे दिनांक 11.04.2015 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रामशंकर अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रामशंकर अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०६.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४६४/२०२६
**श्रीमती ज्योती अधिक दोन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२१.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Jyoti Rajendra Malve, Age 47 Yrs. Occu.: Household
2. Rishika Rajendra Malve, Age 25 Yrs. Occu.: Education
3. Samarth Rajendra Malve, Age 19 Yrs. Occu.: Education
All R/o Flat No.101, Varad Vinayak Apartment, Ganediwal Layout Camp, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेंद्र रामकृष्ण मालवे** हे दिनांक 23.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **ज्योती अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्योती अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **निवृत्ती बळीराम काळे,** रा.नवी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती यांनी **श्रीनिवास उर्फ बाल्या चंद्रशेखर देशपांडे,** रा.त्रिमुर्ती चौक, बावधन, पुणे यांचेकडून मौजे-पाळा, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.१२/१ भोगवटदार वर्ग-१ मधील ० हे.५५ आर, आकार रुपये २.४० पैसे सालीम शेतजमीन काळी व कोरडवाहू असून ज्याची चतुःसिमा--

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गयाप्रसाद यांचे शेत |
| पश्चिमेस | - | बडनेरा-पाळा पांदन रस्ता |
| उत्तरेस | - | दुर्गापूर पांदन रस्ता |
| दक्षिणेस | - | टेकाडे यांचे शेत |

येणेप्रमाणे वरील शेतजमीन विकत घेण्याचा सौदा केला असून लवकरच खरेदी करणार आहेत. सबब या शेतजमिनीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, प्रलंबित वाद व ईतर कोणताही वारस हक्क वगैरे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मूळ कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. त्यानंतर कोणाचेही उजर चालणार नाही व माझे पक्षकार खरेदी घेण्यास मोकळे राहतील, याची नोंद घ्यावी.

करीता सदरची जाहीर सूचना

**दिनांक ०७.०४.२०२६**
**अमरावती**

(**ॲड.उमाकांत र.रामेकर**)
रा.श्याम नगर लाईन नं.३, अमरावती
ता.जि.अमरावती
मो.९९२२४७६०९१

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २१०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **राजीक हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **२४.१०.१९८१** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जाहीद हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **३१.०७.१९८३** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १८१/२०२६ ने.ता.१३.०४.२०२६

**अर्जदार -**
१. मकसूद खॉ हसते खॉ, वय ७१ वर्षे, धंदा -
२. रेहाना खाटून मकसूद खॉ, वय ६९ वर्षे, धंदा -
३. फराना परविन इरशाद खॉ, वय ३४ वर्षे, धंदा -
४. अनविय सदफ इरशाद खॉ, वय ०९ वर्षे, धंदा -
५. जुनेर खॉ इरशाद खॉ, वय ०६ वर्षे, धंदा -
६. उमर खॉ इरशाद खॉ, वय ०२ वर्षे, धंदा -
सर्व रा.पेठपुरा, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ हे मयतांचे वडील असून अर्जदार नं.२ ही मयताची आई आहे. अर्जदार नं.३ ही मयताची पत्नी असून अर्जदार नं.४ ते ६ ही मयतांची मुले असून ते एकमेकांचे सख्खे बहिण भाऊ आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ६ हे मयत **इरशाद खॉ मकसुद खॉ** यांचे वारस आहेत. मयत **इरशाद खॉ मकसुद खा** यांचे दिनांक **२५.०३.२०२३** रोजी मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे निधन झाले. मयत **इरशाद खॉ मकसुद खा** यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक /०३/२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६२२/२०२६
**श्रीमती उषा अधिक तीन -विरुध्द- निरंक**
पुढील ता. ०७.०५.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Usha Madhukarrao Chincholkar, Age 78 Yrs. Occu.: Nil
R/o Ashiyad Colony, Shegaon Road, Amravati. Tq. Dist. Amravati
2. Nitin Madhukarrao Chincholkar, Age 58 Yrs. Occu.: Service Retired
R/o B-701, Neelkanth Park Plot No.18, Near CIDCO Garden Sec.6, Khanda Colony, Panvel Raigarh
3. Nilesh Madhukarrao Chincholkar, Age 57 Yrs. Occu.:
R/o Ashiyad Colony, Shegaon Road, Amravati. Tq. Dist. Amravati
4. Mangesh Madhukar Chincholkar, Age 55 Yrs. Occu.: Service
R/o B-102, Sraddha Gardenia Rahath Bagh, Old Madras Road, Nagavarapalya, Banglore North C.V.Raman Nagar, Karnataka

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मधुकर मोतीरामजी चिंचोळकर** हे दिनांक 15.09.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **उषा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उषा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६४९/२०२६
**आशा अधिक एक -विरुध्द- निरंक**
पुढील ता. २८.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Asha Balkrushna Kale, Age about 64 Yrs. Occu.: Household
2. Swapnil Balkrushna Kale, Age about 34 Yrs. Occu.: Household
Both R/o Rajapeth, Zenda Chowk, Beneath Railway Gate, Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Balkrushna Damodharrao Kale हे दिनांक 28.10.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Asha Balkrushna Kale + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Asha Balkrushna Kale + 1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **फहेमीदा परविन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.०७.१९७८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **मुजीब हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **०४.०१.१९८६** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३१/२०२६
**प्रविण -विरुध्द- निरंक**
पुढील ता. ०६.०५.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Mr.Pravin Gajanan Rudrakar, Age 33 Yrs. Occu.: Pvt.Service
R/o Ravi Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Mr.Akash Gajananrao Rudrakar, Age 31 Yrs. Occu.: Pvt.Service
R/o Ravi Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत उषा कृष्णराव बोराडकर उर्फ उषा गजानन रुद्रकार** हे दिनांक 28.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रविण व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रविण व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६६४/२०२६
**पूजा व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता. १२.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Pooja Dipakrao Shirbhate, Age 44 Yrs. Occu.: Household
2. Yash Dipakrao Shirbhate, Age 26 Yrs. Occu.: Labour
R/o A-21, Near Mahatma Jyotiba Fule College, Parvati Nagar-2, Akoli Sai Nagar Road, Amravati. Tq. Dist. Amravati
3. Vardhan Dipakrao Shirbhate, Age 22 Yrs. Occu.: Education
R/o Changani Nagar, Amravati.
4. Vimla Shankarrao Shirbhate, Age 77 Yrs. Occu.: NIl
No.1 & 4 R/o Near Amar Soda Factory, Itwara Bazar, Japar Jeen Plot, Amravati. Tq Dist. Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत दिपकराव शंकरराव शिरभाते** हे दिनांक 18.03.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पूजा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पूजा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५६३/२०२६
**श्रीमती हिराबाई -विरुध्द- निरंक**
पुढील ता. २३.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Hirabai Ramkrushna Wankhade
Age about 65 Yrs. Occu.: Household
R/o Near Chhangani Nagar, Amba Vihar, Amravati. Tq.Dist.Amravati

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अतुल रामकृष्णराव वानखडे** हे दिनांक 13.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **हिराबाई विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हिराबाई विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **साजीद हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **२०.०२.१९९०** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **ईमरान हुसेन तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.०६.१९९२** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १०.०१.२०२६

आज दि. १०.०१.२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **परविन अंजुम तय्यब हुसेन** अर्जात नमूद जन्म दिनांक **१२.०१.१९७९** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही आमच्या स्वतः चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.२६/१२/२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **ब्राम्हणवाडा थडी**, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **ब्राम्हणवाडा थडी**, यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अब्दुल सलाम अब्दुल सत्तार** यांनी त्यांच्या मुलीच्या नामे **नेहा नाज अब्दुल सलाम जन्म** दाखल्या बाबत अर्जात नमूद जन्म दिनांक **३०.१२.२००५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **ब्राम्हणवाडा थडी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) सौ.पद्माताईसं.मेसकर (सरपंच) | सौ.पद्माताईसं.मेसकर (सरपंच) |
| २) श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) | श्री.अतुल सा.दारोकर (उपसरपंच) |
| ३) इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) | इजाजोद्दीन मोइनामदार (त.मु.अ.) |
| ४) क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) | क्रांतीकुमार रा.काळे (पो.पा.) |
| ५) श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.पं.) | श्री.नंदकिशोर भि.वासनकर (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत ब्राम्हणवाडा थडी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५३३/२०२६
**श्री.अरविंद अधिक तीन -विरुध्द- निरंक**
पुढील ता. २८.०४.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Arvind Prabhakar Deshmukh, Age 71 Yrs. Occu.: Retired
R/o Nilay Paradise-3, Flat No.A/103, Near D-Mart, Sector 29, Ravet Pradhikaran, Pune
2. Pushpabai Vitthalrao Deshmukh, Age 69 Yrs. Occu.: Household
R/o Karajgaon, Amravati, Tq. Dist. Amravati.
3. Rekha Prabhakarrao Deshmukh, Age 67 Yrs. Occu.: Household
R/o Prashant Colony, Akot, Tq.Akot, Dist.Akola
4. Shrikant Prabhakarrao Deshmukh, Age 63 Yrs. Occu.: Retired
R/o Old Byepass, Kamal Colony, Near Sakha Mangalam, Yashoda Nagar Amravati. Tq. Dist. Amravati.

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सिंधु प्रभाकर देशमुख** हे दिनांक 02.08.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अरविंद अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अरविंद अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### भारतीय महाविद्यालयात जल तपासणी कार्यशाळा

**मोर्शी-**भारतीय विद्या मंदिर अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय,मोर्शी येथे 'जल गुणवत्ता तपासणी कार्यशाळा' उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय प्राचार्य डॉ. संतोष आगरकर यांनी भूषविले.कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून निलेश गजभिये यांची उपस्थिती लाभली. तसेच कार्यक्रमास साकेत चिंचमलातपुरे,विनायक देशपांडे, नीता कऱ्हे, जगदीश पत्रे व सुरजकुमार खोब्रागडे, संध्या पदनाम, उघडे, टेटू , वानखडे, वांदे, भाग्यश्री भिसे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यशाळेत जल गुणवत्ता तपासणीसंदर्भातील विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. पाण्याची शुद्धता, तपासणीच्या पद्धती, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पाण्याचा टीडीएस (TDS) तपासून पाण्यातील घटकांची माहिती देण्यात आली व पाण्यातील संभाव्य विषारी घटकांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.या कार्यक्रमास कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुयोग्य पद्धतीने पार पडल.



### ५१ तेजस्विनींचा कार्य गौरव सत्कार

**अमरावती-** मोशी शहरात नुकत्याच स्थापन झालेल्या लायन्स क्लब मोर्शी झेनिथल नलदमयंतीला डिस्टिक गव्हर्नर, एमजीएफ, भरत भलगट यांची अधिकृत भेट कार्यक्रम झाला. प्रसंगी शुभहस्ते ५१ तेजस्विनींचा कार्य गौरव सत्कार सन्मान करण्यात आला यामध्ये परिसरातील विविध क्षेत्रातील उद्योग,शिक्षण, समाजकारण, बचत गट ,अंगणवाडी ,बालवाडी, सांस्कृतिक ,विविध क्षेत्रातील महिलांचा कार्य गौरव करण्यात आला प्रसंगी प्रास्ताविक तथा अतिथींचा परिचय क्लब डमिनिस्ट्रेटर डॉ. सुधर्म हांडे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रांजली फरकाडे, डॉ.सारिका राऊत यांनी केले. डॉ. दीपाली देशमुख क्लब अध्यक्षांनी भाषणामध्ये महिलांनी सर्वच, क्षेत्रांमध्ये प्रगती केली लक्षणीय प्रगती केलेली आहे याबद्दल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला मोर्शी शहराच्या नगराध्यक्ष प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने यांनी प्रमुख अतिथीचे स्थान भूषविले. कार्यक्रमासाठी प्रथम प्रांतपाल लायन विलास साखरे झेडसी डॉ. राजेश चंदनपाट, आरसी राजा किंग राणी तसेच कॉर्डिनेटर प्रवीण भल्ला रंजन गुप्ता इत्यादी मान्यवर उपस्थिती होते. सदर कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत श्री आर आर लाहोटी महाविद्यालय येथील सर्व प्रशासकीय कर्मचारी वृंद तथा समंत्रकांची उपस्थिती लाभली त्यामध्ये क्लब सचिव पूजा बागड, क्लब कोषाध्यक्ष राणी महल्ले, प्रणिता शंकरपाळे, रवीना पवार, पुनम पवार, वैष्णवी बंड, प्रतीक्षा खंडारे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रभात एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष वि. दा. पवार, विजय हरणे व इतर कार्यकर्त्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या मधुर वाणीने प्रा.जानकी आहाके यांनी केले.

### दिपाली रनालेकर यांचे निधन



**कुऱ्हा-**येथील अंजलीका इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष हितेंद्र रनालेकर यांच्या पत्नी दिपाली हितेंद्र रनालेकर वयाच्या ४२ व्या वर्षी (नाशिक) येथे आजाराने ६ एप्रिल रोजी निधन झाले आहे. गेल्या काही दिवसापासून त्यांच्यावर नाशिक येथील अशोका हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. दि. ७ एप्रिल रोजी कुऱ्हा येथे अंत्यसंस्कार पार पडले. त्यांच्या पच्छात पती, एक मुलगा, एक मुलगी असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# तिवसा शहरातून धावतात नियमबाह्य कन्हान रेतीची वाहने

## पोलिसांनी ट्रक थांबविला व सोडला अन दिले 'सुपर एन्ट्री'चे स्पष्टीकरण

**तिवसा/वार्ताहर**

अलीकडच्या काही दिवसांपासून एक-दोन नाही तर चक्क १२ ते १५ ब्रास रेती घेऊन अनेक वाहने तिवसा शहरातून अमरावतीच्या दिशेने पास होत असूनही त्यावर कुठल्याही प्रशासनाकडून कारवाई तर सोडाच साधी चौकशी सुद्धा केल्या जात नसल्याचे चित्र हायवेवर दिसून येत आहे.मग छोट्या-मोठ्या वाहनांसाठीच पोलिस,आरटीओ चे नियम बनले आहेत का? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेकडून उपस्थित केल्या जात आहे.

मोठमोठ्या डंपर मध्ये, हायवा सारख्या वाहनात नियमापेक्षा जास्त कन्हान रेती भरून अमरावती च्या दिशेने तिवसा शहरातून वाहतूक होत आहे.रात्रीच्या अंधारातून तर पहाटेच्या उजेडातही ही वाहतूक बिनधास्तपणे सुरू असून मात्र कोणत्याही ठिकाणी त्यांना न अडवता रस्ता मोकळा करून देण्यात आला आहे. मोठमोठ्या वाहनात क्षमतेपेक्षा अधिक रेती भरून वाहतूक होत असतांना पोलीस प्रशासन,महसूल प्रशासन,आरटीओ प्रशासन या तिन्ही विभागाकडून या वाहतुकीतील वाहनांमधील रेतीच्या वाहनांची तपासणी का केल्या जात नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे. कितीतरी किलोमीटर अंतर कापून ही रेतीची वाहतूक राजरोसपणे सुरू आहे. जनता खुल्या डोळ्यांनी हा प्रकार बघत आहे.पण संबंधित प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधून ठेवली की काय? असे याबाबत न होणाऱ्या कारवाया वरून दिसून येत आहे.नियमबाह्य या वाहतुकीला रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन पुढाकार घेऊन कारवाईची मोहीम राबविणार का? याकडे सर्वत्र जनतेचे लक्ष लागले आहे.



### मग नियम काय छोट्या वाहनांसाठीच?

### पोलिसांनी ट्रक थांबविला व सोडला

आज पहाटे हायवेवरील गुरुकुंज मोझरी नजीक एका पोलीस अधिकाऱ्याने अमरावतीकडे जाणारा क्षमतेपेक्षा अधिक रेतीने भरलेला ट्रक थांबविला,रॉयल्टी बघितली व लगेच सोडून दिला असता आमच्या प्रतिनिधीने त्यांना विचारले असता त्यांनी हा ट्रक सुपर एन्ट्री त आहे,१२ ब्रास ची रॉयल्टी आहे,त्यामुळे आम्हाला हा चौकशीकरिता नेता येत नसल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले.त्यामुळे आता प्रशासनानेच ही 'सुपर एन्ट्री' म्हणजे नेमके काय?याचा अर्थ जनतेसमोर मांडणे गरजेचे झाले आहे.

## श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयमध्ये
## ग्रीष्मकालीन क्रीडा शिबिराचे आयोजन; विविध खेळांचा समावेश

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये भव्य ग्रीष्मकालीन क्रीडा शिबिराचे आयोजन १० एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत असून शिबिराची वेळ सायंकाळी ६ ते ८ या दरम्यानची राहणार आहे या शिबिरामध्ये जिम्नॅस्टिक, ज्यूडो, क्रिकेट, बॅडमिंटन, ॲथलेटिक्स, कबड्डी, खो-खो, स्विमिंग, आर्चरी, सॉफ्टबॉल, बास्केटबॉल सोबत एरोबिक्स, योगा तसेच विशेष मनोरंजनात्मक उपक्रम झुंबा अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला असून विद्यार्थ्यांना एकाच व्यासपीठावर विविध खेळांचे प्रशिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

सदर शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या परिसरामध्ये करण्यात आले असून प्रत्येक खेळासाठी स्वतंत्र अनुभवी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना मूलभूत कौशल्यांपासून ते प्रगत तंत्रज्ञानापर्यंतचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच खेळातील नियम, शारीरिक क्षमता विकास, तंदुरुस्ती, आहार नियोजन आणि मानसिक सक्षमता यांवरही विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे.या शिबिराचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यासाठी सक्षम खेळाडू घडवणे हा आहे.




याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करण्यासाठी हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

त्यानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गावंडे यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. 'आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक प्रगतीपुरती मर्यादा न ठेवता क्रीडाक्षेत्रातही प्राविण्य मिळवणे गरजेचे आहे. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगीण विकसित होते,' असे मत त्यांनी व्यक्त केले.शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर महाविद्यालयमधील क्रीडा शिबिराचे समन्वयक डॉ. सचिन महल्ले मो.९३२५४३०४७६ ,डॉ. अमोल दातार ९६३७८ ४०७५२, प्रा.सौरभ काळमेघ ८८०५० ९४६११,संपर्क साधून आपली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच या शिबिराला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात येत आहे.

## गीत रामायणाने केले मंत्रमुग्ध



**अमरावती -** स्थानिक जोगळेकर प्लॉट हिंदवी क्रीडा मंडळाचे मैदान, रुक्मिणी नगर. येथे गीत रामायणाचे आयोजन करण्यात आले, डॉ. श्रीकांत बा. देशमुख, चंद्रकांत देशमुख (रामेकर) परिवार आयोजित गीतरामायणाचे हे २४ वे वर्षे होते. सचिन देव महाराज यांच्या उपस्थितीमध्ये सुश्राव्य गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले, विशेष म्हणजे या वर्षी सूरमणी कमलताई भोंडे यांनी देखील आपली सेवा राम चरणी अर्पण केली, त्यामुळे श्रोत्यांना एक नवीन पर्वणिच मिळाली, प्रा.डॉ. गजानन केतकर प्रा.डॉ. वनिता भोपत (केतकर) प्रा. डॉ. सोनाली शिलेदार , श्री निषाद फणसाळक, प्रा. मीना सहारे, ऋषिकेश सावळे, कार्तिक हिरुळकर, आयुष जैस्वाल, स्वरश्री केतकर. या सर्व कलावंतांनी आपल्या सुमधुर वाणीतून गीतरामायणतील विविध गीतांचे सादरीकरण केले. वाद्यवृंदांमध्ये प्रसाद पांडे, स्वप्निल सरदेशमुख चि. स्वरांग केतकर (तबला) रवी खंडारे (बासरी), पंकज देशमुख (सिंथेसायझर), गजेंद्र बानाईत( मायनर इन्स्टुमेंट). यांनी उत्कृष्ट साथ दिली. या संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन आपल्या विशेष शैलीतून श्री पवन नालट, प्राजक्ता राऊत, (मशीदकर) यांनी केले.

# बिल्डर, ब्रोकर व एजेंट यांनी संघटित होणे काळाची गरज-राजवीर सिंह

## अमरावतीत भारतीय रियल इस्टेट वेलफेयर युनियनचा संवाद मेळावा

**अमरावती/प्रतिनिधी**

रियल इस्टेट क्षेत्रात अनेक वाद दिसून येतात, बिल्डर, ब्रोकर आणि ग्राहक यांच्यातील वादाची संख्या दिवसेंदिवस वाढत असून यांच्या न्यायालयात शेकडो केसेस प्रलंबित आहेत, कारण आजही आपला बिल्डर, ब्रोकर, एजेंट संघटित नसून त्याला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यांनी यांनी सर्वांनी संघटित होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन भारतीय रियल इस्टेट सलाहकार /एजेंट वेलफेयर यूनियन चे संस्थापक अध्यक्ष राजवीर सिंह यांनी अमरावती येथे बिल्डर, ब्रोकर, एजेंट यांच्या संवाद मेळाव्यात केले प्रमुख अतिथी म्हणून यूनियन चे सल्लागार सदस्य अंकुश डाखोरे, राजमाता जिजाऊ बहुउद्धेशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय सरवटकर,चिंतामणी बिल्डर अमरावती चे संचालक नितीन पंधे, डॉक्टर असोसिएशन चे डॉ. अशोक उमप, माळी महासंघाचे अध्यक्ष संतोषराव कुऱ्हेकर उपस्थित होते.



हा संवाद मेळावा प्रथमच अमरावतीत आयोजित केल्याने या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हजेरी लावली होती. मेळाव्याला प्रामुख्याने विजयराव हरणे, संजय वाघुळे, गजानन जिरापुरे, वाय. एम. रामटेके, गजानन सावंत, ए. एम. वऱ्हेकर, प्रभाकरराव देशकर, अनिकेत सगणे, किशोर गुप्ता, रवींद्र शहाकार, गोपाल सोळंके, किरण अंबाडकर, सुनील बेलसरे,नरेंद्र अडोकार, निखिलभाऊ मांडवगडे, संजय वानखडे, रेवणनाथ पागरूत, अनिल पवार, विजय सावरकर प्रवीण डवाळ इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी यूनियन चे सदस्य अंकुश डाखोरे यांनीही संघटनेची भूमिका स्पष्ट केली. मेळाव्याचे संचालन श्रोत्यांची मने जिंकून आपल्या ओटीत टाकणारे अमरावती मधील अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेले आणि प्रभात एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष वि. दा. पवार यांनी तर आभारप्रदर्शन स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघांचे भातकुली तालुका अध्यक्ष सचिन सरोदे यांनी केले.

## अप्पर तहसील कार्यालयाची मागणी जोर

**आसेगाव पूर्णा-** अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे. परिसरातील सुमारे ६० ते ६५ गावांसाठी आसेगाव पूर्णा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. तसेच या भागातील प्रमुख बाजारपेठ म्हणूनही आसेगाव पूर्णा ओळखले जाते. सध्या विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना दूरवर जावे लागत असल्याने त्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागते. त्यामुळे आसेगाव पूर्णा येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास प्रशासनिक कामकाज सुलभ होऊन नागरिकांचा वेळ व खर्च वाचणार आहे.या संदर्भात भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे मेळघाट जिल्हा सरचिटणीस आशिष श्रीकृष्णराव मेहेत्रे यांनी आ.प्रवीणभाऊ तायडे यांना निवेदन देत ही मागणी केली आहे. तसेच राज्याचे पालकमंत्री व महसूल मंत्री आणि जिल्हाधिकारी, अमरावती यांनाही या निवेदनाची प्रत पाठविण्यात आली आहे.परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी आसेगाव पूर्णा येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याचा निर्णय प्रशासनाने लवकरात लवकर घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बोरगाव पेठ येथे रुग्णवाहिका लोकार्पणातून आरोग्य सेवेला बळ

**अचलपूर/वार्ताहर**

ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने बोरगाव पेठ येथे रुग्णवाहिका लोकार्पणाचा स्तुत्य उपक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंतराव वानखडे ,काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या शुभहस्ते ही रुग्णवाहिका जनतेच्या सेवेसाठी समर्पित करण्यात आली. या उपक्रमामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तातडीने उपचारासाठी दाखल करणे सुलभ होणार असून ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे.यावेळी अमरावती जिल्ह्याचे खासदार बळवंतराव वानखडे, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख आदी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत, ही सेवा अनेक गरजूंसाठी जीवनदायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य वासंतीताई मंगरोळे, सदानंद जयस्वाल, मधुकर हूड, भारत थोरात, पिंटू उमाळे, गिरधारी जयस्वाल, गजानन टापरे, तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे, राहुल गवई, राहुल गाठे, रतीराम उमाळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन राहुल गाठे यांनी केले तर प्रास्ताविक इंगळे यांनी सादर केले. आणि आभार प्रदर्शन राहुल गवई यांनी मानले.



ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर आरोग्य सेवा मिळावी यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असून, यामुळे अनेकांचे जीव वाचण्यास मदत होईल.

**-बबलू देशमुख,** जिल्हाध्यक्ष काँग्रेस पक्ष

जनतेच्या मूलभूत गरजांमध्ये आरोग्य सेवा अत्यंत महत्त्वाची आहे. बोरगाव पेठ येथे रुग्णवाहिका उपलब्ध करून देणे हे जनसेवेचे उत्तम उदाहरण असून, भविष्यातही अशा विधायक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

**बळवंत वानखडे,**
खासदार अमरावती जिल्हा

## जगदंब महाविद्यालय अचलपूर येथे पदवी वितरण समारंभ उत्साहात



**अचलपूर/वार्ताहर**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित व श्री जगदंब विणकर शिक्षण संस्था अचलपूर द्वारा संचालित जगदंब महाविद्यालय अचलपूर येथे आठवा पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. सोहळयाच्या अध्यक्षस्थानी श्री जगदंब विणकर शिक्षण संस्थेचेअध्यक्ष रमाकांतजी शेरकार तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नितीनजी कोळी, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व डॉ. राहुलजी नरवाडे, उपकुलसचिव नामांकन विभाग विद्यापीठ, अमरावती हे होते. कार्यकारिणी सदस्य, महाविद्यालय विकास समिती सदस्य, पदवीकांक्षी विद्यार्थी व त्यांचे पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने या सोहळ्याला उपस्थित होते.या सोहळ्याला अतिथी म्हणून लाभलेले डॉ. नितीनजी कोळी यांनी सर्व पदवीकांक्षी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या सोहळ्याला उपस्थित असलेले डॉ. राहुलजी नरवाडे यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी त्यांनी मार्गक्रमण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. सोहळ्याच्या अध्यक्षीय भाषणातून रमाकांतजी शेरकार यांनी विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या प्राविण्याबद्दल गौरवोद्गार काढले व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव कटिबद्ध असल्याचे सर्व उपस्थितांना सांगितले. या प्रसंगी उन्हाळी परीक्षा २०२५ मध्ये एम.ए. इतिहासाच्या एकूण सात विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. त्यापैकी एक सुवर्णपदक व इतर सहा विद्यार्थी दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर येऊन महाविद्यालयाचे नाव सोनेरी अक्षरात लिहिल्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले. या सोहळ्याचे प्रास्ताविक व अतिथी परिचय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश कोहळे यांनी केले.

## प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे
# विदर्भातील पहिले इंटरव्यू क्लिनिक होणार सुरु

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे विद्यार्थ्यांच्या करिअर घडविण्यासाठी एक अभिनव आणि दूरदृष्टीपूर्ण पाऊल उचलण्यात येत असून उद्या सकाळी १२ वाजता इंटरव्यू क्लिनिकचे भव्य उद्घाटन होणार आहे. विशेष म्हणजे, हा उपक्रम पहिलाच मानला जात असून शैक्षणिक क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण करणार आहे.

हा उपक्रम संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ.पूनम चौधरी,पंकज देशमुख, प्रा.विनय गोहाड, प्रा.गजानन काळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक गुणवत्ता पुरेशी नसून मुलाखत कौशल्ये, आत्मविश्वास आणि सादरीकरण कौशल्ये अत्यंत महत्त्वाची ठरतात. याच पार्श्वभूमीवर सुरू होत असलेले हे इंटरव्यू क्लिनिक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मुलाखतीचा सराव, मार्गदर्शन आणि योग्य दिशा देणार आहे.या क्लिनिकमध्ये विद्यार्थ्यांचे इन-कॅमेरा इंटरव्यू रेकॉर्डिंग करण्यात येणार असून त्यांच्या त्रुटींचे विश्लेषण करून योग्य मार्गदर्शन व सुधारणा केली जाणार आहे. तसेच या प्रक्रियेचे लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यात येणार असून इतर विद्यार्थ्यांनाही ते प्रत्यक्ष पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख डॉ. लोभस घडेकर असून त्यांच्या संकल्पनेतून हा प्रकल्प साकार होत आहे. डिपार्टमेंट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तर्फे हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून प्राचार्य डॉ. अजय ठाकरे व विभागप्रमुख डॉ. शशिकांत थोरात यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



### एमबीए विभागाचा अभिनव उपक्रम

## श्री संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी प्रगट दिन सोहळा

**चांदूर रेल्वे -** संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान आणि विदर्भातील एकमेव संजीवन समाधी असलेले श्री संत बेंडोजी महाराज यांचे देवस्थान आहे. चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील सुप्रसिध्द श्री.संत बेंडोजी महाराज यांचे संजीवन समाधी प्रगट दिन सोहळा दरवर्षी प्रमाणे श्री बेंडोजी महाराज संस्थान,घुईखेड व ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा ५ एप्रिल पासुन प्रारंभ झाला असुन १२ एप्रिल पर्यंत चालणार आहे.यामध्ये कीर्तन महोत्सव,अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत बेंडोजी महाराज भक्त महिमामृत ग्रंथ सामूहिक ग्रंथ पारायण आयोजित करण्यात आले आहे.१२ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२.३० वाजता



हभप मधुकर महाराज पाचपुते (वाळकी नेर) यांचे कीर्तन होणार असुन त्यानंतर दुपारी १ ते ५ पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा आणि या सोहळयाची शोभा वाढवावी असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर,राजाभाऊ चौधरी व इतर पदाधिकाऱ्यांसह ग्रामस्थांनी केले आहे.

# ४८ कोटींचा दंड 'कागदावर', जमिनीवर मात्र 'उद्योग' सुरूच?

## गाजीपूर प्रकरणात प्रशासन संशयाच्या कटघऱ्यात

## संगनमताच्या आरोपांनी वातावरण तापले

**समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील गाजीपूर येथील अवैध उत्खनन प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर आणि गूढ बनत चालले असून, महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच संशयाचे ढग दाटून आले आहेत. एका बाजूला तब्बल ४८ कोटी रुपयांचा दंड कागदावर आकारण्यात आला असल्याचा दावा केला जातो, तर दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात त्याच ठिकाणी स्टोन क्रशर, डांबर हॉट मिक्स प्लांटसारखे उद्योग बिनधास्त सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे 'दंड कागदावर आणि धंदा जमिनीवर' ही वस्तुस्थिती उघड होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेचा कळस गाठल्याची चर्चा रंगू लागली आहे.

गाजीपूर येथील गट क्रमांक २७ व ३८ मधील जमीन आदिवासी समाजाच्या मालकीची असून, अशा जमिनीवर कोणताही भाडेपट्टा देताना कठोर नियम व मर्यादा लागू होतात. मात्र या प्रकरणात कोणतीही ठोस शासकीय परवानगी न घेता दीर्घकालीन भाडेपट्टा देण्यात आल्याचे उघड झाले आहे. याच जमिनीवर कोट्यवधींचे औद्योगिक प्रकल्प उभारण्यात आले, मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले, आणि शासनाच्या नियमांना अक्षरशः हरताळ फासण्यात आला.

या संपूर्ण व्यवहारातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, उद्योग उभारणाऱ्या संबंधितांना जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून मुद्रांक शुल्कात लाखोंची सूट मिळाल्याची माहिती समोर आली आहे. म्हणजेच एका बाजूला नियमांचे उघड उल्लंघन, तर दुसऱ्या बाजूला शासकीय सवलतींचा लाभ असा दुहेरी गैरप्रकार या ठिकाणी घडल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद ठरत आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, या जमिनीवरील भाडेपट्ट्याची अधिकृत नोंद सातबाऱ्यावरच नसल्याचे समोर आले आहे. तरीही प्रत्यक्षात व्यवहार झाले, उद्योग सुरू झाले आणि उत्खननही झाले. यामुळे संपूर्ण प्रकरणच बोगस कागदपत्रे, बनावट व्यवहार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशय निर्माण करणारे असल्याचे बोलल्या जात आहे.

या प्रकरणात तलाठीपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत एक साखळी कार्यरत असल्याचा आरोप स्थानिक पातळीवर होत आहे. कारवाईच्या बाबतीत दुहेरी निकष लावले जात असल्याचेही चित्र आहे. काहींवर नोटीसांचा मारा, तर काहींना अभय अशा पद्धतीमुळे प्रशासनाची पारदर्शकता धुळीस मिळाल्याचे स्पष्ट होते. तर स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुरुवातीला घेतलेली ' आक्रमक ' भूमिका नंतर ' मवाळ ' झाल्याने, राजकीय दबावामुळेच प्रशासन हात आखडता घेत आहे का ? असा सवाल उपस्थित होत आहे.

गाजीपूर प्रकरण आता केवळ अवैध उत्खननापुरते मर्यादित राहिलेले नसून, प्रशासनाची डोळेझाक, निष्क्रियता आणि संभाव्य संगनमत यांचा मोठा नमुना म्हणून पुढे आले आहे. शासनाने तातडीने कठोर भूमिका घेत दोषींवर कारवाई केली नाही, तर ' नियम फक्त कागदावर आणि कारवाई फक्त फाईलमध्ये ' अशीच स्थिती कायम राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### या प्रश्नांची उत्तरे कोण देणार

- ४८ कोटींचा दंड वसूल का होत नाही ?
- दंड प्रलंबित असताना उद्योग तात्काळ बंद का केले जात नाहीत?
- संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का ?
- आदिवासी जमिनींचे संरक्षण नेमके कोण करणार?

### ४८ कोटींचा दंड; वसुली मात्र शून्य!

अवैध उत्खनन प्रकरणात सुरुवातीला सुमारे ६४ कोटी रुपयांचा दंड प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र पंचनामा, मोजणी आणि पुनर्मोजणीच्या प्रक्रियेनंतर तो कमी होत ४८ कोटींवर आला. तरीही आजपर्यंत या रकमेतील एक रुपयाही वसूल झालेला नाही. 'रिकव्हरी सर्टिफिकेट' प्रक्रिया राबविण्याऐवजी नोटीस, अपील आणि पुनर्नोटीसच्या चक्रात प्रकरण अडकवून ठेवण्यात येत असल्याचा आरोप होत असून, ही टाळाटाळ जाणीवपूर्वक असल्याची चर्चा आहे.

### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर?

गाजीपूर येथील खदानीची २४ ऑक्टोबर २०२१ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा आणि खाणीकर्म अधिकारी प्रणिता चापले यांनी पाहणी केली होती. त्यावेळी सुरू असलेले प्लांट तत्काळ बंद करण्याचे स्पष्ट लेखी आदेश देण्यात आले होते. मात्र त्या आदेशाची अंमलबजावणी झाली का, प्लांट पुन्हा कसे सुरू झाले, याबाबत प्रशासन मौन बाळगून आहे.

### 'माहिती नाही' म्हणणारे उपविभागीय अधिकारी

गाजीपूर येथील आदिवासी जमीन गैरआदिवासी संतोष चांडक यांनी भाडेपट्ट्यावर घेताना शासनाची परवानगी घेतली होती का, याबाबत विचारणा केल्यावर उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी 'माहिती नाही' असे उत्तर दिले. मात्र यापूर्वीच्या अधिकृत नोंदींमध्ये हा भाडेपट्टा शासनाच्या परवानगीविना झाल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. तरीही विद्यमान उपविभागीय अधिकारी या प्रकरणाकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवर अधिकच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# खाजगी रुग्णालयाचा भोंगळ कारभार पुन्हा उघड

## सिझेरियन प्रसूती नंतर महिनाभरातच महिलेचा मृत्यू

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात पुन्हा एका निष्पाप महिलेचा जिव खाजगी डॉक्टरांच्या कथित हलगर्जीपणामुळे गमवावा लागल्याची धक्कादायक घटना दि. ६ एप्रिलला सायंकाळी ६ वाजता रोजी समोर आली आहे. सुमारे एक महिन्यापूर्वी सिझेरियन शस्त्रक्रिया झालेल्या महिलेचा अचानक मृत्यू झाल्याने परिसरात संतापाची पुन्हा लाट उसळली आहे. या घटनेने पुन्हा एकदा खाजगी आरोग्य व्यवस्थेतील चेहरा उघड केला आहे.

माहितीनुसार, संबंधित महिलेला प्रसूतीदरम्यान दर्यापूर येथील नामांकित खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ☞(पान २ वर)

# बसस्थानकात वृद्ध महिला बसच्या चाकाखाली; दोन्ही पाय निकामी





**वर्धा:** देवळी बसस्थानकावर मंगळवार सकाळी सुमारे ११ वाजताच्या दरम्यान भयानक अपघात घडला. नागझरी येथील ७० वर्षीय शकुंतला चोखोबा पाटील बसच्या मागील चाकाखाली आल्या. या अपघातात त्यांचे दोन्ही पाय गंभीरपणे जखमी झाले आणि दोन्ही पाय निकामी होण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून यवतमाळकडे जाणारी बस (MH14MH2733) देवळी बसस्थानकात येत असताना शकुंतला पाटील बसच्या मागील बाजूस धडकून खाली पडल्या. नंतर बसच्या मागील ☞(पान २ वर)

# आंतरराज्यीय एमडी ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश

**-मुंबई ते राजस्थानपर्यंत पसरलेले रॅकेट उघडकीस, -अमरावती शहर गुन्हे शाखेची मोठी कारवाई;**



एकूण जप्त एम.डी. २ किलो ८० ग्रॅम एमडी अंदाजे किंमत: ३.१२ कोटी रूपयांचे जप्त करण्यता आले. तर प्रमुख आरोपींमध्ये अब्दुल फहीम अब्दुल रहीम,शेख अयान शेख रमजान,शेख नाझीम शेख रहीम, शेख रहीम उर्फ होन्गा,अजिम असद शेख (मुंबई), मांगीलाल सिंघावत (राजस्थान), विष्णू मोहनलाल गायरी (राजस्थान),राधेश्याम श्रीपाद दमामी (फरार) यांचा समावेश आहे.

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात अवैधरित्या मोठ्या प्रमाणात एम.डी. (मॅफेड्रॉन) या अंमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीवर अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी धडक कारवाई करत संपूर्ण ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य सूत्रधारांसह आरोपींना अटक करून कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी शहरात अंमली पदार्थाविरोधात 'झिरो टॉलरन्स पॉलिसी' राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिल्यानंतर गुन्हे शाखेने विशेष पथक तयार करून गुप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ही कारवाई केली. ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. ८ एप्रिल रोजी झालेल्या पहिल्या कारवाईत आरोपी अब्दुल फहीम अब्दुल रहीम उर्फ फहीम एफ.बी. (रा. आझाद नगर, अमरावती) व शेख अयान शेख रमजान (रा. द्वारका नगर, अमरावती) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून २ किलो ८० ग्रॅम एम.डी. (अंदाजे किंमत ३.११ कोटी) तसेच वाहन असा एकूण ३.१२ कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नागपुरी गेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपासात शेख नाझीम शेख ☞(पान २ वर)

# देहव्यापारावर पोलिसांची धाड


## महिलांची सुटका, आरोपी ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील यशोदा नगर परिसरात सुरू असलेल्या देहव्यापारावर पोलिसांनी धडक कारवाई करत एका महिलेसह तिला मदत करणाऱ्या दोन पुरुषांना ताब्यात घेतले. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून घटनास्थळावरून रोख रक्कम व साहित्य जप्त करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस उपायुक्त (मुख्यालय) रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राम्हणे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने दामिनी पथकासह पेट्रोलिंग दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील यशोदा नगर, गल्ली क्रमांक २ येथे छापा टाकला. पोलिसांनी बोगस ग्राहक व पंचांच्या ☞(पान २ वर)

# महिलांनी अर्थकारणाला गती द्यावी



**-जिल्हाधिकारी आशिष येरेकर**

**अमरावती/प्रतिनिधीः-** महिला बचतगटांसाठी एक लाख रूपयांचा निधी देण्यात येत आहे. हा निधी शासनाला परत करावा लागणार नाही. त्यामुळे महिलांनी या निधीचा उपयोग उद्योगाच्या विकासासाठी करावी. यामुळे अर्थकारणाला गती मिळणार असून इतरांना प्रेरणा मिळेल, असे मत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले.

महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पुरुषांचा जेंडर सेंसीटिव्ह रोल मॉडेल म्हणून सुधारक सन्मान पुरस्कार जिल्हाधिकारी यांच्या शुभ हस्ते आज देण्यात आला. तसेच बचतगटांना एक लाख रूपयांच्या धनादेशाचे वितरण करण्यात आले. यावेळी माविमचे वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी डॉ. रंजन वानखडे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट, सहायक जिल्हा समन्वय अधिकारी ऋषीकेश घ्यार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर ☞(पान २ वर)

# मनरेगा निधी अपहारः ४ बीडीओ, ३ एएओंच्या विरोधात चौकशी सुरू

**-गुन्ह्यातील इतर आरोपींविरुद्ध कठोर कारवाई होईल**

**राष्ट्रपती दौ-यामुळे तपासाची गती थोडी मंदावली**

**वर्धा –** आर्वी पंचायत समितीत घडलेल्या मनरेगा निधी अपहार प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने अलीकडेच ४ गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि ३ सहाय्यक लेखा अधिकारी (एएओ) यांचे बयाण नोंदविले आहे. यामध्ये एका सेवानिवृत्त बीडीओचा समावेश असून, बराच काळ प्रभारी बीडीओ म्हणून काम केलेल्या अधिकाऱ्यांचा समावेश देखील आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासाचा पुढचा टप्पा म्हणजे इंट्रोगेशन, ज्यात बयाण दिलेल्या काही संशयितांना चौकशीसाठी बोलावले जाणार आहे. तपासाच्या या प्रक्रियेदरम्यान अटकेची तलवार मानेवर असल्यामुळे संशयितांना घाम फुटण्याची स्थिती निर्माण होईल, असे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले.

सध्या या प्रकरणी आतापर्यंत दोघींना अटक झाली आहे. त्यापैकी तक्रारदार असलेल्या महिला गटविकास अधिकारी जामिनावर बाहेर आहेत. मार्च आणि एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात आर्थिक गुन्हे शाखेकडून तपासाला गती देण्यात आली, आणि या टप्प्यात ४ बीडीओ आणि ३ एएओंचे बयाण नोंदविले गेले.

**राष्ट्रपती दौ-यामुळे तपास मंदावला**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू वर्धा दौ-यावर येत आहेत. त्यामुळे जिल्हा पोलिस प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी विविध कामांमध्ये व्यस्त असल्याने मनरेगा निधी अपहार प्रकरणाचा तपास थोडा मंदावला आहे. काही जबाबदाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांवरही सोपविल्या गेल्याने प्रकरणाची गती कमी झाली आहे. ☞(पान २ वर)

# तडीपार आरोपी चाकूसह ताब्यात

**नागपुरी गेट पोलिसांची कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या पथकाने रात्रीच्या गस्तीदरम्यान तडीपार आरोपीला चाकूसह अटक केली. ही कारवाई गोपनीय माहितीच्या आधारे रहमत नगर परिसरात करण्यात आली.

माहितीनुसार, हेड कॉन्स्टेबल मलिक अहमद हे आपल्या पथकासह गस्त घालत असताना त्यांना रहमत नगर भागात एक व्यक्ती हातात चाकू घेऊन दहशत माजवत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी इरफान खान रहमान खान (वय ३७, रा. रहमत नगर) याला ताब्यात घेतले. सदर आरोपीला यापूर्वी १८ महिन्यांसाठी जिल्ह्यातून तडीपार ☞(पान २ वर)

# येवदा ग्रामीण रुग्णालय, प्रा.आ.केंद्र वडनेर गंगाई येथील काम गुणवत्तापूर्ण व्हावे

**खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या आरोग्य विभागाला सूचना**



**अमरावती/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील मंजूर ग्रामीण रुग्णालय, वडनेर गंगाई येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नावारूपास येत असलेल्या दोन्ही महत्त्वकांक्षी प्रकल्पांचा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आरोग्य विभागाकडून आढावा घेतला. या दोन्ही कामांवर शासनाचे विशेष लक्ष असून येथील कामे गुणवत्तापूर्ण, गतिमान आणि आरोग्य सेवेची मानक उंचावतील अशा पद्धतीने करण्याचे स्पष्ट निर्देश राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी आरोग्य विभागाला दिले.

खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण पारिसे, दर्यापूरचे तहसीलदार डॉ.रवींद्रकुमार ☞(पान २ वर)

# नवनिर्माण आणि सर्जनशील विचारधारा म्हणजे यशाची गुरुकिल्ली - डॉ. श्रीवास्तव



**जीएचआरयूएमध्ये 'आउट ऑफ बॉक्स थिंकिंग' विषयावर सदा ज्ञान व्याख्यानमाला**

**अमरावती/प्रतिनिधीः-** 'जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यासाठी नेहमी नवीन आणि रचनात्मक विचार करणे आवश्यक आहे. हीच 'आउट ऑफ द बॉक्स थिंकिंग'ची कला तुम्हाला प्रत्येक कठीण परिस्थितीतून बाहेर काढेल. तणाव, नैराश्य आणि निराशा पासून दूर ठेवेल आणि भविष्यात तुमची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यास मदत करेल,' असे मत व्हीएनआयटी नागपूरच्या फायनान्शिअल इंजिनिअरिंग विभागाचे डॉ. सतीश श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.

जी एच रायसोनी युनिव्हर्सिटी अमरावती (जीएचआरयूए) येथे 'सदा ज्ञान व्याख्यानमाला' अंतर्गत सोमवारी 'आउट ऑफ बॉक्स थिंकिंग' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. सतीश श्रीवास्तव मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युनिव्हर्सिटीचे कुलपती डॉ. विनायक देशपांडे होते. यावेळी कुलसाचिव डॉ. स्नेहिल जायस्वाल, विद्यार्थी कल्याण विभागाचे अधिष्ठाता डॉ.प्रशांत अवचट ☞(पान २ वर)

# महापौरांची स्वच्छता पाहणी; नागरिकांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाईचे आदेश



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व नागरी सुविधांची स्थिती सुधारण्यासाठी अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज प्रभाग क्र. ६ मधील विलास नगर-मोरबाग परिसरातील इतवारा बाजार भागाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी परिसरातील स्वच्छता व्यवस्थेचा आढावा घेतला तसेच नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

महापौरांनी विशेषतः अंडा गली व गन्ना गली या भागांना भेट देत तेथील अस्वच्छता, पाणी साचणे, नाल्यांची दुरवस्था व रस्त्यांची खराब अवस्था यांसारख्या समस्यांचा प्रत्यक्ष आढावा घेतला. स्थानिक नागरिकांनी अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांबाबत नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना ☞(पान २ वर)